पुणे, बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 91 • वर्ष ४ थे, अंक ९१ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News






माती कामात हात आजमावला १२

# कोथरूड Out Of Control



# मकोका टिकणार का?

■ अनिरुद्ध बडवे

**पुणे : राज्यातील सर्वात शांत, सभ्य आणि प्रतिष्ठितांचे शहर म्हणून पुण्याची ओळख आहे आणि या पुण्याला ज्या परिसराने ही ओळख करून दिली तो कोथरूड भाग सध्या सर्वात असभ्य, अप्रतिष्ठित आणि अशांत झालेला दिसून येतो. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणामध्ये एकाच विभागातून सर्वाधिक लोकप्रतिनिधी आणि महत्त्वाची पदे देणारा हा परिसर असा अस्वस्थ का? याचे उत्तर लोकप्रतिनिधींच्या उदासीकरणात शोधायचे की त्यांनीच केलेल्या गुंडगिरीच्या उदात्तीकरणात शोधायचे ? यामध्ये कोथरूडकर चिंताग्रस्त आहे .**

कुप्रसिद्ध गुंड गजा मारणे याला आज 3 मार्चपर्यंत कोठडी सुनावण्यात आली. परंतू आजपर्यंत अनेकदा तडीपारी, स्थानबद्धता, सुरक्षिततेचा उपाय म्हणून अटक अशा अनेक कारवाया झालेल्या गजा मारणे हा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा मोकाट सुटेल, अशीच चर्चा आता खुद्द राजकारण्यांपासून ते सामान्य नागरिक देखील करत आहे. गजा मारणे याला धाडसाने मकोका लावण्यात आला .

परंतु तो मकोका टिकणार का ? ही शंका आणि भीती कोथरूडकर यांच्या मनात आहे. कारण आज पर्यंत काही नेत्यांना मकोका लावून पुन्हा त्यातून सही सलामत बाहेर आणण्यात देखील काही लोकप्रतिनिधींचा सहभाग होता हे पुणेकरांनी उघड्या डोळ्याने पाहिले आहे.

सातत्याने व्यवस्थेची आणि यंत्रणेची कवच कुंडल असलेला गजा मारणे आणि त्याचे साथीदार हे सातत्याने मस्तीखोर आहे . आजही गजा मारणे आणि रुपेश मारणे या दोघांनी आपल्या साथीदारांना "मस्ती आली आहे साल्याला मारा, "असे म्हणून चिथावणी दिली असल्याचा दावा पोलिसांनी आज न्यायालयात केला. विशेष न्यायालयाने गजा मारणे याला ३ मार्चपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त गणेश इंगळे यांच्याकडे या गुन्ह्याचा तपास सोपविण्यात आला आहे.

आरोपीच्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण चालू असून तपासादरम्यान उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या आधारे या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे काय याबाबत तपास करायचा आहे. या गुन्ह्यात आतापर्यंत दोन ॲक्टिव्हा जप्त करण्यात आल्या आहेत.

### कार्यकर्त्याला झळ पोहोचली म्हणून... ?

गजा मारणे याच्या कृष्णकृत्याबद्दल गेल्या अनेक वर्षांपासून माध्यमे ओरडत आहेत. अनेक प्रकरणात त्याचे नाव आले . पोलिसांनी देखील त्याच्यावर कधीही इतक्या धाडसाने कारवाई केली नाही. परंतु केंद्रीय मंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांच्या एका कार्यकर्त्याला झालेल्या मारहाणी नंतर नामदार मोहोळ यांनी आक्रमक होत पोलिसांना कारवाई करणे भाग पाडले.

मकोका सारखी कारवाई करण्यासाठी एका राजकीय कार्यकर्त्याला झळ पोहोचवण्याची वाट पुणेकरांना पहावी लागली. परंतु काळाची पाऊले ओळखून मोहोळ यांनी आक्रमकता दाखवत पोलिसांना हे करणे भाग पाडले, याचेही अप्रूप आता राजकारणीच दाखवत आहेत. शांतता प्रिय, सभ्य कोथरूडकर आणि पुणेकर मात्र या कारवाईमुळे सुखावला आहे. मुरलीधर अण्णा यांनी अशीच अण्णागिरी सर्वसामान्यांच्या सुरक्षिततेसाठी चालवावी अशी अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त होत आहे.

### मारणेला कर मारल्यासारखे तो करतोय रडल्यासारखे

गजा मारणे हा अनेक लोकप्रतिनिधींचा आणि राजकारण्यांचा स्नेही आहे हे आता लपून राहिलेले नाही. आजपर्यंत त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी झाल्या, गुन्हे दाखल झाले माध्यमांमध्ये ओरड झाली तरी देखील त्याला अप्रत्यक्षपणे संरक्षण देण्यात आले. त्याच्या 50 हून अधिक प्रॉपर्टी जप्त करण्याचे आदेश निघाले. प्रत्यक्षात कुठलीही धाडसी कारवाई त्याच्यावरती झाली नाही.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार आणि गजा मारणे यांची भेट मोठी चर्चेत आली होती. त्यानंतर खासदार निलेश लंके यांनीही त्यांची भेट घेतली. ना. चंद्रकांत पाटील यांनी तर गजा मारणे यांच्या दहीहंडी कार्यक्रमात जाऊन उपस्थिती लावली. त्यापूर्वी मारणे यांच्या पत्नी यांनी मनसेची उमेदवारी घेतली तर काही काळ त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये देखील जाऊन आल्या. त्यामुळे गजा मारणे हा सर्वपक्षीय मित्र आहे हे स्पष्ट आहे.

निवडणुका जिंकण्यासाठी साम दम दंड भेद अशा चारी अस्त्रांचा वापर करत असताना गजा मारण्यासारखे गुंड आपल्या पदरी असावेत ही देखील कदाचित या आधुनिक लोकशाहीची मजबुरी असावी.

### कोथरूडमध्ये अनेक डॉन

कोथरूडच्या नळ स्टॉप चौकात भरधाव वेगाने गाड्या चालवणाऱ्या टू व्हीलर वाल्यांपासून ते आजूबाजूच्या टेकडीच्याकडे कपारात अमली पदार्थांचे व्यवसाय करण्यापर्यंत अनेक गुंड उपजले आहेत. आजपर्यंत अनेक डॉन उदयास आले काहींना पोलिसांनी संपवले तर काहींनी आपापसातल्या टोळ्यांमध्ये संघर्ष करूनच स्वतःला संपून घेतले. परंतु दीर्घ काळापर्यंत त्या गुंडगिरीच चर्चेत राहणारा गजा मारणे हा गेल्या दहा वर्षातील एकमेव अपवाद आहे.

कोथरूडमध्ये एका महिन्याला सरासरी 10 गुन्हे घडत असतात. येथे साध्या पाकीट मारी , चेन हिसकावून

» पान ७ वर

# 21

# आम आदमीच्या आमदारांचे निलंबन

## दिल्ली विधानसभेत प्रचंड गदारोळ

**नवी दिल्ली :** विधानसभेत मंगळवारी प्रचंड गदारोळ बघायला मिळाला. नव्हे, सभागृहाचे कामकाजच गदारोळातच सुरू झाले. खरे तर, उपराज्यपालांच्या अभिभाषणादरम्यान आम आदमी पक्षाच्या आमदारांनी गदारोळ सुरू केला. हा गदारोळ एवढा वाढला की, शेवटी विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी विरोधीपक्ष नेत्या आतिशी यांच्यासह 'आप'च्या २१ आमदारांना संपूर्ण दिवसासाठी निलंबित करत, सभागृहाबाहेर केले. दरम्यान, सभागृहात कॅगचा अहवाल सादर करण्यात आला असून 'आप'च्या मद्य धोरणामुळे २ हजार कोटीचे नुकसान झाल्याचे कॅगच्या अहवालात म्हटले आहे. आपल्या भाषणात, उपराज्यपाल म्हणाले, 'सरकार यमुना, प्रदूषण, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन आणि अनधिकृत वसाहतींचे नियमितीकरण यासह पाच मुख्य गोष्टींवर काम करेल. उपराज्यपालांच्या अभिभाषणादरम्यान, भाजप आमदार 'मोदी-मोदी'च्या घोषणा देत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, सभागृहाबाहेर घालविण्यात आलेल्या 'आप'च्या आमदारांनी हातात बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो घेऊन विधानसभेबाहेर निदर्शने केली. यावेळी माध्यमांसोबत बोलताना आतिशी म्हणाल्या, भाजपने मुख्यमंत्री कार्यालय आणि मंत्र्यांच्या कार्यालयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो काढून त्याऐवजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो लावला. माझा भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना प्रश्न आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा मोठे झाले आहेत का? या विरोधातच आम आदमी पक्षाने निदर्शन केले आहे. एवढेच नाही तर, जोवर डॉ. बाबासाहेबांचा फोटो त्यांच्या जागेवर लावला जात नाही, तोवर आम्ही सभागृहापासून ते रस्त्यापर्यंत निदर्शने करत राहू.

दिल्लीमध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर आता 'आप' सरकारच्या काळातील फाईली बाहेर निघायला सुरुवात झाली आहे. विधानसभेच्या अधिवेशनात आज दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आपच्या काळात आणलेल्या मद्य धोरणाबाबत कॅगचा अहवाल विधानसभेत मांडला. दिल्ली मद्य धोरणात बदल झाल्यामुळे राज्याला २ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची धक्कादायक माहिती या अहवालातून समोर आली आहे.

» पान ७ वर

# महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार 'अनादी मी अनंत मी'ला

**मुंबई :** कवी मनाचे महान योध्दे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाने यावर्षी पासून दिला जाणार पहिला "महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार" स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या "अनादी मी अनंत मी.. " या गीताला देण्यात आलाय. या पुरस्काराची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी फ्रान्सच्या मार्सेलिस समुद्र किनाऱ्यावरुन मंगळवारी केली आहे.

ज्या पध्दतीने महाराष्ट्रभूषण आणि अन्य सन्मानाचे पुरस्कार महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येतात त्याच पद्धतीने दरवर्षी एका प्रेरणा गीताला महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे "छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत" पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. २ लाख रुपये रोख रक्कम व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असेल, अशी माहिती ही ॲड. आशिष शेलार यांनी दिली आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे एक उत्तम साहित्यिक आणि संस्कृतचे उत्तम जाणकार होते. त्यांनी संस्कृत भाषेत 'बुधभुषण' हा ग्रंथ लिहिला होता. तर 'नायिकाभेद', 'नखशीख' आणि 'सातसतक' हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहिले होते. त्यामुळेच त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन महाराष्ट्र शासन यावर्षी पासून एका प्रेरणा गीताचा सन्मान करणार आहे. माणसाचा जन्मापासून मृत्यू पर्यंतचा प्रवास हा एक मोठा संघर्ष असतो. या संघर्षात संकटसमयी मनाला उभारणी देण्याचे काम काव्य पंक्ती करतात, जगण्याला प्रेरणा देतात. म्हणून अशा प्रेरणा गीतांचा सन्मान व्हावा तोही आपल्या स्वराज्यासाठी अफाट संघर्ष करणारे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावे व्हावा, अशी या मागची कल्पना असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

सावरकर पॅरिसहून लंडनला रेल्वेने आल्यावर ब्रिटिश सरकारने अटक करून त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप करून खटला भरला. त्यांच्यावरचा खटला इंग्लंडमध्ये न चालवता हिंदुस्थानात चालवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सावरकरांना लंडनहून मोरिया बोटीने हिंदुस्थानात नेण्यात आले. ती बोट मार्सेलिसच्या बंदरात आल्यावर सावरकरांनी ८ जुलै १९१० या दिवशी ब्रिटिशांच्या ताब्यातून सुटका करून घेऊन आपल्या देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्याचा आपला लढा चालूच ठेवण्यासाठी त्यांनी समुद्रात उडी मारली. सावरकर ६० यार्ड एवढे अंतर पोहून गेले आणि त्यांनी मार्सेलिसचा किनारा गाठला. पण दुर्दैवाने ते पकडले गेले. त्यानंतर आपल्याला इंग्रजाकडून आपला अमानुष छळ होणार हे त्यांच्या लक्षात

» पान ७ वर



## नवी पाठ्यपुस्तके येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार

**पुणे :** पहिलीसाठी 'सीबीएसई'च्या धर्तीवर राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत. ही नवी पाठ्यपुस्तके येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येणार आहेत. शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचे शिक्षण राज्यमंत्र्यांनी दोनच दिवसांपूर्वी सांगितलेले असताना, शिक्षण आयुक्तांनी मात्र येत्या शैक्षणिक वर्षात प्रचलित पद्धतीनुसार शाळा जूनमध्येच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले आहे.'आगामी शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याचा प्रयत्न असून, याबाबत अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून काम सुरू केले आहे,' असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी नुकतेच पुण्यात बोलताना सांगितले होते. त्यामुळे राज्यभरातील शाळा, पालक, संस्थाचालक, शिक्षक अशा सर्वच घटकांमध्ये संभ्रमाचेच वातावरण होते.या पार्श्वभूमीवर, 'येत्या शैक्षणिक वर्षात प्रचलित वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात येणार नाही. त्यामुळे शाळा जूनपासूनच सुरू होतील. सद्यस्थितीत शाळा सुरू करण्याबाबत कोणताही बदल होणार नाही,' असे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग यांनी सांगितले.

## महाशिवरात्रीला फराळ कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे :** विनायक निम्हण (आबा) यांची भगवान महादेवावर अपार श्रद्धा होती. सोमेश्वर वाडी येथील



पुरातन सोमेश्वर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. अशा त्यांच्या शिवभक्तीच्या प्रेरणेने दरवर्षीप्रमाणे माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण महाशिवरात्रीला फराळ कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत.

आज बुधवार २६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत, झुंज बंगला, सर्व्हे नं. १९, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे येथे होणार आहे. भगवान श्री शिवशंकर यांच्या भक्तीचे व श्रध्देचे अधिष्ठान असणारा आणि आबांच्या आठवणींना उजाळा देणारा हा कार्यक्रम सर्वसामान्यांसाठी खुला आहे, अशी माहिती सनी निम्हण यांनी पत्रकाद्वारे दिली.

## गुणवत्तावाढीसाठी शिक्षण परिषद ठरणार उपयुक्त

**पुणे :** महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले जाणार आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय शिक्षण परिषदेचे आयोजन केले जाणार आहे. त्यानंतर जर गुणवत्ता घसरली तर त्यास शिक्षकांना जबाबदार धरले जाणार आहे.

शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात 'असर'चा अहवाल जानेवारी महिन्यात जाहीर झाला आहे. त्यामध्ये पुणे शहर, जिल्ह्यातील गुणवत्तेबाबत गंभीर गोष्टी समोर आल्या आहेत. त्यामध्ये इयत्ता ६वी ते ८वीच्या ४० टक्के विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना भागाकार करता येत नाही, मुळ अक्षरे ओळखता येत नाहीत, मुलांना एक ते ९९ पर्यंतचे आकडे ओळखता येत नाहीत. ५ ते १६ वयोगटातील निम्म्या विद्यार्थ्यांना अंक गणित जमत नाही, सरकारी शाळांमधील प्रवेश संख्या घटली आहे, मुलांचा स्मार्टफोनचा वापर वाढला आहे असे निरीक्षणे नोंदविली गेली आहेत.

पुणे महापालिकेतर्फे शाळांवर दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च केले जात आहेत. पण त्यातुलनेत गुणवत्ता वाढत नाही. असरच्या अहवालावर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यामध्ये गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी व त्यांच्या कार्यपद्धतीत बदल करण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर शिक्षण परिषद आयोजित केली जाईल. मी स्वतः विभागीय स्तरावर शिक्षण परिषद घेणार आहे. महापालिका शिक्षणावर मोठा खर्च करत आहे, पण गुणवत्ता वाढत नसेल तर योग्य नाही. शिक्षकांनी गुणवत्ता वाढीसाठी काय करावे हे त्यांनी प्रशिक्षणातून सांगितले जाईल. पण त्यानंतरही गुणवत्ता वाढणार नसेल तर त्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. असे पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

### उदघाटन




पुणे एव्हीके स्किल फौंडेशनच्या वतीने उद्योग आणि एच आर अधिकारी याच्यासाठी वाकड येथे 'सक्षम भारत २०२५' या शिखर परिषदेच्या उदघाटन संपन्न झाले.

## उद्योग आणि एच आर अधिकाऱ्यांची शिखर परिषद संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणी समजून घेतल्या पाहिजेत, हे चांगले काम करण्यासाठी अनिवार्य आहे. सध्या आपण परिवर्तनाच्या टप्प्यात आहोत. शासकीय कार्यालयात कॉर्पोरेट संस्कृतीचा अवलंब करणे गरजेचे आहे, याची सुरवात आम्ही आमच्या पासपोर्ट कार्यालयातून केली आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी डॉ अर्जुन देवरे यांनी केले. एव्हीके स्किल फौंडेशनच्या वतीने उद्योग आणि एच आर अधिकारी याच्यासाठी वाकड येथे 'सक्षम भारत २०२५' या शिखर परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

या शिखर परिषदेस अप्पर कामगार आयुक्त अभय गिते, साज टेस्ट प्लांटच्या कार्यकारी संचालक ऋतुजा जगताप,फिनसॉफ्ट एआयचे संस्थापक शैलेंद्र अभ्यंकर, फौंडेशनचे अध्यक्ष आयोजक अमोल कागवाडे, उपाध्यक्ष बळीराम मुतगेकर, सचिव अजित देसवंडिकर आदी मान्यवर उपस्थित होते. सरकार उद्योगासाठी शेकडो सुधारणा आणि चांगली धोरणे राबवत आहे. आता उद्योगाने या धोरणांचा लाभ घेतला पाहिजे, असे अप्पर आयुक्त अभय गीते यांनी सांगितले.

# बेशिस्त वाहनचालकांवर 'सर्जिकल स्ट्राईक'

## पुणे पोलिस ॲक्शनमोडमध्ये





"कारवाई करूनही वाहनचालक सर्रास वाहतूक नियमभंग करत असल्याचे दिसून आले. विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, मोबाइलवर संभाषण, एका दुचाकीवरून तिघांचा प्रवास (ट्रिपल सीट), मद्य पिऊन वाहन चालवणे, मोटार चालवताना आसनपट्टा (सीट बेल्ट) न लावणे अशा प्रकारचे नियमभंग सर्रास केले जातात. अशा बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध हा कारवाईचा बडगा आम्ही उचललेला आहे.

**-पोलीस आयुक्त अमितेश कुमार**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे पोलिसांकडून बेशिस्त वाहनचालकांवर 'सर्जिकल स्ट्राईक' कारवाई करण्यात आली आहे. पुणे शहर परिसरात केलेल्या नाकाबंदीत दोन तासात १५१८ वाहन चालकांवर धडक कारवाई करण्यात आली आहे. एकाच दिवशी नियमभंग करणाऱ्या



वाहनचालकांकडून १३ लाख ६५ हजार रुपयांचा दंड जप्त करण्यात आला. नाकाबंदीत सव्वा चार हजार वाहनांची तपासणी करण्यात आली असून, ३७१ वाहने जप्त करण्यात आली. दुपारी चार वाजल्यापासून सायंकाळी सहा वाजेपर्यंत शहराच्या विविध भागात नाकाबंदी करण्यात आली होती. नाकाबंदीदरम्यान शहरातील ७८ महत्त्वाच्या ठिकाणी चार हजार १८७ वाहनचालकांची तपासणी करण्यात आली.

शहर, तसेच उपनगरातील प्रमुख चौकात वाहनांची तपासणी करण्यात आली. रात्री उशीरापर्यंत ही कारवाई सुरू होती. सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस आयुक्त, सर्व विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी कारवाईत सहभागी झाले होते.

पुणे शहरात वाहतूक कोंडीची समस्येमुळे वाहतूक पोलीस त्रासले आहेत. वाहतूक कोंडी सोडवण्यात पोलीस गुंतले असल्याचा फायदा घेत अनेक वाहनचालकांकडून पुणे शहर आणि परिसरात वाहतूक नियमांना केराची टोपली दाखवली जात आहे. बेशिस्त वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहन चालवत असल्याने गंभीर अपघात घडत आहेत. अशा बेशिस्त वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी तीव्र कारवाईची ही मोहीम सुरू केली आहे.



### चार दिवस नाकाबंदी कायम

- बेशिस्त वाहनचालकांना वाहतुकीची शिस्त लावण्यासाठी सुमारे दोन हजार पोलिसांची फौजच रस्त्यावर उतरली. पोलिसांनी शहराच्या विविध भागात सोमवारी नाकाबंदी करून बेशिस्त चालकांवर कारवाई केली. विरुद्ध दिशेने वाहन चालवणे, ट्रिपल सीट, सीट बेल्ट परिधान न केलेल्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे. या नाकाबंदी मोहिमेत पोलिस सह आयुक्त, चार अतिरिक्त पोलिस आयुक्त, पाच पोलिस उपायुक्त, दहा सहाय्यक पोलिस आयुक्त आणि ३९ पोलिस ठाण्यांचे वरिष्ठ निरीक्षक आणि वाहतूक शाखेसह ९७ पोलिस अधिकारी तसेच १८७२ पोलिस अंमलदार सहभागी होते. पुढील काही दिवस ही नाकाबंदी असणार असल्याची शक्यता आहे

## डॉ. प्रभू व्यास यांना इन्स्पायरिंग सेक्सोलॉजिस्ट पुरस्कार प्रदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सुखी वैवाहिक जीवनामध्ये लैंगिक समस्या या अनेकदा अडसर ठरतात, तसेच संतानप्राप्तिमध्येही समस्या उत्पन्न होतात. यातून बऱ्याचदा नाती तुटतात आणि त्यातून मोठी सामाजिक समस्यादेखील तयार होते. या स्थितीत सातत्याने लैंगिक समस्यांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांचे निराकरण करणारे तसेच सुखी वैवाहिक जीवनासाठी सखोल मार्गदर्शन देणारे सेक्सोलॉजी मधील एम.एस. (सेक्स), पी .जी.डिप्लोमा (सेक्स), पीएचडी (सेक्स), करणारे डॉ. प्रभू व्यास यांना नुकताच इन्स्पायरिंग सेक्सोलॉजिस्ट पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. व्यास यांनी सेक्सोलॉजी संदर्भात केलेल्या



सखोल संशोधनाबद्दल त्यांचा गौरव करण्यात हा आला.

पीवायसी हिंदू जीमखाना येथे झालेल्या सेक्सोलॉजिस्टच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डी. हार्टमॅन (अमेरिका), केईएम मुंबईचे सेक्सोलॉजिस्ट डॉ. प्रकाश कोठारी, नानावटी सुपर स्पेशालिटीचे डॉ. राज ब्रम्हभट, चेन्नई अपोलो हॉस्पिटलचे सेक्सोलॉजिस्ट डॉ. नारायण रेड्डी, सेक्सोलॉजिस्ट संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जी. व्यंकटरमणा (हैदराबाद) या सर्वांनी डॉ. व्यास यांना ट्रॉफी, सर्टिफिकेट, पुणेरी पगडी, शाल व मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

"आजच्या काळात संवाद आणि संचार माध्यमे वाढली असतानाही आपल्या परिवारातील लोकांशी आपला संवाद मात्र कमी झाला आहे. त्यातही लैंगिक समस्यांवर तर अजिबातच संवाद नसल्याने कौटुंबिक कलह तीव्र झाले आहेत. परंतु या समस्येवर उपाय आहे. त्यासाठी योग्य ते काउन्सलिंग आवश्यक आहे. योग्य व अनुभवी सेक्सोलॉजीस्टकडे आपल्या समस्या मांडून होणाऱ्या संभाव्य गंभीर परिणामांना टाळले जाऊ शकते. प्रगत राष्ट्रांमध्ये ही प्रक्रिया आहे, परंतु भारतात त्यासंदर्भात जनजागृती होणे अजूनही गरजेचे आहे.

**— सुप्रसिद्ध सेक्सोलॉजीस्ट डॉ. प्रभू व्यास**

## 'नेट'चा निकाल जाहीर;पाच हजार १५८ उमेदवार पात्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएकडून यूजीसी नेटचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. निकाल एनटीएची अधिकृत वेबसाईट ugcnet.nta.ac.in वर ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आला आहे. उमेदवार यूजीसी नेट स्कोअर कार्ड देखील डाऊनलोड करू शकतात. यूजीसी नेट परीक्षेअंतर्गत उमेदवारांना तीन श्रेणींमध्ये पात्रता मिळाली आहे.

डिसेंबर सत्रात ५ हजार १५८ उमेदवार सहायक प्राध्यापकासाठी, ४८ हजार १६१ सहायक प्राध्यापक आणि पीएच.डी. प्रवेशासाठी आणि १ लाख १४ हजार ४४५ उमेदवार केवळ पीएच.डी. प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. नेट परीक्षेसाठी यंदा नोंदणीकृत उमेदवारांची संख्या ८ लाख ४९ हजार १६६ होती. यापैकी ६ लाख ४९ हजार ४९० उमेदवारांनी संबंधित परीक्षा दिली असल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालय आणि विद्यापीठांसह उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकपदी नोकरी मिळविण्यासाठी तसेच पीएच.डी. प्रवेशासाठी यूजीसी नेट परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. त्यामुळे देशभरातील पात्र उमेदवार संबंधित परीक्षा देत असतात.



पुणे बांबूशी निगडित व्यवसायामुळे सेवा क्षेत्रात मोठ्या रोजगार संधी उपलब्ध होतील असा विश्वास डीईएसच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च' (आयएमडीआर) आयोजित 'बांबू परिषदेत समजावून सांगताना माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू .

# डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे रंगणार 'रागप्रभा संगीतोत्सव'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राग प्रहरांच्या कालबाह्य संकल्पनांपासून मुक्त 'रागप्रभा संगीतोत्सवा'चे डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनतर्फे रविवार, दि. २ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ९.३० या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. भारतीय अभिजात शास्त्रीय संगीत सादरीकरणाला राग-समयाचे बंधन नको या स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या संकल्पनेवर आधारित गायन-वादनाचा हा पहिला संगीत महोत्सव आहे. भारतीय अभिजात शास्त्रीय संगीतातील रागांचे समय प्रहरानुसार सादरीकरण करायचे झाल्यास ज्या प्रहरात सांगीतिक कार्यक्रम आयोजित केले जात नाहीत ते राग विस्मरणात जाण्याची शक्यता आहे. तसेच मिश्र रागांचे सादरीकरण होणे शक्य नाही. यातून पर्यायाने भारतीय संगीत क्षेत्राचे आणि कलाकाराचे नुकसानच होईल. अशा परिस्थितीत कोणत्याही रागाचे कोणत्याही वेळी उत्तम प्रस्तुतीकरण होऊन तो रोग त्याच्या पूर्ण सौंदर्यासह खुलविला जाऊ शकतो, अशी धारणा डॉ. प्रभा अत्रे यांची आहे. या संकल्पनेला अनुरसरून हा महोत्सव आयोजित केला असल्याचे डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशनच्या सचिव डॉ. भारती एम. डी. आणि कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

राग प्रहरांच्या कालबाह्य संकल्पनांविषयी स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या 'विज्ञानाच्या दृष्टीकोनातून राग-रस, राग-समय' या विस्तृत वैचारिक लेखाची पुस्तिका 'रागप्रभा संगीतोत्सवा'त प्रकाशित केली जाणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

- **पहिले सत्र : पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्या बासरीवादनाचा अविष्कार पुणेकरांना अनुभवायला मिळणार आहे. त्यानंतर पंडित उदय भवाळकर, पंडिता पद्मा तळवलकर, पंडित राम देशपांडे, पंडित राजा काळे यांच्या बहारदार गायनाची पर्वणी असेल.**
- **दुसरे सत्र : सत्राची सुरुवात दुपारी ४ वाजता होणार असून ताकाहिरो अराई यांचे संतूर वादन होणार आहे. त्यानंतर पंडित श्रीनिवास जोशी, पंडित विनायक तोरवी, पंडिता अलका देव-मारुलकर, पद्मश्री पंडित उल्हास कशाळकर यांचे गायन होणार आहे.**
- **कलाकारांना पद्मश्री पंडित सुरेश तळवलकर, पंडित योगेश समसी, पंडित अरविंदकुमार आझाद, भरत कामत, ऋषिकेश जगताप, प्रशांत पांडव, अजिंक्य जोशी (तबला), चैतन्य कुंटे, सुयोग कुंडलकर, मिलिंद कुलकर्णी, अविनाश दिघे, राहुल गोळे (संवादिनी), मृणाल उपाध्याय, प्रताप आव्हाड (पखवाज) साथसंगत करणार आहेत.**







## भीषण अपघाताचा थरार !

**वाकड :** पुणे आणि परिसरात अपघाताचे प्रमाण वाढले आहे आहे. दररोज वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता पुण्यातील वाकडमध्ये एक भीषण अपघात घडला आहे. भरधाव कारने दिलेल्या धडकेत दोन बाईकस्वार जखमी झाले. ही दुर्घटना एका दुसऱ्या कारच्या डॅशकॅम कॅमेऱ्यात कैद झाल्याने ही घटना समजली. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर वाकड येथील टिप-टॉप इंटरनॅशनल हॉटेलजवळ एक अपघाताचा थरार घडला. ज्यामध्ये वेगाने येणाऱ्या कारने दुचाकीस्वाराला मागून धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की दुचाकीवर बसलेल्या एकाचे हॅल्मेट हवेत मागच्या बाजूला उडाले आणि दोघेही दुचाकीस्वार दूरवर पुढे फरफटत गेले.



## संजय राऊत यांच्या फोटोला जोडे मारून निषेध

**पुणे :** दिल्लीत ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना दरम्यान 'असे घडलो आम्ही' या कार्यक्रमा दरम्यान ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की, एक पद मिळायचं, अस वादग्रस्त विधान शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रविवारी केल.या विधानाच्या निषेधार्थ ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी पुण्यातील शिवाजीनगर भागातील मॉडेल कॉलनी येथील उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या निवासस्थाना बाहेर आंदोलन केले.त्याच दरम्यान ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी शिवसेनेच्या नेत्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले.त्यानंतर पुण्यातील शिंदे गटाचे शिवसैनिक अधिक आक्रमक झाल्याचे पाहण्यास मिळत असून अलका टॉकीज चौकात संजय राऊत यांच्या विधानाच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले.यावेळी संजय राऊत यांच्या फोटोला जोडे मारून निषेध नोंदविण्यात आला.

## सावरकरांची खोली राहणार दर्शनासाठी खुली

**पुणे :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या वास्तव्याने पावन झालेली व ऐतिहासिक



महत्त्व असलेली आणि विद्यार्थ्यांचे स्फूर्तीस्थान असलेली ही खोली बुधवार दिनांक २६.०२.२०२५ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्ताने सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत सर्व नागरिकांना दर्शनासाठी खुली ठेवण्यात येणार आहे अशी माहिती कार्यवाह डॉ. आनंद काटीकर यांनी दिली. सकाळी ८.४५ वाजता प्रमोद रावत, अध्यक्ष नियामक मंडळ, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतील. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे फर्ग्यूसन महाविद्यालयाचे विद्यार्थी असताना सन १९०२ ते १९०५ या कालावधीमध्ये फर्ग्यूसन महाविद्यालय मुलांचे वसतिगृह क्रमांक १ मधील खोली क्रमांक १७ मध्ये राहत होते. या खोलीमध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अर्धपुतळा आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मिळालेल्या डी. लिट. पदवीचे दोन गणवेश ठेवण्यात आले आहेत.

## विद्यापीठात छत्रपती शिवरायांवर पदव्युत्तर अभ्यासक्रम

**पुणे :** पुण्यातून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली, त्याच पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात छत्रपती शिवरायांवर पदव्युत्तर (एमए) अभ्यासक्रम सुरू होणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात म्हणजेच २०२५ - २६ मध्ये शिवजयंतीनिमित्त विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग' यावर पूर्ण वेळ अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

## मराठी भाषा गौरव दिन




पुणे एकपात्री न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पुस्तकांची भव्य रांगोळी साकारण्यात आली होती. 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमात कवयित्री आश्लेषा महाजन आणि बालकवी विश्वास वसेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## बालभारती ते पौडफाटा रस्त्याचा कामाचा मार्ग मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बालभारती ते पौडफाटा रस्त्याच्या विरोधातील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात 'कव्हेट' दाखल केले आहे. यामुळे या कामात कोणताही अडथळा निर्माण होण्याचा धोका कमी होणार आहे. सदर रस्ता हा वनक्षेत्रातून जात असल्याने या रस्त्याच्या विरोधात पर्यावरण प्रेमींनी आंदोलन केले होते. तसेच राजकीय पक्षांकडून विरोध केला गेला होता. या रस्त्याच्या कामाच्या विरोधात नागरी चेतना मंचाने उच्च न्यायालयात याचिका याचिका उच्च न्यायालयाने नुकतीच फेटाळून लावली. तसेच या कामावरील स्थगिती उठविली. महापालिकेची बाजू समजुन घेऊनच पुढील आदेश द्यावेत अशी मागणी या 'कॅव्हेट'च्या माध्यमातून केली गेली आहे, असेही ॲड. चव्हाण यांनी सांगितले. पालिकेच्या विकास आराखड्यात कोथरूड आणि सेनापती बापट रस्त्याला जोडण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून बालभारती ते पौड फाटा रस्ता दाखविण्यात आला आहे. हा रस्ता बालभारती येथून वेताळ टेकडीवरून सुरु होतो. या कामासाठी २५२ कोटी १३ लाख रुपये इतका खर्च होणार आहे.

# महाशिवरात्रीला त्रासमुक्त प्रवास



या विशेष सेवांव्यतिरिक्त, पीएमपीएमएल त्यांचे नियमित बस मार्ग चालवत राहील, ज्यामध्ये ६१, २९६, २९६अ, ५२अ, २२८, ३०५, ३४१, ३४२, ३६८ आणि ३७१ यांचा समावेश आहे. महाशिवरात्रीला सुरळीत आणि त्रासमुक्त प्रवास सुनिश्चित करण्यासाठी पीएमपीएमएलने सर्व भाविकांना या विशेष बस सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाशिवरात्रीच्या निमित्ताने पुणे शहराच्या काही भागात पर्यटनाला येणा-या पर्यटकांची संख्या वाढते. या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोयीकरीता पीएमपी'च्या विशेष बस ची सोय करण्यात आली आहे. पीएमपी' चा हा उपक्रम प्रवाशांसाठी उपयुक्त आणि सोयीचा ठरणार आहे, अशी माहिती पीएमपी' प्रशासनाकडून पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आली.

महाशिवरात्रीनिमित्त नीळकंठेश्वर, बनेश्वर (नसरापूर), घोरावडेश्वर मंदिर पायथा (शंकरवाडी) या ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. त्यामुळे भाविकांच्या सोयीसाठी आज बुधवार (दि. २६) रोजी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून कात्रज सर्पोद्यान, स्वारगेट मुख्य स्थानक आणि निगडी (पवळे चौक) या महत्त्वाच्या बसस्थानकांवरून जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

शहर व उपनगरातून हजारो भाविक दर्शनासाठी नीळकंठेश्वर, बनेश्वर, घोरावडेश्वर मंदिर या ठिकाणी जातात. त्यामुळे भाविकांची गर्दी होते. त्यामुळे कात्रज सर्पोद्यान ते बनेश्वर (चेलाडी फाटापर्यंत), स्वारगेट मुख्य स्थानक स्वारगेट ते नीळकंठेश्वर (बीएसएफ सेंटर, पानशेत) निगडी (पवळे चौक) ते घोरावडेश्वर मंदिर पायथा (शंकरवाडी) या ठिकाणावरून पीएमपीच्या जादा बसेस धावणार आहेत. भाविकांनी पीएमपीकडून करण्यात आलेल्या नियमित व जादा बससेवेची नोंद घेऊन बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### विशेष बस सेवेसाठी प्रमुख मार्ग पुढील प्रमाणे :

- कात्रज सर्पोद्यान येथून बनेश्वर (चेलाडी फाटा) येथे जाण्याकरिता पहिली फेरी पहाटे ५:३० वा. असून, नियमित सुरू असणारे कात्रज ते सारोळामार्गे कापूरहोळ, कात्रज सर्पोद्यान ते वेल्हे व कात्रज सर्पोद्यान ते वांगणीवाडी या मार्गांवर ९ बसेस व यात्रेसाठी २ जादा बसेस अशा एकूण ११ बसेस सरासरी २० मिनिटांच्या वारंवारीतेने उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.
- स्वारगेट मुख्य स्थानकावरून नीळकंठेश्वर (बीएसएफ सेंटर, पानशेत) येथे जाण्याकरिता पहिली फेरी पहाटे ३:३० वा. असून, नियमित सुरू असणारा बसमार्ग स्वारगेट ते पानशेत / वरसगाव या मार्गावर २ बसेस व यात्रेसाठी १२ जादा बसेस, अशा एकूण १४ बसेस धावणार आहेत.
- निगडी (पवळे चौक) येथून घोरावडेश्वर मंदिर पायथा (शंकरवाडी) येथे जाण्याकरिता पहिली फेरी पहाटे ५:२० मि. असून, सदर ठिकाणी जाण्याकरिता नियमित सुरू असणारे बसमार्ग कात्रज ते वडगाव मावळ, निगडी पवळे चौक ते वडगाव मावळ, निगडी ते उर्सेगावमार्गे तळेगाव, निगडी ते उर्सेगावमार्गे परंदवाडी, निगडी ते लोणावळा या सहा मार्गांवर एकूण २४ बसेस धावणार आहेत.

## संरक्षण खात्यातील ड्रोन ट्रेनरला मिळणार प्रशिक्षण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारच्या कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूल (CAATS) ने पुण्यातील पीबीसी एरो हब रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन सोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार डीजीसीए चे आगामी काळातील ड्रोन उड्डाणावरील प्रमाणपत्र अभ्यास प्रशिक्षण वर्ग पीबीसी मार्फत घेण्यात येणार आहेत. नुकताच कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलचे जनरल अभिनय राय व पीबीसी च्या संचालिका अंजली चित्ते यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहते. यावेळी पीबीसी एरो हब चे संचालक प्रणव चित्ते, ब्रिगेडियर शौकीन उपस्थित होते.

याविषयी अधिक माहिती देताना पीबीसी एरो हब चे संचालक प्रणव चित्ते यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही ड्रोन प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असून अनेक ठिकाणी आम्ही सेवा पुरवत आहोत. आज पर्यंत आम्ही महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिसा राज्यातील होतकरू महिलांना नमो ड्रोन दीदी उपक्रमा अंतर्गत ड्रोन उडविण्याचे प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच हजारहून जास्त विद्यार्थ्यांनी आमच्या ट्रेनिंग सेंटर मध्ये ड्रोन विषयक धडे घेतले आहेत. नुकतेच आम्ही ड्रोन उड्डाणावरील अभ्यासक्रमांसाठी कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन स्कूल (CAATS) सोबत सामंजस्य करार केला असून आमच्यासाठी ही खूप मोठी आनंदाची गोष्ट आहे. त्यानुसार डीजीसीए चे आगामी काळातील ड्रोन उड्डाणावरील अभ्यास प्रशिक्षण वर्ग पीबीसी मार्फत घेण्यात येणार आहेत.

> आगामी काळात सीमा भागात किंवा सरक्षण विभागात टेहाळणी करण्यासाठी वापरले जाणारे ड्रोन, युद्ध किंवा आक्रमनासाठी वापरले जाणारे, डोळ्यांच्या क्षमते पलीकडे म्हणजे साधारणता ३ ते ५ किमी उंचीवरुन उडान करणारे ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचा मानस आहे.
>
> **— प्रणव चित्ते, संचालक**

## व्हीलचेअर रेसमधे १०० दिव्यांगांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "प्रयत्नांची पराकाष्ठा, मनातील जिद्द आणि सकारात्मक दृष्टी तुम्हाला यशाच्या मार्गावर घेऊन जाते. जीवनात येणाऱ्या संकटाना आत्मविश्वासाने सामोरे जात प्रामाणिक प्रयत्न केल्यास हमखास यश मिळते," असे मत माईंड पॉवर ट्रेनर व लेखक डॉ. दत्ता कोहिनकर यांनी व्यक्त केले. एनेबलर चॅरिटेबल ट्रस्ट आणि 'सक्षम'च्या वतीने प्रथमच व्हीलचेअरवरील दिव्यांग महिला व पुरुष यांच्यासाठी 'व्हीलचेअर रेस'चे आयोजन केले होते. एस. पी. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धा झाल्या.

१०० दिव्यांग बंधू-भगिनींनी सहभाग घेतला. स्पर्धा चार गटात झाल्या. स्पर्धक, पालक मिळून २५० जण उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन सीमा दाबके, अमोल शिनगारे, अशोक बोत्रे, संतोष गायकवाड, अभिजित पोवार, निलेश कांबळे, रामा चलवादी, प्रकाश शेलार, अनंत माखे, कासीम शेख, सोहेल मुलानी यांनी केले. सामान्य दिव्यांग पुरुष गटात अण्णासाहेब वाघमारे, दिपक बेंडाले, युवराज अहिरे, महिला गटात पद्मा परभणे, वैशाली इंगवले, भाग्यश्री मोरे, दिव्यांग खेळाडू पुरुष गटात सदाशिव शिंदे, रोहन ढमाले, सोमनाथ जाधव, महिला दिव्यांग खेळाडू गटात भाग्यश्री मझीरे, रेखा पडवळ व तृप्ती चोरडिया यांनी पारितोषिके मिळवली.

### स्पर्धा जिंकल्याचा आनंदोत्सव



पुणे एनेबलर चॅरिटेबल ट्रस्ट आणि 'सक्षम'च्या वतीने प्रथमच व्हीलचेअरवरील दिव्यांग महिला व पुरुष यांच्यासाठी 'व्हीलचेअर रेस'चे आयोजन केले होते.स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल लायन राजकुमार राठोड यांच्या हस्ते झाले.



# लोहगडावर श्रमदानातून शिवाजी महाराजांना अभिवादन !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ढोले पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर चेअरमन सागर ढोले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच लोहगड या ठिकाणी संपन्न झाले. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी श्रमदानातून ऐतिहासिक अशा लोहगड किल्ल्याची साफसफाई केली. आज साडेतीनशे वर्षांचा हा जाज्वल्य इतिहास आपल्याला गडांच्या माध्यमातून प्रेरणा देतो. परंतु सध्या किल्ले, गडांची दुर्दशा झालेली पाहायला मिळते. त्यामुळे अशाप्रकारे श्रमदान करून दर महिन्याला सफाई मोहीम राबविणे हि काळाची गरज झाली आहे. आणि गड व किल्ल्यांवरील स्वच्छता करून तेथील परिसर स्वच्छ ठेवणे आणि प्लास्टिकमुक्त करणे हेच खरे महाराजांना अभिवादन असेल.

लोहगडाजवळील गावातील विविध मंदिरे, शिवस्मारक, जिल्हा परिषद शाळा, सार्वजनिक ठिकाणी विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोहगड किल्ल्यावर श्रमदानातून करून अभिवादन करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रम विविध सामाजिक विषयावर विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केली. शिबिराचे आयोजन चेअरमन सागर ढोले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीकांत जगताप व विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. प्रशांत नकाते यांनी केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी अथर्व गवळी, शिवम रुद्र, साहिल राऊत, अपूर्वा चव्हाण, ईश्वरी म्हस्के, वेदांग जाधव, वैष्णवी बांगले यांनी परिश्रम घेतले.



### मान्यवरांची भेट

- शिबिरामधील व्याख्यानातून विविध विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी संचालक रोनक ढोले पाटील, प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर उपस्थित होते. या शिबिरासाठी चेअरमन सागर ढोले पाटील यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजात शेवटच्या घटकांपर्यंत पोहचून सामाजिक काम केले पाहिजे असे मत सागर ढोले पाटील यांनी व्यक्त केले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## महापालिकेच्या या सेवा आता एका क्लिकवर

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र यासह विविध सेवांचा लाभ आता शहरातील नागरिकांना घरबसल्या घेता येणार आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, डिजीलॉकर, नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य, व आपले सरकार पोर्टल यांच्यातील आवश्यक असणारे डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाले आहे. यानिमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कागदविरहित आणि नागरिकांभिमूख प्रशासनाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नोंदणी आणि मुद्रांक विभाग महाराष्ट्र राज्य यांच्यातील डेटा शेअरिंग इंटिग्रेशन पूर्ण झाल्यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील मालमत्ता हस्तांतरण ऑनलाइन पद्धतीने शक्य झाले आहे. मालमत्ता खरेदीदारांना आता मालमत्ता हस्तांतरणासाठी महानगरपालिकेत स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच नाव हस्तांतरणाची प्रक्रिया जलद झाली असून ती एका दिवसात पूर्ण होणार आहे. याशिवाय मालमत्तेच्या वापरातील निवासी ते व्यावसायिक अशा स्वरुपाचा कोणताही बदल महानगरपालिकेच्या रेकॉर्डमध्ये स्वयंचलितपणे अपडेट करणे शक्य होणार आहे.

## 'एलिव्हेटेड' मार्ग केवळ कागदावरच

**चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहरातील कासारवाडी (नाशिक फाटा) येथून नाशिक महामार्ग सुरू होतो. तेथून राजगुरुनगरपर्यंत महामार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्यांसह महामार्गाचा समावेश भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) अखत्यारित आहे. नाशिक फाट्यापासून मोशीतील इंद्रायणी नदी पुलापर्यंत रुंदीकरण व सेवा रस्ता प्रस्तावित आहे. त्यासाठी दोन वर्षांपूर्वी महापालिकेने रुंदीकरणास अडथळा ठरणारी व अतिक्रमण केलेली बांधकामे पाडली. भूसंपादन करून एनएचएआयकडे जागा सुपूर्द केली आहे. परंतु अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही. परिणामी, नागरिकांना नाशिक फाटा ते राजगुरूनगरपर्यंत वाहतूक कोंडीचा मनःस्ताप होत आहे.

## १ मार्चपासून प्रतिबंधक लसीकरण मोहीम

**चिंचवड :** सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे १ मार्च २०२५ पासून जापनीज एन्सेफलायटीस अर्थात 'जेई' प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. 'जेई' हा विषाणूजन्य आजार असून, प्रामुख्याने १५ वर्षांखालील मुलांना होतो. या आजारामुळे गंभीर मज्जातंतू विकार होण्याची शक्यता असते. याचा मृत्यूदरही अधिक आहे. 'जेई' सिंड्रोम हा देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक आहे. मृत्यूचे प्रमाण सुमारे ३० टक्के आहे आणि ३०-४० टक्के बरे झालेल्या मुलांमध्ये विशिष्ट परंतु मज्जातंतूशी संबंधित अपंगत्व आयुष्यभर राहते.

## वाढता कडाका ठरतोय पोलिसांसाठी चिंतेचे कारण

**चिंचवड :** गतवर्षी पिंपरी-चिंचवडमध्ये उच्चतम सरासरी तापमान ४३ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते. यंदा फेब्रुवारीतच उन्हाळ्याची तीव्रता सतत वाढती राहिली असून हवामानाच्या अंदाजानुसार, उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्यात शहरातील पोलिसांना डिहायड्रेशन, उष्माघात आणि त्वचेच्या तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. याचे मुख्य कारण त्यांच्या गणवेशाचा जाडाभरडा कपडा, जो उन्हाळ्यात सर्वाधिक त्रासदायक ठरतो. उष्णतेच्या झळांमुळे पोलिसांचे आरोग्य धोक्यात येत असल्याने त्यांनी एकप्रकारे उन्हाळ्याचा धसका घेतल्याचे चित्र आहे.

## जागेअभावी उपकेंद्र उभारणीस मिळेना मुहूर्त

**पिंपरी :** मोशी, भोसरी आणि इंद्रायणीनगर परिसरातील उद्योजकांना अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी असलेला उपकेंद्र विस्तारीकरणचा प्रस्ताव मंजूर असूनही जागेअभावी हा प्रकल्प अद्यापही उभा राहू शकला नाही. त्यामुळे येथील लघु व मध्यम उद्योजकांची अखंडित वीजपुरवठ्याबाबतची आशा अंधारात असून, त्यांना कोट्यवधींचा फटका बसत आहे. उपकेंद्राचे काम लवकर पूर्ण करून ते सरू करण्याची मागणी लघुउद्योग संघटनेने केली आहे. औद्योगिक शहर म्हणून नावारुपास आलेल्या पिंपरी-चिंचवडत १८ हजार मोठे व लघु व मध्यम उद्योजक आहेत. काही दिवसांमध्ये त्यात वाढ झाली आहे. सध्या वापरात असलेल्या ४५ वर्षांपूर्वीच्या वीजवाहिन्यांवरचा भार वाढतो आहे. एका फिडरवर सुमारे चारशे कंपन्यांचा भार आहे. शंभर कंपन्यांचा अतिरिक्त भार होत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. त्यामुळे एकावेळी पुरवठा बंद झाल्याने उद्योजकांचे कोट्यवधींचे नुकसान होत आहे.

## वार्षिक स्नेहसंमेलन



पुणे
वितरण : अतुल नगर वाराणसी सोसायटी येथील युरो किड्स प्री स्कूलचे उत्साहवर्धक वार्षिक स्नेह संमेलन साजरे करण्यात आले. या संमेलनामध्ये विविध सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रमांचा त्यामध्ये समावेश होता. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी महापौर अंकुश काकडे यांच्या हस्ते झाले. संचालिका माधुरी गुरनानी आणि प्राचार्य डॉ. श्रुती तापाडिया यांनी अनमोल मार्गदर्शन करून कलात्मक प्रतिभेचे उल्लेखनीय प्रदर्शन घडवून आणले. यावेळी लहान मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यांनी सादर केलेल्या कला गुणांना उपस्थित श्रोत्यांनी दाद दिली. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भोसरीत वास्तव्य करणारा बांगलादेशी अटकेत

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** तीन वेगवेगळ्या नावाने बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या एका बांगलादेशी व्यक्तीला भोसरी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास बनाचा ओढा, भोसरी येथे करण्यात आली. अटक केलेल्या आरोपीकडे नयन रतन सरकार (वय २१, रा. क्रिष्णापूर, लोहागारा, जि. नराईल, बांगलादेश), राकेश रतन सरकार (रा. घोला नादिया, पश्चिम बंगाल), सुमित शंकर भक्ता (रा. नाकाशी पारा, पश्चिम बंगाल) अशा तीन नावाची कागदपत्रे आढळून आली. त्याचे मूळ नाव नयन सरकार असे आहे. तो सध्या दिघीतील कामगार वसाहतीत वास्तव्य करत होता. त्याने बांगलादेश मधून पश्चिम बंगाल मध्ये अनधिकृतपणे घुसखोरी करून प्रवेश केला. त्यानंतर तो कामाच्या निमित्ताने भोसरीत आला होता. पश्चिम बंगाल येथील भारतीय मतदान ओळखपत्र, बांगलादेश येथील लोहागारा, जि. नराईल येथील लक्ष्मीपाशा आदर्श सेकंडरी स्कुल या शाळेचा दाखला आढळून आला. पोलिसांनी नयन याला अटक केली. परकीय नागरिक आदेश, परकीय नागरिक कायदा यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पालिका इनोव्हेशन ॲवॉर्डने सन्मानित




राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम' या प्रकल्पास 'नेट ॲप' कडून इनोव्हेशन ॲवॉर्ड, इम्पॉवरिंग बिझनेसेस थ्रू डेटा हा 'सार्वजनिक सेवामध्ये नावीन्यता' या श्रेणीमधील पुरस्कार प्राप्त झाला.पिंपरी-चिंचवड महापालिकेने नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रत्येक विभागामध्ये गतिमानता आणण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यामुळे 'नेट ॲप'ने दिलेल्या 'इनोव्हेशन ॲवॉर्ड' सारख्या महत्त्वाच्या पुरस्काराने महापालिकेला गौरवण्यात आले.

अंधेरी (मुंबई) येथील पुरस्कार सोहळ्यात क्रिकेटपटू जॉटी ऱ्होड्स यांच्या हस्ते महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

गेली अनेक वर्षे डेटाच्या माध्यमातून ज्या संस्था, खासगी कंपन्यांनी आपल्या व्यवसायामध्ये सकारात्मक बदल घडवून सुधारणा केल्या आहेत, अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित असलेल्या 'नेट ॲप'कडून डेटाच्या माध्यमातून सकारात्मक बदल घडवणाऱ्या संस्थांचा दरवर्षी गौरव केला जातो.

### पालिकेच्या उपक्रमांचे कौतुक

भारतातील नामांकित अशा खासगी, सरकारी, सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या बहुराष्ट्रीय संस्था सदर पुरस्कारासाठी सहभाग नोंदवतात. माहिती तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, डेटा व्यवस्थापन आदी क्षेत्रामधील नामवंत ज्यूरींकडून पुरस्कारांची निवड केली जाते. यामध्ये 'सार्वजनिक सेवामध्ये नावीन्यता' श्रेणीतील 'इनोव्हेशन ॲवॉर्ड' यावर्षी पिंपरी-चिंचवड महापालिकेला प्राप्त झाला असून पालिकेने राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक होत आहे.



महापालिकेने कर संकलनामध्ये वाढ व सुधारणा आणण्यासाठी 'प्रॉपर्टी टॅक्स इम्प्रोव्हमेंट प्रोग्राम' या प्रकल्पाचा अवलंब केला. यातून माहितीचे विश्लेषण करून संसाधनांचे योग्य वाटप केले. महापालिकेला 'सार्वजनिक सेवामध्ये नावीन्यता' श्रेणीतील 'इनोव्हेशन ॲवॉर्ड' गौरवाची बाब आहे. प्रशासकीय कामामध्ये सुलभता आणून नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होईल.

-**शेखर सिंह, आयुक्त**, पिंपरी-चिंचवड महापालिका

- १) पालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये यापुढे गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञान व माहिती (डेटा) विश्लेषणाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.
- २) नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये गतिशिलता आणून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका महत्त्वाची असणार आहे, असा विश्वास पिंपरी-चिंचवड महापालिकाचे अतिरिक्त आयुक्त, प्रदीप जांभळे-पाटील यांनी दिला.

## जंक्शन्सवरील बांधकामांचा मार्ग मोकळा



राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडचे रस्ते वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकू लागले आहेत. रुंद रस्ते, सेवा रस्ते आणि उड्डाणपूल असूनही, शहरातील २५ चौकांवर वाहतूक अडथळे कायम आहेत. या दररोजच्या वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (पीसीएमसी) अर्थसंकल्पात १ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या २५ जंक्शन्सवरील बांधकाम पुढील वर्षाच्या आत सुरू होणार आहे.

पीसीएमसी अर्बन मोबिलिटी डिपार्टमेंटने वाहतूक पोलिसांसह अलीकडेच शहरांमधील ८० जंक्शन्सची प्रत्यक्ष तपासणी केली. सर्वेक्षणात असे दिसून आले की यापैकी २५ जंक्शन्समध्ये वाहनांची वाढती संख्या, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि अपुऱ्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमुळे गंभीर वाहतूक कोंडी होते.

पिंपरी-चिंचवडच्या विविध भागात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर आहे. या समस्येवर उपाय म्हणून वर्षभर उपाययोजना राबवल्या जातील. परिणामी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने २५ जंक्शनसाठी १ कोटी रुपये वाटप केले आहेत. या जंक्शनवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी योजना तयार आहेत. वर्षभरात हे सर्व जंक्शन वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी लवकरच काम सुरू होईल,"

— **शेखर सिंह** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक

## अंध शाळेच्या मदतीसाठी रक्तदान

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** रक्तदान ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये तुम्ही रक्तदान करता. रक्तदान केल्याने रक्त संक्रमणाद्वारे जीव वाचू शकतात. बहुतेक लोक निरोगी असल्यास रक्तदान करू शकतात. परंतु रक्तदानाच्या काही आवश्यकता आणि काही अपात्रता आहेत. रक्तदान हा सामान्यतः गरजू लोकांना मदत करण्याचा एक जलद मार्ग आहे. हाच प्रमुख उद्देश्य डोळ्यासमोर श्री शंकर महाराज सेवा मंडळ चिंचवड आणि प्लेटमास्टर्स उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयडीसी भोसरी येथे रक्तदान शिबीर आयोजित केले होते. आयोजित रक्तदान शिबिरात ५८३ जणांनी रक्तदान केले. यावेळी एमसीसीआयएचे माजी अध्यक्ष दिपक करंदीकर, रक्ताचे नाते संस्थेचे अध्यक्ष राम बांगड, रामेश्वर राठी, प्लेटमास्टर्सचे संचालक सूर्यकांत राठी, श्रीनिवास राठी, दिलीप राठी, सुनील राठी, जमुना राठी आदी उद्योग, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्लेट मास्टर्स उद्योग समूहाकडून आळंदी येथील जागृती अंध मुलींच्या शाळेस आणि शंकर महाराज सेवा मंडळ संचलित रावेत येथील स्नेह सावली आपलं घर वृद्धाश्रमास आर्थिक मदत करण्यात आली. अंध शाळेच्या संचालिका सकीना बेदी आणि वृद्धाश्रमाचे प्रमुख डॉ अविनाश वैद्य यांच्याकडे मदतीचा धनादेश श्रीनिवास राठीनी सुपुर्त केला.



जुनी सांगवी
'स्वच्छता ही सेवा' हे ब्रीद वाक्य कायम अंगी बाणवत. आपले सफाई मित्र आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवून आपली मदत करत असतात. पवनाथडी जत्रेत त्यांनी दिलेल्या उल्लेखनीय योगदाना बद्दल त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित नागरिकांनी त्यांच्या सेवेला उस्फूर्त दाद देत अगदी मनापासून त्यांच्या कार्याचे टाळ्यांच्या गजरात खास असे गोड कौतुक केले.

# जैववैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट; गंभीर समस्या


राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिखली :** मोशी, चिखली, सांगवी, नवी सांगवी परिसरातील काही दवाखाने, औषध दुकानदारांकडून जैववैद्यकीय कचरा नदीपात्रालगत मोकळ्या जागेत टाकला जात आहे. तसेच, प्लास्टिक पिशवीत भरून रस्त्यावरदेखील फेकला जात असल्याचे निदर्शनास आल्याने पुन्हा कचरा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



शहरातील रुग्णालयांमधून मोठ्या प्रमाणावर जैववैद्यकीय कचऱ्याची निर्मिती होते. महापालिका हद्दीतील रस्त्यालगत, पदपथावर, नदीपात्राच्या कडेला जैववैद्यकीय कचरा टाकण्यात येत आहे. गोळ्या, औषधे, इंजेक्शनच्या सीरिंज असा कचरा टाकला जातो, असा नागरिकांचा आरोप आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी ३२ दवाखाने आणि आठ मोठी रुग्णालये आहेत. तर, सुमारे ७०० खासगी रुग्णालये आणि अडीच हजार लहान दवाखाने आहेत. ही रुग्णालये व दवाखान्यांतून एका दिवसात साडेतीन ते चार टन जैववैद्यकीय कचरा निर्माण होतो. हा जैववैद्यकीय कचरा गोळा करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे या कामासाठी 'पास्को' या संस्थेला कंत्राट देण्यात आले आहे. या संस्थेकडून दररोज जैववैद्यकीय कचऱ्याचे संकलन केले जाते. हा कचरा शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्याची जबाबदारी या संस्थेची आहे. मोशीतील प्रकल्पात कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते, असे संस्थेतर्फे सांगण्यात आले.



जैववैद्यकीय कचरा पदपथ, मोकळ्या जागा, रस्त्यावर टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते. ३५ हजार रुपये दंड आकारला जातो. जैववैद्यकीय कचरा रस्त्यावर टाकल्याप्रकरणी १ एप्रिल २०२४ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान एक लाख ४० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

— **सचिन पवार,** आरोग्य विभागाचे उपायुक्त

### काय आहे प्रक्रिया

- जैववैद्यकीय कचरा गोळा करण्यासाठी सध्या रुग्णालयांकडून प्रतिदिन प्रतिखाट ८.१६ रुपये दर आकारला जातो. तर, दवाखान्यांसाठी चार हजार ३९ रुपये इतके वार्षिक शुल्क घेण्यात येत आहे. पिवळा, लाल, निळा, पांढरा अशा चार प्रकारांत जैववैद्यकीय कचऱ्याची वर्गवारी केली जाते. काही कचरा जाळला जातो. तर, काही कचऱ्याचे निर्जंतुकीकरण करून भुगा केला जातो. त्यानंतर त्यावर प्रक्रिया केली जाते.

## 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार जाहीर !

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी- चिंचवड :** निगडी- प्राधिकरण येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या आत्मार्पण दिनी धर्मरक्षण, राष्ट्रहित, सेवा व शौर्य या क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या व्यक्तींना 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' देऊन मंडळातर्फे गौरविण्यात येणार आहे. पुरस्काराचे हे १७ वे वर्ष असून, या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने केले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्काराचे वितरण आकुर्डीतील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात आज २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता करण्यात येणार आहे. मंडळातर्फे यंदा स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय पुरस्कार उत्तरप्रदेश मधील सर्वोच्च न्यायालयाचे जेष्ठ विधिज्ञ ॲड. हरि शंकर जैन, ॲड. विष्णु शंकर जैन यांना जाहीर करण्यात आला आहे.

राज्यस्तरीय पुरस्कार नागपूर येथील हिंदुत्ववादी सामाजिक कार्यकर्त्या मीरा अ. कडबे यांना देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे विशेष सरकारी वकील जेष्ठ विधिज्ञ, पद्मश्री उज्ज्वल निकम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

संपादकीय विशेष

# मर्सिडिज वार्तेने गाजवलेला फड

अखिल भारतीय ९८ व्या मराठी साहित्य संमेलनातील परिसंवाद आणि वादविवादांऐवजी राजकारण्यांची मुक्ताफळे अधिक गाजली. संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक आता बिनविरोध होत असल्याने संमेलन अध्यक्षाच्या निवडीवरून होणारे वाद टळले असले, तरी साहित्य संमेलनात कोणते विषय साहित्य संमेलनाच्या तीन दिवसाच्या कार्यक्रमात ठेवायचे याचे भान अलीकडच्या काळात राहिले की नाही, असा संभ्रम निर्माण होत आहे. या वेळी साहित्य संमेलनाचा संबंध नसलेल्या; परंतु याच संमेलनाच्या संयोजकांनी दिलेल्या महादजी शिंदे पुरस्कारामुळे अगोदरच दिल्ली गाजायला लागली होती. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना हा पुरस्कार दिला गेल्याने शिवसेनेच्या ठाकरे गटाने काहूर माजवला. वास्तविक, कुणी कुणाला पुरस्कार द्यावा आणि कुणाच्या हस्ते कुणी पुरस्कार स्वीकारावा यावर अन्य लोकांनी भाष्य करण्याचे काही कारण नाही; परंतु हल्ली प्रत्येक घटना आणि घडामोड केवळ राजकीय चष्म्यातून पाहिली जात असल्याने पवार यांच्या हस्ते शिंदे यांना दिलेल्या पुरस्कारावर अकारण गदारोळ माजवला गेला. वास्तविक, हा विषय इतका ताणण्यासारखा नव्हता, तरीही ताणला गेलाच. त्यानंतर निलम गोऱ्हे यांच्या वादग्रस्त विधानांमुळे अवघे साहित्यविश्व ढवळून निघाले. त्या वादविधानांची चर्चा आणि त्यानंतरचे दावे मात्र अवघ्या राज्यात खडा सवाल उपस्थित करत आहेत.

'आम्ही बी घडलो' हा परिसंवाद साहित्याच्या व्यासपीठावर ठेवावा का, याबाबत चर्चा निश्चित होऊ शकते. राजकारण्यांना साहित्याची आवड असू शकते आणि काही राजकारणी साहित्यिकही असू शकतात; परंतु हा विषय वेगळ्या व्यासपीठावर ठेवता आला असता. संमेलनाच्या व्यासपीठावर असा विषय ठेवून साहित्य महामंडळाने काय साध्य केले, असा प्रश्न निर्माण होतो. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुलाखतीत उधळलेल्या मुक्ताफळांमुळे डॉ. तांबे यांच्यावरही स्पष्टीकरण देण्याची वेळ आली. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांच्यावरही त्यामुळे टीका झाली. वास्तविक, स्वागत अध्यक्ष आणि संमेलनाध्यक्षांचा परिसंवादातील विषय याचा फारसा संबंध असतो. किंबहुना, मराठी साहित्य महामंडळ हे स्वायत्त असून त्यांनी ठेवलेल्या कार्यक्रमांमध्ये स्वागताध्यक्षांनी हस्तेक्षप करण्याचा संबंधच येत नाही. अशा मुलाखतीत मुलाखतकारांनी कोणताही आडवा प्रश्न विचारला, तरी कोणत्या प्रश्नाला उत्तर द्यायचे आणि कोणत्या प्रश्नाचे उत्तर टाळायचे किंवा बगल द्यायची हे परिसंवादात सहभागी झालेल्याला ठरवता आले पाहिजे. आपल्या तोंडून गेलेला एखादा चुकीचा शब्द इतरांवर कात्रीसारखा वार करू शकतो, हे परिसंवादात सहभागी झालेल्या वक्त्यांनी लक्षात घ्यायला पाहिजे होते. नाव आणि प्रतिष्ठा कमवायला आयुष्य लागते पण, जिभेवर ताबा नसेल तर क्षणात आपले नाव धुळीला मिळते याचा अनुभव आता डॉ. गोऱ्हे यांना आला असेल.

मुळात डॉ. गोऱ्हे या महिला चळवळीतून पुढे आलेल्या नेत्या. महिलाविषयक अनेक संघर्षांमध्ये त्या स्वतः सहभागी झालेल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोठेवाडी दरोडा प्रकरणासह राज्यभरातील अनेक दरोडा प्रकरणात महिलांवर झालेल्या अत्याचाराचा मुद्दा त्यांनी लावून धरला. महिलांवरील अत्याचारांसंदर्भात अनेक ठिकाणी मोर्चे काढले. त्या स्वतः कविता करण्यात रस घेणाऱ्या आणि अनेक नियतकालिकांमधून त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर लेख लिहिलेले. असे असताना केवळ आपण कोणत्या व्यासपीठावरून बोलत आहोत आणि काय बोलतो आहोत, याचे औचित्य न पाळल्याने त्यांच्यावर मोठी नामुष्की ओढवली. साहित्य संमेलनाचे व्यासपीठ हे राजकीय व्यासपीठ नाही, याचे भान त्यांनी ठेवले नाही. अन्य राजकीय व्यासपीठावरून केलेले आरोप वेगळे आणि साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून केलेले आरोप वेगळे. मुळात साहित्य संमेलन हे आरोप-प्रत्यारोपासाठी नसतेच. आपल्या आरोपामुळे काय गदारोळ होऊ शकतो आणि विरोधकांच्या हाती आपण कसे कोलित देऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ. गोऱ्हे यांचे वक्तव्य. विधान परिषदेवर चार वेळा संधी मिळवणाऱ्या आणि प्रदीर्घ काळ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या अतिशय निकटच्या राहिलेल्या डॉ. गोऱ्हे यांनी याच कुटुंबावर थेट आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करावेत, यासारखा दुसरा प्रमाद नाही, हे लक्षात घेणे महत्वाचे.

शिवसेनेमध्ये दोन गट पडल्यानंतर कुठल्या गटात सहभागी व्हायचे याचा अधिकार त्यांना असला, तरी त्यांनी आता केलेला आरोप कितपत तर्कसंगत आहे, हा संशोधनाचा मुद्दा ठरावा. राजकीय पक्ष उमेदवारी देताना काय करतात हे आता सर्वज्ञात आहे, ते वेगळे सांगण्याची आवश्यकताही नाही. एक वेळ उमेदवारी देताना पैसे घेतले जातात असा आरोप केला असता, तर ते समजू शकले असते; परंतु एक पद देताना दोन मर्सिडीज कारची आवश्यकता काय, असा प्रश्न कोणी विचारल्यास उत्तर मिळू शकणार नाही. एरवी एखाद्या जाहीर सभेत अशा स्वरूपाचा आरोप खपूनही गेला असता. कारण ते व्यासपीठ वेगळे असते. साहित्य संमेलन हे अराजकीय असते. प्रदीर्घ काळ राजकारणात असलेल्या डॉ. गोऱ्हेंना त्यावरून सार्वजनिक धुणी धुण्याचे भान असू नये, याचे आश्चर्य वाटते.

नको त्या गोष्टी नको त्या ठिकाणी उच्चारल्याचे परिणाम आता त्यांना भोगावे लागत आहेत. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये पानिपत झालेल्या शिवसेनेच्या ठाकरे गटाला डॉ. गोऱ्हे यांच्या वक्तृत्वानेच संघटित व्हायची आणि रस्त्यावर यायची संधी दिली, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. ठाकरेंवर आरोप करायला गेल्यानंतर त्यांच्यावरच आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप होऊ लागले. उमेदवारी देण्यासाठी डॉ. गोऱ्हे कसे पैसे घेत होत्या इथपासून कोणाकडून साड्या घेतात, इथपर्यंतचे आरोप आता होत आहेत. त्यामुळे लोकांचा विधिमंडळातील चर्चेवरील विश्वास उडू शकतो आणि संसदेत जसे काही प्रश्न मांडायला कुणाकडून तरी भेटवस्तू, पैसे घेतले जातात, तसेच महाराष्ट्राच्या विधिमंडळातही घडते, असे आता डॉ. गोऱ्हे यांच्या प्रकरणातून होत असलेल्या आरोप-प्रत्यारोपातून पुढे आले आहे. या प्रकरणी शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये सुरु झालेले आरोप-प्रत्यारोप पाहता आपण किती खालच्या पातळीवर गेलो आहोत, हे दिसले. एकमेकांचे वस्त्रहरण करताना शिवसेनेचे दोन्ही गट निर्वस्त्र होत आहेत, याचे भान राहिले नाही, ही अशीच एक चिंतनीय बाब.

# मेगा भागीदारी आणि वास्तव

**अमेरिकेच्या आयातशुल्क वाढीच्या आणि 'अमेरिका फर्स्ट' धोरणाचा भारतातील गुंतवणूकदारांना किती फटका बसला, हे पाहता ट्रम्प सत्तेत आल्यापासून भारताच्या दृष्टीने एकही चांगली गोष्ट घडताना दिसत नाही. मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यातूनही हाती फार काही पडलेले नाही. भारतापेक्षा अमेरिकेलाच व्यापारवाढ आणि कराराचा जास्त फायदा होण्याची शक्यता आहे. ताज्या करार-मदारांच्या दुसऱ्या बाजुवर टाकलेला झोत.**

प्रकाशझोत

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

भारत-अमेरिका 'मिशन 500' च्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 2025 पर्यंत परस्पर फायदेशीर, बहुक्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार करारा (बीटीए)च्या पहिल्या टप्प्यावर वाटाघाटी करण्याची योजना जाहीर केली. दोन्ही नेत्यांनी चर्चेसाठी वरिष्ठ प्रतिनिधींची नियुक्ती करण्यास संमती दिली. मोदी यांच्या भेटीदरम्यान घोषित करण्यात आले की 'कॉम्पॅक्ट' (कॅटॅलिटिक अपॉर्च्युनिटीज फॉर मिलिटरी पार्टनरशिप, एक्सेलरेटेड कॉमर्स अँड टेक्नॉलॉजी) हा दोन राष्ट्रांमधील सहकाराच्या प्रमुख स्तंभांमध्ये परिवर्तनात्मक बदल घडवून आणणारा एक नवीन उपक्रम आहे. ट्रम्प आणि मोदी यांनी द्विपक्षीय चर्चेनंतर 'व्हाईट हाऊस'मध्ये संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. येथेच पंतप्रधानांनी या भागीदारीला मेगा असे नाव दिले, ते अमेरिकेचा मागा आणि भारताचा मिगा यांना जोडते. मोदी यांनी ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'चे वर्णन भारताच्या 'विकसित भारत संकल्प'च्या समानार्थ म्हणून केले. भारत आणि अमेरिकेचे सहकार्य एक चांगले जग घडवू शकते. ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (मागा) या ब्रीदवाक्याशी अमेरिकन लोक परिचित आहेत. अमेरिकन भाषेत विकसित भारत म्हणजे 'मेक इंडिया ग्रेट अगेन' म्हणजेच 'मिगा.' अमेरिका आणि भारत एकत्र काम करतात, म्हणजे 'मागा' अधिक 'मिगा' बनते, तेव्हा ती समृद्धीसाठी 'मेगा'भागीदारी होते. दोघांच्या उद्दिष्टांना नवीन व्यासपीठ आणि वाव देते. या संयुक्त पत्रकार परिषदेत दोन्ही नेत्यांनी भविष्यातील रणनीती सर्वांसमोर मांडली.

ट्रम्प यांनी भारत आणि चीनदरम्यान सुरू असलेल्या सीमेवरील संघर्षांचे वर्णन 'अत्यंत हिंसक' म्हणून केले आणि विवाद संपवण्यासाठी मध्यस्थीची ऑफर दिली. दोन्ही देश मिळून या समस्येवर तोडगा काढू शकतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अर्थात भारताने अमेरिकेच्या मध्यस्थीला लगेच नकार दिला. त्याचे कारण द्विपक्षीय संबंधात भारताने तिसऱ्या राष्ट्राचा हस्तक्षेप कायम अमान्य केला आहे. आता भारत-चीन वादात ट्रम्प त्यांच्या मध्यस्थीची ऑफर किती गांभीर्याने पुढे नेतील हे पहायचे आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी नवीन योजना आखण्यात आल्या असून त्यामुळे दोन्ही देशांमधील मैत्री आणि भागीदारी आणखी घट्ट होईल. अमेरिका भारताला अब्जावधी डॉलर्सची संरक्षण उपकरणे विकणार आहे. भविष्यात भारताला एफ-35 स्टेल्थ लढाऊ विमाने पुरवली जातील. 2017 मध्ये अमेरिकेन प्रशासनाने 'क्वाड' सुरक्षा भागीदारी पुन्हा सक्रिय केली. त्यात भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांचा समावेश आहे. 'इंडो-पॅसिफिक' क्षेत्रात शांतता राखण्यासाठी हे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

कट्टर इस्लामिक दहशतवादाचा सामना करण्यासाठी दोन्ही देश पूवपेक्षा अधिक मजबूतपणे काम करतील, असे सांगून ट्रम्प यांनी दहशतवादाविरुद्ध भारत आणि अमेरिका यांच्या संयुक्त प्रयत्नांवर भर दिला. मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीत दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध सुधारण्याचे आश्वासन देण्यात आले. अमेरिकेने दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापाराला चालना देण्यासाठी 'मिशन 500' ची घोषणा केली आहे. 'मिशन 500'अंतर्गत भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार 2030 पर्यंत 500 अब्ज डॉलर्सपर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. दोन्ही नेत्यांनी आपले नागरिक अधिक समृद्ध व्हावेत, देश मजबूत व्हावेत, अर्थव्यवस्था अधिक नावीन्यपूर्ण बनावी आणि पुरवठा साखळी अधिक लवचिक बनवण्यासाठी व्यापार आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचे वचन दिले आहे.





भारत आणि अमेरिका यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी नवीन योजना आखण्यात आल्या असून त्यामुळे दोन्ही देशांमधील मैत्री आणि भागीदारी आणखी घट्ट होईल. अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या भारतीय नागरिकांना परत घेण्याच्या भारताच्याचनबद्धतेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. ट्रम्प यांनी 26/11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाला भारताकडे सोपवण्याची घोषणा केली. अर्थात दोन्ही देशांत प्रत्यार्पणाचा करार फार पूवच झाला आहे. अमेरिकेच्या न्यायालयाने राणाच्या प्रत्यार्पणाचा आदेश दिला.

भारत अमेरिकन आण्विक तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या कायद्यात सुधारणा करणार आहे. ऊर्जेबाबतच्या महत्त्वपूर्ण करारामुळे अमेरिका भारताला तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा करणारा महत्त्वाचा देश बनणार आहे. रशिया-युक्रेन वाद सोडवण्यासाठी ट्रम्प यांनी केलेल्या प्रयत्नांचे मोदी यांनी स्वागत केले आणि हा वाद वाटाघाटीच्या टेबलवर सोडवला जावा, या भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. भारत तटस्थ आहे असा अनेकांचा गैरसमज आहे; भारत तटस्थ नाही. आम्ही शांततेच्या बाजूने आहोत, असे ते म्हणाले. भारत-अमेरिकेने 123 नागरी आण्विक करार लागू करण्याचा संकल्प केला. भारतात अमेरिकन डिझाइन अणुभट्ट्या बांधण्यासाठी तांत्रिक सहकार्य केले जाईल आणि गुंतवणुकीला चालना दिली जाईल.

भारत-अमेरिकेसाठी अंतराळ सहकार्याचे ऐतिहासिक वर्ष म्हणून 2025 ची घोषणा करण्यात आली. 'नासा-इस्त्रो' मिशन अंतर्गत भारतीय अंतराळवीराला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर (आयएसएस) पाठवण्याची आणि 'निसार उपग्रह मोहीम' लवकरच प्रक्षेपित करण्याची योजना आहे. भारत पुढील 'क्वाड' शिखर परिषदेचा यजमान आहे. दोन्ही देश सागरी सुरक्षा आणि नैसर्गिक आपत्तींच्या काळात सहकार्य वाढवण्यासाठी नवीन उपक्रम सुरू करतील. मोदी आणि ट्रम्प यांची 'वेव्ह लेंग्थ' जुळत असली आणि दोघे परस्परांना मित्र मानत असले, तरी मोदी यांचा अमेरिकेचा दौरा संबंध दृढ करणारा ठरला; परंतु दोन्ही देशातील तिढा मोदी यांच्या भेटीनंतर ही कायम राहिला.


मोदी यांचे यापूवचे अमेरिका दौरे गाजले, तसा हा दौरा फारसे हाती काही न पडता पार पडला. यापूवच्या दौऱ्यांमध्ये मोदी यांचे अमेरिकेत जल्लोषात स्वागत व्हायचे. अमेरिकेबरोबरच्या करारात भारताची बाजू वरचढ असायची. या वेळी प्रथमच उलटे घडले. भारताला जशी अमेरिकेची गरज आहे, तशीच किंबहुना त्याहून अधिक दक्षिण आशियात अमेरिकेला भारताची आहे. चीन आणि रशियाला शह देण्यासाठी त्या देशाला भारताची मदत हवी आहे. एकीकडे दक्षिण आशियामध्ये भारताची गरज असताना मोदी यांच्या दौऱ्यापूव अमेरिकेने इराणबाबत घेतलेल्या निर्णयाचा चाबहार बंदराच्या विकासावर परिणाम होण्याची शक्यता आहे. भारताला मध्यपूर्वेत संपर्कासाठी आणि चीन-पाकिस्तानला शह देण्यासाठी चाबहार बंदराची गरज आहे. असे असताना अमेरिकेचे इराणमधील पाऊल मात्र भारताची कोंडी करणारे आहे.

ट्रम्प यांनी मोदी यांच्याशी चर्चेनंतर घोषणा केली की भारत व्यापार तूट कमी करण्यासाठी एफ-35 लढाऊ विमानांसह अमेरिकेकडून अधिक तेल, वायू आणि लष्करी उपकरणे खरेदी करेल; पण दोन्ही देशांनी जारी केलेल्या संयुक्त निवेदनात एफ-35 विमानांच्या खरेदीचा कोणताही उल्लेख नाही. मोदी आणि ट्रम्प यांच्या पत्रकार परिषदेनंतर भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनीही सांगितले की सध्या एफ-35 खरेदी करणे हा केवळ एक प्रस्ताव आहे. या खरेदीसाठी कोणतीही औपचारिक प्रक्रिया सुरू झालेली नाही. अमेरिकेच्या एफ-35 विमानाबाबत जगभरात ओरड आहे. आता ती कुणी खरेदी करायला तयार नाही. अमेरिकेच्या शस्त्रास्त्र बाजारपेठेला आव्हान मिळाले असून थेट दक्षिण अमेरिकेतील काही देशांपर्यंत चीनची शस्त्रास्त्रे आणि आर्थिक मदतही जात आहे. या पार्श्वभूमीवर न खपणारी विमाने भारताच्या माथी मारून ट्रम्प तिथल्या शस्त्रास्त्र उत्पादक कंपन्यांचे भले करू इच्छितात. त्याचबरोबर भारताशी असलेले व्यापारी असंतुलन कमी करण्यावर त्यांचा भर आहे.

फिटनेस फंडा

## मेंदू तल्लख राहण्यासाठी...

दोस्तांनो, तुमच्यापैकी बऱ्याचजणांना सुडोकू, शब्दकोडी सोडवायची सवय असेल. तुम्हीही वेळ मिळेल तेव्हा वा खास वेळ काढून सुडोकू, शब्दकोडी सोडवत असाल. यामुळे मेंदूला खाद्य मिळतं, मेंदू तल्लख बनतो, हेही तुम्हाला माहीत असेल. परंतु सगळेच शब्दकोडी, सुडोकू सोडवत नाहीत. अशा वेळी मेंदू तल्लख बनवण्यासाठी काही व्यायामही करता येतील. त्याविषयी...



✻ धावल्यामुळे शरीर तंदुरूस्त होतं. शिवाय मेंदूही तल्लख होतो. धावल्यामुळे मेंदूत नव्या पेशींची निर्मिती होते. यामुळे मेंदू नव्या गोष्टी लवकर आत्मसात करतो. शिवाय स्मरणशक्तीही सुधारते. धावल्यामुळे मेंदू ताण सुलभपणे हाताळतो. मेंदूची कार्यक्षमताही सुधारते. ✻ मेंदूचं आरोग्य सुधारण्यासाठी एअरोबिक्स करता येईल. आठवड्यातली १५० मिनिटं सौम्य ते मध्यम स्वरूपाचा एअरोबिक्स व्यायाम केल्यामुळे मेंदूला खूप लाभ होतात. ✻ सायकल चालवल्यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते. यामुळे नव्या पेशींची निर्मिती होऊन मेंदूला चालना मिळते. ✻ ध्यानधारणेमुळे मेंदूला बरेच लाभ होतात. मेडिटेशन केल्यामुळे मन शांत होते, एकाग्रता वाढते. स्मरणशक्ती सुधारणं आणि ताण कमी करण्यासाठी मेडिटेशन करावं.

खेचाखेची

## कुठे होतास?

एके दिवशी वर्गात इतिहासाचा तास सुरू असतो. शिक्षक पोटतिडिकीने शिकवत असतात. मात्र, त्या शिकवण्यासाठी एकाचं लक्ष नसतं. शिक्षक त्याला एक प्रश्न विचारतात.

**शिक्षक** : सांग, राक्षसभुवनची लढाई कोणा कोणात झाली?


**विद्यार्थी** : सर, त्या लढाईच्या तासाला मी वर्गात हजर नव्हतो.

**शिक्षक** : मग कोठे होतास?

**विद्यार्थी** : सर, त्यावेळी मी संतोष भुवनमध्ये होता.

वेगळं काही

डेन्मार्कच्या कोपनहेगनमधून व्होडक्याची सर्वात महाग बाटली चोरीला जाण्याची घटना बहुचर्चित ठरली. व्होडकाची ही बाटली तब्बल ९ कोटी रूपये किंमतीची होती. ३ किलो सोनं आणि तेवढ्याच चांदीपासून ती तयार करण्यात आली होती. बाटलीच्या झाकणावर मौल्यवान हिरे जडवण्यात आले होते. या वैशिष्ट्यांमुळेच ही बाटली अनेकांच्या आकर्षणाचं केंद्र बनली होती. सहा किलो वजनाची ही बाटली कोपनहेगनमधल्या 'कॅफे ३३' मध्ये ठेवण्यात आली होती. तिच्यावर १९१२ च्या 'मॉन्टे कार्लो कार रॅली' मधल्या गाड्यांच्या लेदरचे पट्टेही लावण्यात आले होते. अमेरिकन टीव्हीवरच्या 'हाऊस ऑफ कार्डस' या मालिकेत ही बाटली दाखवण्यात आली होती.




राशीभविष्य

- **मेष** : प्रसन्नतेमुळे कामाचं सार्थक होईल. भेटवस्तू मिळण्याची शक्यता आहे. स्थावर, वाहनसौख्य लाभेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. गुंतवणुकीतून चांगला मोबदला मिळेल. चिंता नको.
- **मिथुन** : विनयशील राहून आपली कामं पार पाडा. प्रत्येक कामात यश मिळणार आहे. आनंदी रहाल.
- **कर्क** : गृहपयोगी वस्तूंची खरेदी कराल. दूरदर्शीपणा ठेवून कार्य करावं. व्यापारात अनुकूलता लाभेल.
- **सिंह** : अधिकारी वर्ग आपल्या कामाची स्तुती करतील. कलागुणांचा विकास होईल. अडचणी सुटतील.
- **कन्या** : आपलं ध्यय निशिचत करुन मार्गक्रमण करा. मन प्रसन्न राहील. स्थावर सौख्य लाभेल.
- **तूळ** : मनाप्रमाणे यश मिळेल. मानसिक समाधान लाभेल. कार्यक्षमतेत वाढ होईल. वेळीच निर्णय घ्यावे.
- **वृश्चिक** : धनार्जनाचे नवे मार्ग लाभतील. जोखमीच्या कामांपासून दूर रहावं. नवीन गुंतवणूक टाळावी.
- **धनु** : दुसऱ्याच्या भरवशावर राहून महत्त्वाची कामं हाती घेऊ नका. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना.
- **मकर** : आपली योग्यता ओळखून वेळीच योग्य निर्णय घ्यावे. मुलांची प्रगती होईल. अडचणी सुटतील.
- **कुंभ** : पराक्रमामुळे प्रगतीचं कौतुक होईल. व्यापारात अनुकूलता वाढेल. मित्रांची मदत मिळू शकेल.
- **मीन** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. अडचणी कमी होतील. वाहनांचा वापर जपून करायला हवा.

सल्ला मोलाचा

## वेगळी भटकंती

भटकंती सगळ्यांनाच आवडते. पण केवळ घराबाहेर पडणं म्हणजे भटकंती नव्हे तर त्यामागे काही प्रयोजन असायला हवं. हेच तुमच्याही मनात असेल तर तर करुन पहा हे प्रयोग...

✻ धाडसी ट्रॅव्हलिंग – भटकंती आणि फिटनेस या दोहोंचा सुवर्णमध्य साधायचा असेल तर भटकंतीचा हा प्रकार योग्य आहे. या सहलींदरम्यान तुम्ही रिव्हर राफ्टिंग, रॉक क्लायंबिंग, हायकिंग यासारख्या प्रकारांची मजा घेऊ शकता. शहरातील ॲडव्हेंचर ट्रीपचं आयोजन करणाऱ्या ग्रुपशी संपर्क साधून तुम्ही या भटकंतीचा आनंद घेऊ शकता. ✻ स्वदेश भ्रमंती– देशांतर्गत भटकंतीचा खर्च तुलनेने कमी येतो. प्लॅनिंग करताना फारशा अड्चणी येत नाहीत. पासपोर्ट–व्हिसाची कटकट नसते. बॅगपॅक घेऊन तुम्ही कधीही प्रवासाला निघू शकता.

✻ सांस्कृतिक वारशाशी जोडणी– पर्यटकांना सांस्कृतिक ठेव्याशी जोडून घ्यायला आवडतं. अशा वेळी विशिष्ट ठिकाणी साजरे केले जाणारे उत्सव, कार्निव्हल्स, कॉन्सर्टसकडे त्यांचं लक्ष असतं. तुम्हीही विविध संस्कृतींची माहिती घेऊ इच्छित असाल तर ट्रॅव्हलिंगच्या या प्रकारातून आनंद मिळवा.

दिनविशेष

## २६ फेब्रुवारी

**१९६६** : थोर क्रांतिकारी विनायक दामोदर सावरकर यांचे निधन.
**२००४** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचे निधन.
**२०१४** : भारताने अशिया करंडक क्रिकेट स्पर्धेतील सलामीच्या लढतीत विजय मिळवला.
**२०१६** : पठाणकोट हल्ल्याच्या चौकशीसाठी पाकिस्तानने पाच सदस्यांच्या संयुक्त चौकशी पथकाची स्थापना केली.
**२०१८** : मेघालय आणि नागालँडमध्ये विधानसभेच्या जागांसाठी मतदान संपन्न.

महत्त्वपूर्ण काही...

## ग्रंथींचं महत्त्व जाणा

शरीरातल्या विविध भागांमध्ये अनेक ग्रंथी अस्तित्त्वात असतात. आकाराने लहान असल्या तरी त्या अनेक महत्त्वाच्या घटकांची निर्मिती करतात. लाळ, घाम आणि अश्रू यांची निर्मिती संबंधित ग्रंथीच करतात. काही ग्रंथींमधून हार्मोन्सची निर्मिती होते. शरीराच्या योग्य वाढीसाठी हार्मोन्स गरजेचे असतात. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे विविध विकार जडू शकतात.

रोगप्रतिकारक क्षमतेतही ग्रंथींचं कार्य महत्त्वाचं मानलं जातं. ग्रंथींमधून स्त्रवणाऱ्या विविध घटकांमुळे रोगांपासून शरीराचं संरक्षण होतं. आजारी पडल्यावर बरं होण्यासाठीही ग्रंथीच मदत करतात. त्यामुळे त्या निरोगी राहणं गरजेचं असतं.

थायरॉइड ग्रंथी खूप महत्त्वाच्या मानल्या जातात. या ग्रंथी टी ४ आणि टी ३ या हार्मोन्सची निर्मिती करतात. शरीरातल्या विविध पेशींचं कार्य सुरळीत सुरू राहण्यासाठी थायरॉइड संप्रेरकांची गरज असते. लहान मुलांच्या वाढीत या हार्मोन्सची महत्त्वाची भूमिका असते. या ग्रंथींचा आकार छोट्या फुलपाखरासारखा असतो. त्या गळ्याच्या खालच्या बाजूला असतात. या ग्रंथींच्या कार्यात अडथळे आल्याने बरेच विकार जडू शकतात. त्यामुळे ग्रंथी निरोगी ठेवणं हे आपलं काम आहे.

पंचांग

**बुधवार, २६ फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ १३, महाशिवरात्री
नक्षत्र : श्रवण,
चंद्रराशी : मकर, योग : परिघ,
सूर्योदय : ७.०१, सूर्यास्त : ६.४१

फॉरवर्डस


मनामनाला बांधून ठेवणारे धागे दिसत नसले तरी हे बंध निश्चित हवेहवेसे वाटणारे असतात.

**कितने अजीब होते हैं
ना कुछ बंधन, कोई डोर नहीं
फिर भी बंध जाते है मन।**

आरोग्यमंत्र

## थकवा येतोय?

आजकाल विविध क्षेत्रात वाढलेली स्पर्धा, त्यात टिकण्यासाठी करावी लागणारी धडपडत तसंच कामाचा वाढता ताण याचा आरोग्यावर विपरित परिणाम दिसून येत आहे. विविध विकारांचं प्रमाण वाढत आहे. त्यात थकवा येण्याच्या तक्रारीचा समावेश होतो. व्यग्रता जाणवणं, कोणत्याही कामात मन न लागणं, औदासिन्य भेडसावणं, कमालीचा थकवा जाणवणं या आणि अशा तक्रारी वारंवार भेडसावत असतील तर तुम्हाला बर्न आऊटची समस्या असू शकते. या समस्येची लक्षणं जाणून घ्यायला हवी.



✻ सतत जाणवणारा थकवा शारीरिक, मानसिक किंवा भावनिकही असू शकतो. ✻ कोणतंही काम करताना उत्साह वाटत नाही. अशा वेळी डॉक्टरांचा सल्ला घेण्याची तसंच आरामाची गरज आहे असं समजावं. ✻ अशा वेळी दैनंदिन काम हे ओझं वाटू शकतं. मनात नकारात्मक भावनांनी घर केलं असेल तर गडबडून न जाता स्वतःच्या भावनांवर नियंत्रण राखणं गरजेचं असतं. ✻ लक्ष केंद्रित होत नसेल, ताण–तणावांमुळे गांगरून गेला असाल तर ही परिस्थिती गंभीर मानसिक विकारांकडे अंगुलीनिर्देश करते, असं समजावं. ✻ तुमची शारीरिक क्षमता नष्ट होणं हे काही मोठ्या आजारांचं लक्षणं असू शकतं. त्यामुळे सर्वप्रथम सगळ्या तपासण्या करुन घ्या. आपल्या कामाचं स्वरूप समजून घेऊन प्राधान्यक्रम ठरवा. यामुळे काही प्रमाणात त्रास कमी होतोय का ते पहा. त्रास कमी झाला नाही तर मात्र त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

वाचा तर खरं

✻ बाईकची निवड सर्वात महत्त्वाची असते. सुरूवातीला १०० सीसीची बाईक निवडा. ती तीन ते चार वर्ष वापरा. एकदम अधिक अंतराचा प्रवास टाळा. बाईक चालवण्याची सवय झाल्यानंतर अधिक क्षमतेची बाईक घेण्याचा विचार करा. ✻ बाईक शिकण्याच्या सुरूवातीच्या टप्प्यात एका वेळी जास्त अंतर कापलं तर शरीरावर ताण येऊ शकतो. दुखापत होण्याची शक्यता असते. ✻ ड्रायव्हिंगच्या प्राथमिक टप्प्यात दुर्गम भाग किंवा ग्रामीण भाग टाळा. याठिकाणी फारशा सुविधा नसतात. बाईक खराब झाली किंवा तुम्हाला दुखापत झाली तर तातडीने मदत मिळत नाही.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# अजितदादांचा कामाचा धडाका कायम!

## बारामती आणि बीड येथे पशुवैद्यकीय महाविद्यालय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मान्यता दिली. मागील जानेवारी महिन्यात बारामती येथे आयोजित 'कृषिक-२०२५' प्रदर्शनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती आणि बीड जिल्ह्यात परळी येथे नवीन कृषी महाविद्यालय स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महिन्याभरातच सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या प्रस्तावांना आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रशासकीय कौशल्य आणि कामाचा झपाटा पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीनं पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. आज मंजूरी मिळालेल्या बारामती आणि परळी येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी ही पशुवैद्यकीय महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

बारामती येथे जानेवारी महिन्यात आयोजित 'कृषिक-२०२५' कृषी प्रदर्शनात, शेतकरी आणि पशुपालकांनी बारामतीमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील, अशी घोषणा अजितदादांनी सभेत केली होती. त्यानंतर महिन्यातच अजितदादांनी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली. बारामतीतील कऱ्हावागज येथे ८२ एकर आणि परळीच्या लोणी येथे ७५ एकर जागेवर ही शासकीय महाविद्यालये उभारली जाणार आहेत.



"हिवरे पाणीपुरवठा योजनेंतर्गत पाण्याची उपलब्धता, लोकसंख्या आणि नागरिकांची वाढीव पाण्याची गरज लक्षात घेऊन यंत्रणांनी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देत यासाठीचा आवश्यक तो निधी राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिला जाईल."

— **अजित पवार,** उपमुख्यमंत्री



## रांजणगावकरांना मिळाली पाण्याची योजना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीचे धार्मिक तसेच तीर्थक्षेत्र पर्यटन क्षेत्र आहे. या बरोबरच रांजणगावच्या ग्रामपंचायत हद्दीत 'एमआयडीसी' आहे. यामुळे या भागात स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक आहे. भविष्यातील या क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशन अंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज (२५ फेब्रूवारी) संबंधित अधिकारी आणि विभागाला दिल्या आहेत.

शिरुर तालुक्यातील रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीचे आध्यात्मिक, तीर्थपर्यटनाच्या दृष्टीने असलेले महत्त्व तसेच ग्रामपंचायत हद्दीत 'औद्योगिक वसाहत' असल्यामुळे या क्षेत्रात स्थलांतरीत लोकसंख्येचे प्रमाण अधिक असून, भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणीपुरवठा योजना तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना अजित पवार यांनी संबंधित अधिकारी आणि यंत्रणांना दिल्या. रांजणगावची भविष्यातील गरज ओळखून ग्रामपंचायत परिसरात मोठ्या क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून निधी देण्यात येईल, त्यासोबत ग्रामपंचायतीच्या वाट्यासह 'सीएसआर' निधी उभारण्याच्या सूचना त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिल्या.

रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीच्या विविध प्रश्नांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, माजी मंत्री आमदार दिलीपराव वळसे पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओपी गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक कुणाल खेमनार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता वैशाली आवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे जनरल मॅनेजर (भूसंपादन) बप्पासाहेब थोरात, आंबेगाव-शिरुर विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील, आंबेगाव- शिरुर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमोल जगताप, कामगार कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष तथा रांजणगाव गणपतीचे उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर पाटील, प्रा माणिक खेडकर, रांजणगाव गणपती विविध सोसायटीचे माजी चेअरमन महेश फंड, युवा उद्योजक राहुल शेळके, प्रतापराजे फंड, दिपक खैरे यांच्यासह संबंधित विभाग व यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जलजीवन मिशनअंतर्गत घोड धरणावरून नवीन पाणी पुरवठा योजना तातडीने मार्गी लावावी, रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येला आवश्यक नागरी सुविधा देण्यासाठी पुरेशा क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे आवश्यक आहे, त्यासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती, स्वच्छ भारत मिशनमधून देण्यात येईल, ग्रामपंचायतीच्या हिश्श्यासह उद्योजकांकडून सीएसआर निधी उभारण्यात यावा. रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसांवगी या ग्रामपंचायतीकडून सूचविण्यात आलेली विकासकामे 'औद्योगिक विकास महामंडळामार्फत' करण्याच्या सूचना त्यांनी औद्योगिक विकास महामंडळा च्या अधिकाऱ्यांना दिल्या.

## At a Glance

### मंत्रालयात तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**मुंबई :** पुन्हा एकदा एका तरुणानं मंत्रालयात आत्महत्येचा प्रयत्न केला आहे. त्याने मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारली आहे. सुदैवानं तो मंत्रालयात लावण्यात आलेल्या सुरक्षा जाळीत अडकल्यानं मोठा अनर्थ टळला आहे. या तरुणाचा जीव वाचला आहे. अंदाजे ४० ते ४५ वर्षांच्या आसपास या तरुणाचं वय आहे. तरुणानं मंत्रालयाच्या चौथ्या मजल्यावरून उडी मारली. त्यानंतर तो तिथे लावण्यात आलेल्या संरक्षण जाळीत अडकला, या घटनेनं एकच धावपळ उडाली. तिथे उपस्थित असलेले पोलीस या तरुणाला जाळीत बाहेर काढण्यासाठी धावले.

### ४७ सागरी कासव पिल्लांनी घेतली समुद्रात झेप

**रत्नागिरी :** रत्नागिरी तालुक्यातील गणपतीपुळे येथील समुद्रकिनाऱ्यावर राबविण्यात येणाऱ्या सागरी कासव संरक्षण आणि संवर्धन मोहिमेंतर्गत कासव मित्रांच्या विशेष सहकार्याने ४७ सागरी कासव पिल्ले समुद्रात सोडण्यात आली. गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या अंडी उबवणी केंद्रात सुमारे १३७ समुद्री कासवांची अंडी संरक्षित करण्यात आली होती. त्यातील ४७ कासवांची पिल्ले सुरक्षित समुद्रात सोडण्यात आली आहेत. गणपतीपुळे येथे समुद्र किनाऱ्यावर कांदळवन दक्षिण विभाग परिक्षेत्र रत्नागिरीच्या वतीने सागरी कासव संरक्षण मोहीम अंतर्गत अंडी उबवणी केंद्रामध्ये कासवांच्या संरक्षित प्रजाती तयार केल्या जात आहेत.

# लाल चंद्र १४ मार्चला दिसणार!

## २०२२ नंतर आता हे अद्भूत दृश्य पाहायला मिळणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** पुढच्या महिन्यात एक अद्भूत घटना घडणार आहे. मार्च महिन्यात अशी घटना घडणार आहे की, ज्याची खगोल शास्त्रज्ञ गेल्या अनेक वर्षापासून वाट पाहत आहेत. पुढच्या महिन्यात पूर्ण चंद्र ग्रहण लागणार आहे. पूर्ण चंद्र ग्रहणाला ब्लड मून म्हटले जाते. २०२२ नंतर आता हे अद्भूत दृश्य पाहायला मिळणार आहे. गेल्यावेळी पूर्ण चंद्र ग्रहण ८ नोव्हेंबर २०२२ रोजी लागले होते. हा ब्लड मून जगातील काही देशात दिसला होता. संपूर्ण रक्तासारखा लाल चंद्र दिसला होता.

यंदाच्या वर्षातील पहिले चंद्र ग्रहण १४ मार्च रोजी फाल्गुन शुक्ल पौर्णिमेला लागणार आहे. हे पूर्ण चंद्र ग्रहण असेल. पण भारतात हे चंद्र ग्रहण किंवा ब्लड मून दिसणार नाही. पूर्ण चंद्र ग्रहण जवळपास ६५ मिनिटे लागेल. ग्रहणाच्या वेळी चंद्राचा सफेद रंग बदलून फिक्कट किंवा भूरकट लाल रंग होईल. चंद्र ग्रहण रात्री ११ वाजून ५७ मिनिटांनी सुरू होईल. आणि पहाटे ६ वाजता संपेल.

'ब्लड मून' हा शब्द पूर्ण चंद्र ग्रहणासाठी वापरला जातो. जेव्हा पृथ्वीची संपूर्ण सावली चंद्रावर पडते तेव्हा पूर्ण चंद्र ग्रहण होते. जेव्हा सूर्याचा प्रकाश पृथ्वीच्या वायु मंडळातून जातो, तेव्हा त्यातून निळा आणि हिरवा प्रकाश येतो. तसेच लाल आणि नारंगी प्रकाश चंद्रावर पडतो. त्यामुळे चंद्र लाल किंवा फिक्कट लाल रंगात दिसतो. त्यालाच ब्लड मून म्हटले जाते. यावेळी ब्लड मून दक्षिण अमेरिका, कॅनडा, मॅक्सिको, ब्राझिल आणि चिली, यूरोप आणि आफ्रिकेतील काही भागात आंशिक दिसणार आहे. उघड्या आकाशात लाल चंद्र स्पष्टपणे दिसेल.

### अमेरिकेत १३ मार्चला दिसणार ब्लड मून

● उत्तर अमेरिकेत चंद्र ग्रहण १३ मार्च रोजी दिसेल. पूर्व क्षेत्रात आंशिक ग्रहण रात्री १ वाजून ९ मिनिटांनी आणि पूर्ण ग्रहणाचा अवधी २ वाजून २६ मिनिटांपासून ३ वाजून ३२ मिनिटापर्यंत राहील. पश्चिम क्षेत्रात चंद्रग्रहणाबाबत सांगायचं तर आंशिक ग्रहण रात्री १० वाजून ९ मिनिट आणि पूर्ण ग्रहण ११ वाजून २६ मिनिटापासून १२ वाजून ३२ मिनिटापर्यंत असेल.



### लालूप्रसाद हाजीर हो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबीयांना रेल्वे जमीन घोटाळ्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. बिहारचे माजी मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव, त्यांचे पुत्र तेजप्रताप यादव आणि मुलगी हेमा यादव यांच्यासह ७८ अन्य आरोपी आहेत. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) दाखल केलेल्या सर्व आरोपपत्रांची दखल घेत न्यायालयाने सर्व आरोपींना ११ मार्च रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले. सीबीआयचे विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी मंगळवारी आरोपींना समन्स बजावले.सीबीआयच्या तिन्ही आरोपपत्रांवर एकत्रित सुनावणी होईल, असे राऊज ॲव्हेन्यू कोर्टाने म्हटले आहे.

# 'लाडकी बहीण' चे सर्वेक्षण थांबले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी शासनाचा प्रोत्साहन भत्ता हा अजूनही अंगणवाडी सेविकांना मिळाला नसल्याने अंगणवाडी सेविकांनी लाडकी बहीणचे सर्वेक्षण करण्यास नकार दिल्याने लाडकी बहीणचे सर्वेक्षण थांबले आहे.

दरम्यान, महिलांसाठी सुरू केलेल्या 'लाडकी बहीण योजने'त नियमांमध्ये न बसणा-या महिलांचे अर्ज बाद केले जात आहेत. या सर्वेक्षणासाठी अंगणवाडी सेविकांनी नकार दिला आहे. या योजनेत महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा होतात. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर सरकारकडून ही योजना सुरू करण्यात आली होती. लाडकी बहीण योजनेचा एक अर्ज भरून देण्यासाठी पन्नास रुपये प्रोत्साहन भत्ता सरकार अंगणवाडी सेविकांना देणार होते. मात्र, अजून त्यांना कोणत्याही प्रकारचा भत्ता सरकारकडून मिळाला नाही.

ऐन निवडणुकीच्या तोंडावरच ही योजना सुरू करण्यात आली. या योजनेसाठी अर्ज करणा-यांसाठी काही नियम व अटीही लागू करण्यात आल्या होत्या. मात्र, त्यावेळी या नियम आणि अटीमध्ये न बसणा-या महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतला. आता योजनेच्या निकषात न बसणा-या महिलांना योजनेचा हप्ता मिळणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या भागातून तक्रारी आल्या, त्या भागांमध्ये सर्वेक्षण करून नियम आणि अटीत न बसणा-या महिलांचे अर्ज बाद केले जाणार आहेत.



पान १ वरून

### मकोका टिकणार का?

घेण्यापासून ते आर्थिक भ्रष्टाचार आणि हत्या करण्यापर्यंत अनेक गुन्हे सातत्याने घडत असतात.

कदाचित कोथरूड हे सर्वात मोठे आर्थिक हब म्हणून पुढे येत असल्यामुळे येथे गुन्हेगारी देखील छुप्या पावलाने रुजत असल्याचे दिसते. दोन दिवसांपूर्वी तर किरकोळ वादातून चक्क गोळी झाडून आणि तलवारीने वार करून 10 जणांच्या टोळक्याने एका तरुणाचा निर्घृण खून केल्याची घटना घडली .

कोथरूडमध्ये सर्वात सभ्य मानल्या जाणाऱ्या शास्त्रीनगर येथे दत्त मंदिराजवळ हा प्रकार घडला.

कोथरूडचा कुठलाही भाग आता सुरक्षित राहिलेला नाही हेच यावरून दिसून येते. या गुंडांचे धाडस, त्यांच्याकडे येणारी हत्यारे, सर्रास बंदुकांचा वापर, नंग्या तलवारी नाचवणे हे प्रकार पोलिसांना कसे दिसत नाहीत ? याचे आश्चर्य येथे नागरिकांना वाटत राहते.

**पोलिसांना फ्रीहँड का नाही ?**

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी येथे रुजू झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी गुंडांची परेड घेतली . त्यावेळी सर्व माध्यमांनी किती करारी आणि धाडसी आयुक्त लाभला आहे याचे गुणगौरव केले . परंतु गुंडगिरीमध्ये काहीही फरक पडला नाही. स्वतः देवेंद्र फडणवीस हे त्या खात्याचे मंत्री असल्यामुळे ते मजबुरीने या सगळ्या खात्याला अंजारून जी गोंजारून घेतात, पोलिसांचे मनोबळ वाढविले तर ते कार्यक्षम होतील असा त्यांचा आशावाद असावा, परंतु स्पष्ट वक्ते असणारे अजित पवार यांनी मात्र आयुक्तांची चांगलीच खरडपट्टी काढली होती. चंद्रकांत दादा हे फारसे आक्रमक नाहीत परंतु त्यांनी कोथरूडच्या सुरक्षेसाठी आग्रही भूमिका घेतली पाहिजे अशी सर्वसामान्य मतदारांची अपेक्षा आहे. कार्यकर्त्यांवरती हल्ल्यामुळे मुरलीधर मोहोळ जसे आक्रमक दिसले तसे त्यांनी कायमस्वरूपी आक्रमक असावे असे कोथरूडकरांना वाटते.

पोलिसांना जर फ्रीहँड दिला आणि कुठल्याही आजी, माजी महापौर, नगरसेवक, आमदार, मंत्र्यांनी फोन केले नाहीत तर यातील गुंडगिरी निपटून काढण्यात पोलीस हे सक्षम आहेत . परंतु त्यांना तसे काम करू दिले पाहिजे अशी चर्चा खुद्द पोलीस प्रशासनामध्येच आहे.

**भाजपाकडून अपेक्षा**

या सगळ्या पार्श्वभूमीवर अशांत असलेला कोथरूड आता शांत व्हावा एक केंद्रीय मंत्री, राज्याचे दोन मंत्री, राज्यसभेचे खासदार इतकं सगळं कोथरूडला देऊन देखील भाजपा महायुतीचे सरकार कोथरूड शांत ठेवू शकत नसेल तर कुठेतरी कोथरूडकाराचा हा विश्वास सांभाळण्यात पक्ष कमी पडला असेच म्हणावे लागेल .

### आम आदमीच्या आमदारांचे निलंबन

मद्य धोरणाबाबत कॅगचा हा अहवाल २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या चार कालावधीसाठी आहे. कॅगच्या या अहवालात २०१७-१८ ते २०२१-२२ दरम्यान मद्याचे नियमन आणि पुरवठा तपासण्यात आला आहे. याशिवाय २०२१-२२ च्या उत्पादन शुल्क धोरणाचाही आढावा घेण्यात आला. विधानसभेत सादर करण्यात आलेल्या या अहवालात दिल्लीच्या मद्य धोरणात झालेल्या बदलामुळे २ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

### महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार...

आलेच होते. त्यावेळी देशासाठी संघर्ष करण्याचे आत्मबळ पुन्हा वाढवण्यासाठी ज्या काव्य पंक्ती त्यांना स्फुरल्या त्या म्हणजे "अनादी मी ... अनंत मी.. हे गीत होय." हे गीत म्हणजे सावरकरांचे अत्यंत भेदक, प्रेरणा, उर्जा देणारे हे शब्द व ओतप्रोत देशप्रेम याला शासनातर्फे वंदन करीत हा पुरस्कार जाहीर करीत असल्याचे ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले. लवकरच समारंभ पुर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे ही ॲड. आशिष शेलार सांगितले.

# महाशिवरात्रीनिमित्त ३५० विशेष रेल्वे गाड्या

**नवी दिल्ली :** २०२५ च्या महाकुंभातील शेवटचे अमृत स्नान बुधवारी (दि. २६) आहे. हे लक्षात घेऊन रेल्वेने विशेष तयारी केली आहे. देशाच्या विविध भागातून येणाऱ्या भाविकांसाठी रेल्वे ३५० हून अधिक विशेष गाड्या सोडणार असल्याची माहिती मंगळवारी (दि. २५) रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. तसेच या गाड्यांमध्ये अतिरिक्त रेक जोडून गर्दी कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. रेल्वेमंत्री स्वतः या कामावर लक्ष ठेवण्यात व्यस्त आहेत.

रेल्वेमंत्री वैष्णव म्हणाले की, भारतीय रेल्वेने २०२५ च्या महाकुंभाच्या शेवटच्या अमृत स्नानासाठी व्यापक तयारी केली आहे. सर्व रेल्वे झोनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याचे आणि सेवेच्या भावनेने भाविकांना मदत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रवाशांसाठी अतिरिक्त विशेष गाड्या चालवण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. एकूणच, प्रयागराज येथून ३५० हून अधिक गाड्या चालवण्याची योजना आहे.

रेल्वेच्या म्हणण्यानुसार, प्रयागराज आणि जवळच्या स्थानकांवर ३ हजार रेल्वे संरक्षण दलाच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त, १,५०० व्यावसायिक विभागाचे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय, २२ श्वान पथके आणि २ बॉम्ब निकामी करणारे पथके देखील तैनात करण्यात आली आहेत.

### शरद पवारांचा नांदेड दौरा रद्द!

**हिंगोली :** शरद पवार हे मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी नांदेड-हिंगोली दौरा करणार होते. परंतू, त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांनी सर्व दौरे रद्द केले असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी याबाबतची माहिती दिली.मंगळवारी सकाळी ते नांदेड येथील नर्सी नामदेव येथील संत नामदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन घेणार होते.

# महापालिका निवडणुका पुन्हा लांबणीवर! ४ मार्चला सुनावणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महापालिका निवडणुकीच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. त्यामुळे राज्यातील महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांचा हिरमोड झाला आहे.



महापालिका निवडणुका रखडल्याने राज्यातील मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवडसह तब्बल २३ महापालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्य संख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ वेगवेगळ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत.

त्यावर एकत्रित सुनावणी २२ जानेवारी रोजी होणार होती. मात्र, बुधवारी होणाऱ्या सुनावण्यांच्या यादीत या याचिकांचा समावेश नव्हता. त्यानंतर २८ जानेवारी रोजी सुनावणी झाली नाही. पुढील सुनावणी २५ फेब्रुवारी म्हणजे आज होती. पण आजही सुनावणी झाली नाही. त्यामुळे या याचिकेवर आता ४ मार्च रोजी सुनावणी होणार आहे.

### एआयमुळे रोजगारांना धोका; संघाचा इशारा

**नवी दिल्ली :** आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (एआय) वाढत्या वापरामुळे नोकऱ्यांना धोका निर्माण होत असल्याचा इशारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कामगार संघटना असलेल्या भारतीय मजदूर संघाने (बीएमएस) केंद्र सरकारला दिला आहे. कोणत्याही स्पष्ट धोरणाशिवाय एआयचा अवलंब केल्यास लाखो कामगारांची नोकरी धोक्यात येऊ शकते, असे संघटनेचे म्हणणे आहे. बीएमएसने सरकारला आवाहन केले आहे की कामगारांसाठी प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाची व्यवस्था करावी.

# राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा डीए वाढला

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारच्या निर्णयामुळे राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना मार्च महिन्यापासून खऱ्या अर्थाने 'अच्छे दिन' येणार आहेत. सरकारने कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये ३ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे यासंदर्भातला शासन निर्णयही निघाला आहे.

राज्य सरकारच्या वित्त विभागाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी एक शासन निर्णय जारी केला आहे. या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्याच्या दरात १ जुलै २०२४ पासून सुधारण करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरून ५३ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. म्हणजेच आधीच्या डीए दरामध्ये तीन टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. विशेष, म्हणजे हा वाढीव डीए १ जुलै २०२४ पासून लागू होणार आहे.

या शासन निर्णयानुसार वाढीव डीए १ जुलै २०२४ पासून लागू होईल. हा वाढीव डीए फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात दिला जाईल. म्हणजेच १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या सात महिन्यांचा वाढीव डीए फेब्रुवारी २०२५ महिन्याच्या वेतनात थकबाकी म्हणून दिला जाईल. गेल्या अनेक दिवसांपासून आमच्या डीएमध्ये वाढ करावी, अशी मागणी शासकीय कर्मचाऱ्यांकडून केली जात होती. त्यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्नही चालू होते. दरम्यान, सरकारने सध्याच्या महागाईचा विचार लक्षात घेता डीएमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे शासकीय कर्मचारी स्वागत करत आहेत.

**ग्रामपंचायत मुखई ता. शिरूर, जि. पुणे निविदा नोटीस क्र. ०४, सन २०२४-२५**

ग्रामपंचायत मुखई. ता. शिरूर, जि. पुणे खालील प्रमाणे कामाची सीलबंद निविदा जि प पुणे कडील खाली नमूद केलेल्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून २ पाकीट पद्धतीने मागवीत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत मुखई कार्यालयात २७/०२/२०२५ पासून ०५/०३/२०२५ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत देण्यात येतील व भरून पाठवलेल्या सीलबंद निविदा दिनांक ०६/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० पर्यन्त जमा करून दिनांक ०६/०३/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता किंवा कार्यालयीन सोयीच्या वेळी ग्रा.पं कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी रक्कम | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मुखई गावठाण अंतर्गत भूमिगत गटर बांधकाम करणे | १९२४९९ | २३६ /- | सूट | सहा महिने | सुबे अभियंता |
| ०२ | मुखई येथे सांडपाणी व्यवस्थापन करणे | १७६६९६ | २३६ /- | सूट | सहा महिने | सुबे अभियंता |
| ०३ | मुखई अजा/अज वस्ती अंतर्गत भूमिगत गटर बांधकाम करणे | ११७२९९ | २३६ /- | सूट | सहा महिने | सुबे अभियंता |
| ०४ | गावांतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ३००००० | २३६ /- | सूट | सहा महिने | सुबे अभियंता |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) कोणतीही निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत मुखई यांनी राखून ठेवला आहे.

२) सदर कामाच्या अटी व शर्तीचा संपूर्ण तपशील ग्रा पं कार्यालयात निविदा संचामध्ये पाहावयास मिळतील.

३) बयाणा रक्कम कोणत्याही पद्धतीने DD/RTGS द्वारे ग्रामपंचायत मुखई यांच्या खात्यात जमा करून त्याची पावती किंवा DD लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र. २ उघडला जाणार नाही. बयाणा रक्कम फक्त सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रवर्गासाठी राखीव असलेल्या कामांसाठी सूट देण्यात येईल.



तीन वर्षांच्या युद्धानंतर युक्रेनच्या पुनर्बांधणीसाठी ५२४ अब्ज डॉलरची आवश्यकता आहे, असे जागतिक बँकेचे म्हणणे आहे.

## पश्चिम बंगालमध्ये भूकंपाचे धक्के

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये मंगळवारी सकाळीच भूकंपाचे धक्के जाणवले. बंगालच्या खाडीमध्ये आलेल्या या भूकंपाची तीव्रता ५.१ रिश्टर स्केल इतकी होती. नॅशनल सेंटर फॉर सीमोलॉजीच्या माहितीनुसार हा भूकंप सकाळी ६.१० वाजता आला होता. सकाळी सकाळीच भूकंपाचे धक्के बसल्याने कोलकातामध्ये राहणारे लोक भयभीत झाले आणि घराबाहेर पडले. दरम्यान, या भूकंपामुळे कोणत्याही प्रकारची जिवीत अथवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. मिळालेल्या माहितीनुसार भूकंपाचे धक्के कोलकाताशिवाय पश्चिम बंगालमधील दुसऱ्या शहरांनाही जाणवले. नॅशनल सीस्मॉलॉजी सेंटरच्या माहितीनुसार २५ फेब्रुवारीला सकाळी ६.१० वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्र बिंदू बंगालच्या खाडीत ९१ किमी खोल होता.



रशिया-युक्रेन प्रकरणी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने अमेरिकेने तयार केलेल्या ठरावाला मंजुरी दिल्यानंतर, रशियाने त्याचे स्वागत केले.

## लाडक्या बहिणींच्या खात्यात आजपासून पैसे

**मुंबई :** महायुती सरकारने सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेल्या काही दिवसांपासून वादाच्या भोव-यात सापडली आहे. एकीकडे योजना बंद होणार असल्याचे बोलले जात होते. अखेर या चर्चांना महिला व बाल विकास विभागाकडून पूर्णविराम देत योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता आजपासून दिला जाणार आहे, अशी माहिती महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना फेब्रुवारी महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता आजपासून (२५ फेब्रुवारी) दिला जाणार आहे. अर्थ खात्याकडून फेब्रुवारी महिन्यासाठी मिळणारी रक्कम महिला व बालकल्याण खात्याला वर्ग करण्यात आली आहे.



झटपट पैसा मिळविण्याच्या इच्छेने भारतातील तुलनेने लहान शहरांमध्येही क्रिप्टो करन्सीची उलाढाल मोठ्या संख्येने होताना दिसून येते.

## पीएचडी पदव्यांची तपासणी होणार

**नवी दिल्ली :** राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठातून (जेजेटीयू) पीएच.डी. मिळविणाऱ्यांची तपासणी केली जाणार आहे. त्याअनुषंगाने केंद्रीय अनुदान आयोगाचे सचिव मनीष जोशी यांनी १२ फेब्रुवारी रोजी एका पत्राद्वारे देशभरातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना अशा बोगस पीएच.डी. तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे बोगस पीएच.डी पदवीधारक किती महाशय आहेत, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. विद्यापीठांच्या प्रत्येक कृतीवर यूजीसीचे नियंत्रण असते. तथापि, राजस्थान येथील जगदीशप्रसाद झाबरमल टिब्रेवाला विद्यापीठाने बोगस पीएच.डी. पदवी दिल्याचे दिसून आले. त्यामुळे यूजीसीच्या स्थायी समितीने जेजेटीयूद्वारे सादर केलेली माहिती, डेटा विश्लेषण, तपासणी आणि मूल्यांकनानुसार पीएच.डी.च्या तरतुदीचे पालन झाले नाही, असा ठपका ठेवला आहे.

## इस्रायली दरारा



वेस्ट बँक इस्रायलच्या ताब्यातील वेस्ट बँकमधील जेनिन कॅम्पजवळ इस्रायली सैन्याने एका कारवाई दरम्यान आणलेल्या रणगाडाच्या आवाजाने पक्षी इतस्ततः उडताना दिसून आले.

## तामिळनाडू आणखी एका भाषा युद्धासाठी तयार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी हिंदी लादण्याच्या आरोपावरून केंद्र सरकारसोबत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य आणखी एका भाषा युद्धासाठी तयार असल्याचे म्हटले आहे. केंद्र सरकार आमच्यावर दबाव आणण्यासाठी आमचे पैसे थांबवत आहे. पण आम्ही आमच्या दोन हजार कोटींचा हक्क सोडणार नाही. अन्यथा तामिळ समाज दोन हजार वर्षे मागे जाईल. सचिवालयात मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी लोकसभा परिसीमनाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी ५ मार्च रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले.

ते म्हणाले की, तामिळनाडूने लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्यामुळे आठ जागा गमावण्याचा धोका आहे. या सर्वपक्षीय बैठकीसाठी निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्षांना निमंत्रित करण्यात येणार असून राजकीय मतभेद बाजूला ठेवून एकजूट करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# नाशकात कांदा पेटला!

## कांद्याच्या दरात दिवसेंदिवस मोठी घसरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नाशिक :** सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहे. कारण दिवसेंदिवस कांद्याच्या दरात मोठी घसरण होताना दिसत आहे. अशातच कांदा निर्यातीच्या मुद्यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्क्यांचे निर्यात शुल्क तातडीने सरकारने हटवावे अन्यथा थेट कृषिमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलनाचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी दिला आहे.

दरम्यान, राजू शेट्टी यांनी २५ फेब्रुवारी रोजी नाशिक जिल्ह्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिका-यांच्या भेटी घेत चर्चा केली. यावेळी त्यांनी सरकारला इशारा दिला आहे. शेतक-याची भिका-याशी तुलना करण्यापेक्षा कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करा असे शेट्टी म्हणाले. सरकारने कांदा जास्तीत जास्त निर्यात कसा करता येईल यावर अधिक भर देण्यासाठी प्रोत्साहनपर योजना जाहीर करण्याची मागणी देखील शेट्टी यांनी केली आहे.

कांद्याचे दर हे सातत्याने कमी होत आहेत. ३००० रुपयांनी विक्री होणारा कांदा २००० रुपयांवर आला आहे. आणखी दर कमी होण्याची शक्यता आहे. २० टक्क्यांहून अधिक कांद्याचे उत्पादन यावर्षी वाढण्याची शक्यता देखील निर्माण झाली आहे. अशातच कारण नसताना सरकारने कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावल्याचे राजू शेट्टी म्हणाले. त्यामुळे सरकारने आत्ताच उपाययोजना केल्या पाहिजेत. शेतक-याला जर न्याय मिळवून द्यायचा असेल तर निर्यात शुल्क हटवावे आणि निर्यातीला प्रोत्साहन द्यावे असे राजू शेट्टी म्हणाले. राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतक-यांची भिका-याबरोबर तुलना करण्यापेक्षा कांदा निर्यात कसा होईल आणि निर्यातशुल्क कसे हटवता येईल हे पाहावे असे शेट्टी म्हणाले. केंद्राकडे पाठपुरावा करावा. कांद्याचे दर आणखी पडले तर कृषिमंत्र्यांच्या दारासमोरच आंदोलन करणार असल्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

### शेतक-यांचे मोठे नुकसान

● कांदा दर घसरणीमुळे कांदा उत्पादक शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून व सर्व राज्यातील शेतक-यांकडून गेल्या अनेक दिवसांपासून केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील २० टक्के शुल्क पूर्णपणे रद्द करावे, अशी मागणी होत आहे.

## महागाई भत्ता व अन्य मागण्यांसाठी

# सरकारी कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आठ महिन्यांचा प्रलंबित महागाई भत्ता व अन्य मागण्यांसाठी राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी आक्रमक झाले आहेत. राज्याच्या ऐन अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारी कर्मचारी आंदोलनाचे हत्यार उपसणार आहेत. या मागण्यासांठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली ६ मार्चला सरकारी कर्मचारी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे सत्याग्रह आंदोलन पुकारणार आहेत.

राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे गेले ३ महिने राज्यातील युती शासन दुर्लक्ष करीत असल्याची भावना राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांमध्ये दृढ होऊ लागली आहे. त्यामुळे कर्मचारी अखेर रस्त्यावर उतरणार आहेत. रविवारी नाशिकमध्ये मध्यवर्ती संघटनेची राज्य कार्यकारिणीची सभा पार पडली. या सभेत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ६ मार्च २०२५ रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर कर्मचारी-शिक्षक दोन तासांचे धरण सत्याग्रह आंदोलन पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला.

१ जुलै २०२४ पासून केंद्र सरकारी कर्मचा-यांप्रमाणे ३ टक्के महागाई भत्त्यात वाढ राज्य सरकारी कर्मचा-यांना लागू करण्याच्या शाश्वत धोरणाला बाधा करुन गेले आठ महिने उलटले तरी महागाई भत्तावाढीचा निर्णय अद्याप शासनाने घेतलेला केला नाही. लाडक्या बहिणी, शेतकरी यांच्याबाबत जी आर्थिक धोरणे ज्या गतीने राबविली जात आहेत त्याचधर्तीवर लाडक्या सरकारी कर्मचारी-शिक्षकांची देखील आर्थिक निकड पूर्ण झाली पाहिजे. बाजारातील महागाईला तोंड देण्यासाठी ती आवश्यक तरतूद असेल. या वाढीव महागाई भत्त्याचा प्रश्न सुटल्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सध्याच्या घरभाडे भत्त्यात देखील सप्रमाण वाढ मिळणार आहे.

सदर वाढ न मिळाल्यामुळे राज्यभर कर्मचारी-शिक्षकांमध्ये प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला आहे. सरकारी कर्मचा-यांच्या एकूण सोळा मागण्या प्रलंबित असल्यामुळे महाराष्ट्रातील राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षक संतप्त आहेत. प्रलंबित मागण्यांवर निर्णय न घेतल्यास लवकरच समन्वय समितीची बैठक घेऊन हा लढा अधिक व्यापक केला जाईल.

# सज्जन कुमारला जन्मठेपेची शिक्षा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १९८४ साली दिल्लीत भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर शिखविरोधी दंगल उसळली होती. या दंगलीत चिथावणी देऊन हत्या घडवणाऱ्या काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमारला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. राउज अव्हेन्यू कोर्टाच्या विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी दिल्लीच्या सरस्वती विहार येथे जसवंत सिंग आणि त्यांचे पुत्र तरुणदीप सिंग यांच्या हत्या प्रकरणात सज्जन कुमारला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने या गुन्ह्यासाठी सज्जन कुमारला दोषी ठरवले होते. तिहार केंद्रीय कारागृहाच्या अधिकाऱ्यांकडून त्याच्या मानसिक आणि मनोवैज्ञानिक स्थितीबाबत अहवाल मागवला होता. सज्जन कुमारला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आल्याने पीडितांना ४१ वर्षांनंतर न्याय मिळाला आहे. हे प्रकरण सुरुवातीला पंजाबी बाग पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला होते. मात्र, नंतर एसआयटीकडे या प्रकरणाची चौकशी सोपवण्यात आले होते.



प्रार्थना **रोम:** इटलीतील रोम येथे येथे पोप फ्रान्सिस उपचारासाठी दाखल असलेल्या जेमेली रुग्णालयाबाहेर स्वर्गीय पोप जॉन पॉल द्वितीय यांच्या पुतळ्यासमोर नन्स पोप फ्रान्सिस यांच्यासाठी प्रार्थना करताना दिसून आल्या.

# पुणे-नाशिक नव्या रेल्वे मार्गाला विरोध कायम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे- नाशिक सेमीहाय स्पीड रेल्वेच्या जुन्या मार्गात जीएमआरटीचा महाकाय दुर्बिणीचा प्रकल्प अडथळा ठरत होता. यामुळे प्रकल्पाला कोणताही धक्का न लावता हा प्रकल्प वगळून नवीन मार्ग करण्याचा निर्णय केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्यात भेट देत घेतला. त्यामुळे पुणे-नाशिक रेल्वे मार्गात संगमनेर येणार नाही. तर पुण्यावरुन अहिल्यानगर, शिर्डीमार्गे नाशिककडे असा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाला विधान परिषदेचे आमदार सत्यजीत तांबे यांनी आक्षेप घेतला असून जुन्याच मार्गानुसारच हा प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी केली होती. तसे न झाल्यास आगामी काळात सर्वपक्षीय नेत्यांचा लढा उभारणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते.

त्यानुसार आता ३ मार्चपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेणार असल्याचे तांबे यांनी सांगितले आहे. याविषयीची पोस्ट त्यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवरून शेअर केली आहे. पुणे-नाशिक रेल्वेसाठी सर्वपक्षीय लढ्यासाठी 3 मार्चपासून सुरुवात होणार. मुंबईत होणार सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची पहिली बैठक! यापूर्वी मी १ मार्च २०२४ रोजी पुणे-नाशिक सेमी हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पासंदर्भात या मार्गावर येणाऱ्या सिन्नर, संगमनेर, नारायणगाव, मंचर, राजगुरुनगर, चाकण आणि पुणे या भागांतील लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले होते, असे त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

यासंदर्भात आज पुन्हा मी सर्व सर्वांना स्वतः फोन करून आणि पत्र पाठवून मुंबईत सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी बैठकीस येण्याचे आमंत्रण दिले आहे.

### कोणा-कोणाचा पाठिंबा

- आ. दिलीप वळसे पाटील (आंबेगाव-शिरूर विधानसभा)
- आ. माणिकराव कोकाटे (सिन्नर विधानसभा)
- आ. शरद सोनवणे (जुन्नर विधानसभा)
- आ. बाबाजी काळे (खेड-आळंदी विधानसभा)
- खासदार डॉ. अमोल कोल्हे (शिरूर लोकसभा)



“ पुणे-नाशिक रेल्वे सरळ मार्गेच (सिन्नर-संगमनेर-नारायणगाव-मंचर-राजगुरुनगर-चाकण) व्हावी, यासाठी कृती समितीच्या माध्यमातून आपण हा लढा तीव्र करणार आहोत. या बैठकीत नक्कीच ठोस निर्णय घेतले जातील.

— **सत्यजीत तांबे,** आमदार

## आधुनिक संकल्पना शिक्षकांनी आत्मसात करावी

**शिक्रापूर :** शिक्षणातील आधुनिक संकल्पना शिक्षकांनी आत्मसात करणे आवश्यक असून विविध क्षेत्रांमध्ये क्षमता असणारा विद्यार्थी तयार होणे अपेक्षित असल्याचे मत शिरुर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांनी व्यक्त केले आहे. शासनाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या क्षमता वृध्दींगत प्रशिक्षण समारोप प्रसंगी बोलताना गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर बोलत होते. याप्रसंगी शिक्षण विस्ताराधिकारी किसन खोडदे, सेंट जोसेफ इंटरनॅशनल स्कूलच्या सेक्रेटरी नॅन्सी पायस, डेक्कन एज्युकेशनचे डॉ. समीर ओंकार, संदीप क्षीरसागर, प्रदीप देवकाते, शहाजीराजे पवार, राहुल आवारी, मनोज नायकवाडी, संतोष खताळ, प्रा. जितेंद्रकुमार थिटे, बबन गुंड, संतोष क्षीरसागर, राजेंद्र चोरे, आदिनाथ कर्डिले, अशोक कर्डिले, चंद्रशेखर काकडे, रामचंद्र नवले, सचिन भूकन, दशरथ आळवे, प्रशांतकुमार माने, गणेश बांगर, संदीप गोरडे, संजना गावडे, स्नेहा खरबस, संतोष गावडे, बेबी तोडमल, ज्योती जाधव, सारीका चव्हाण, प्राची कुलकर्णी, पी. ए. कुलकर्णी, जयश्री भुजबळ, शरयू कांबळे यांसह आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सेंट जोसेफ इंटरनॅशनल स्कूलचे सुनील भूकन, सचिन थापा, पूनम जाधव यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरूर तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष शरद दुर्गे यांनी केले तर मनोज धिवार यांनी आभार मानले.

## पाबळची अश्विनी घाटकर जलसंधारण विभागात

**शिक्रापूर :** पाबळ येथील अश्विनी दिलीप घाटकर हि यापूर्वी भूमिअभिलेख विभागात सर्वेअर म्हणून नियुक्त असताना नुकतीच अशीन्वी घाटकरची राज्य



सरकारच्या मृद व जलसंधारण विभागात नुकतीच अराजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाली. अश्विनीचे वडील नुकतेच एसटी विभागातून निवृत्त झाले, तर आजोबा दिवंगत किसन घाटकर यांनी एसटीत सेवा केली होती. अश्विनीचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण श्री भैरवनाथ विद्या मंदिरमध्ये झाले. पुढे तिने सिव्हिल अँड वॉटर मॅनेजमेंट पदवी ही नांदेड येथील गुरु गोविंदसिंग इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये घेत मागील वर्षी पहिल्याच प्रयत्नात ती भूमिअभिलेख खात्यात सर्व्हेअर होऊन यावर्षी ती मृद व जलसंधारण विभागात अराजपत्रित अधिकारी म्हणून रुजू झाली. दरम्यान तीने एमपीएससी परीक्षेची मुख्य परीक्षाही नुकतीच उत्तीर्ण केली आहे.

## सख्खा भाऊ पक्का वैरी

**शिक्रापूर :** पिंपळे खालसा ता. शिरुर येथील ज्ञानेश्वर धुमाळ यांच्या घराचे बांधकाम सुरु असून बांधकामा जवळ ज्ञानेश्वर हे बसलेले असताना शेजारी त्यांचा लहान भाऊ चांगदेव याचे शेतातील पिकाला सुरु असलेले पाणी बांधकामाच्या ठिकाणी आल्याने ज्ञानेश्वर यांनी ते पाणी बंद कर, असे म्हटले. चांगदेव याने तू येथे बांधकाम करायचे नाही, जमिनीचे अजून वाटप झाले नाही असे म्हणून शेतातील ऊस घेऊन आपल्या मोठ्या भावाला मारहाण केली. तसेच बांधकाम थांबवले नाही तर जीवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. याबाबत ज्ञानेश्वर खंडेराव धुमाळ (६०, रा. पिंपळे खालसा ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी चांगदेव खंडेराव धुमाळ (६०, रा. पिंपळे खालसा ता. शिरुर) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## शिक्रापूर शाळेत दोन हृदयरोगचे विद्यार्थी



**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दोन विद्यार्थ्यांना हृदय रोग तर हजारो विद्यार्थ्यांच्या त्वचा आणि दात याबाबत मोठ्या संख्येन तक्रारी आढळल्या असल्याचे स्पर्ष मेडिकल असोसिएशनच्या सर्वरोग आरोग्य तपासणी शिबीरात समोर आल्याने पुढील काळात शाळास्तरावर हृदय रोगाबाबत जनजागृतीचे अभियान राबविण्याची घोषणा स्पर्श मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हार्दे यांनी केली आहे. शिक्रापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पुणे नगर महामार्गावरील डॉक्टरांची संघटना असलेल्या स्पर्श मेडीकल असोसिएशनच्या वतीने नुकतेच शाळेतील १४०० विद्यार्थ्यांची सर्वरोग तपासणी मोफत करण्यात आली. तर पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये त्वचा व दातांचे आजार आढळ्याचे तर शाळेतील दोन विद्यार्थ्यांना गंभीर हृदय रोग असल्याचे निष्पन्न झाल्याने खळबळ उडाली. यावेळी स्पर्श मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हार्दे, उपाध्यक्ष डॉ. चंद्रकांत केदारी, डॉ. प्रशांत कापरे, खजिनदार डॉ. योगेश झुरुंगे, सचिव डॉ. प्रितम केदारी, डॉ. मच्छिंद्र गायकवाड, डॉ. विकास भुजबळ, डॉ. सोमनाथ गव्हाणे, डॉ. प्रतिभा ताठे, डॉ. संदीप वाव्हाळ, डॉ. विशाल व्यवहारे, डॉ. राजेंद्र भुजबळ, डॉ. उदय भापकर, डॉ. मनीषा भुजबळ, डॉ. अविनाश रुके, डॉ. अमोल सोनटक्के, डॉ एस. बी. मडके, डॉ. पी. बी. खंडागळे आदींनी या शिबीरात तपासणी करुन शिबीर यशस्वी केले.मुख्याध्यापिका साधना शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सनी जाधव, नवनाथ सासवडे, रवींद्र टाकळकर सुहास पडवळ आदी या वेळी उपस्थित होते.

# जेजुरी गडावर महाशिवरात्रीची तयारी



संग्रहीत छायाचित्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्रीखंडोबा देवाच्या जेजुरी गडावर महाशिवरात्र यात्रेनिमित्त श्रीखंडोबा मंदिर गडकोटातील त्रैलोक्य दर्शन म्हणजेच स्वर्गलिंग (शिखरलिंग), पाताळ लिंग (गुप्त लिंग), भूलोकातील (मुख्य गाभारा) शिवलिंग दर्शनाकरिता भाविकांसाठी विविध सुविधाची जय्यत तयारी श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने करण्यात आली आहे.

जेजुरी गडावर महाशिवरात्र उत्सवा निम्मित दरवर्षी शिखरावरील व तळघरातील शिवलिंग भाविकांना दर्शनासाठी उघडले जाते. श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी विश्वस्त मंडळाचे नियोजनानुसार महाशिवरात्री दिवशी बुधवारी त्रैलोक्य दर्शन व्यवस्था भाविकांना पहाटे ३ पासून ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

या उत्सव कालावधीत भाविकांची गर्दी लक्षात घेता गडकोट आवारात व सज्जावर अधिकची दर्शन रांग, उन्हाची दाहकता पाहता दर्शन रांगेवर सावलीची व्यवस्था तसेच गडकोट आवारात व दर्शन रांगेत शुद्ध पिण्याचे पाणी, फॅन व्यवस्था करण्यात आली असून, फराळाची व्यवस्था अन्नदान कक्षात करण्यात येणार आहे. तसेच शहरातील मुख्य चौकामध्ये श्री खंडेरायाच्या त्रैलोक्य दर्शनासाठी एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात येणार आहे. महाशिवरात्र उत्सव कालावधीत सशुल्क दर्शन बंद राहणार आहे.

भाविकांनी गर्दीचा कालावधी टाळून पर्यायी दर्शन व्यवस्थेनुसार त्रिलोक दर्शनासाठी येऊन मंदिर व्यवस्थापनास व पोलीस प्रशासनास करावे, असे आवाहन श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरीच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## क्रीडा संकुलमधील वॉकिंग ट्रॅक धोक्यात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील हुतात्मा राजगुरू तालुका क्रीडा संकुल मध्ये नव्याने पोहण्याचा तलाव उभारण्यात येणार आहे. यासाठी वापरात येणाऱ्या जागेमुळे संकुलातील वॉकिंग व रनिंग ट्रॅकचा काही भाग बाधित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावर राजगुरू क्रीडा संकुल समितीचे माजी सदस्य एकनाथ सांडभोर यांनी हरकत घेतली आहे. क्रीडा प्रेमी, नियमित व्यायामाला येणाऱ्या नागरिकांनी प्रस्तावित कामावर नाराजी व्यक्त केली आहे.

राजगुरूनगर येथील क्रीडा संकुल हे जिल्ह्यात सर्वाधिक वापरले जाणारे सोयीचे व सुरक्षित असे क्रीडा संकुल आहे. या ठिकाणी चारशे मीटरचा रनिंग ट्रॅक आहे. पुणे ग्रामीण भागात इतर निवडक तालुक्यातच असे संकुल पहायला मिळते. शाळांच्या स्पर्धा आणि व्यायामासाठी त्याचा चांगला उपयोग होतो. बाजूला वॉकिंग ट्रॅक आहे. जेष्ठ नागरिक त्याचा चालण्यासाठी उपयोग करतात. आता मात्र या दोन्ही ट्रॅकवर संकट आले आहे. येथे नविन स्विमिंग टॅन्क बांधला जात आहे. टॅन्कच्या खोदाईत वॉकिंग ट्रेक नष्ट होणार आहे. तर रनिंग ट्रॅकला बाधा पोहचत आहे . नियोजित स्विमिंग टॅन्क जर पुर्वेला वीस फूट सरकवला तर होणारे नुकसान टळणार आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या प्रस्तावात बदल करणे गरजेचे आहे. उगाचच दाटीवाटीत, घाईघाईत एवढे सुंदर मैदान बाधित करण्यात अर्थ नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. चारशे मीटरच्या रनिंग ट्रॅक भोवती नियमाने ६ ते ७ मीटर मोकळी जागा आवश्यक असून, या क्रीडा संकुल मध्ये जिल्हास्तरीय शालेय विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा होतात. चाकण एमआयडीसीमधील कंपनी कामगारांच्या देखील क्रिकेटसह इतर खेळांच्या स्पर्धेचे मोठया स्वरूपात येथे आयोजन केले जाते. येथे येणाऱ्या स्पर्धक खेळाडूंसाठी आहे तीच जागा अपुरी पडते. त्यात पोहण्याचा टँक योग्य ठिकाणी न झाल्यास जागेची कमतरता भासणार आहे. म्हणुन नियोजित पोहण्याचा टँक पुर्व बाजूला व कोणत्याही ट्रॅकला अडचण निर्माण होणार नाही असे काम करावे, अशी मागणी जोर धरून आहे.

## वाशी ते अवसरी मार्गे जांबुत बस सुरू

### आंबेगावच्या पूर्व भागातील प्रवाशांना फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील प्रवाशांच्या मागणीचा विचार करून पनवेल आगाराने वाशी ते अवसरी मार्गे पारगाव, पिंपरखेड, जांबुत मुक्कामी एसटी बस शुक्रवारपासून सुरु केली आहे. अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, निरगुडसर या मार्गे बस सुरू झाल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले असून बसचे चालक, वाहक यांचा अवसरी बुद्रुक, अवसरी खुर्द ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला आहे. नवीन सुरू झालेल्या एसटी बसचा लाभ सर्व प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन पनवेल आगार प्रमुख डॉ. सुहास चौरे यांनी केले आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी खुर्द, गावडेवाडी, अवसरी बुद्रुक, मेंगडेवाडी, निरगुडसर, पारगाव आदी गावातील अनेक कुटुंबीय वाशी, नवी मुंबई, घाटकोपर, पनवेल येथे नोकरी, उद्योग व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहे. या कुटुंबांची गावाला नेहमी ये-जा चालू असते त्यामुळे या गावांमधून वाशी पनवेल अवसरी मार्गे जांबुत मुक्कामी एसटी बस सुरू व्हावी अशी मागणी राज्याचे माजी सहकार मंत्री तथा विद्यमान आमदार दिलीप वळसे पाटील व आरोग्य मंत्र्यांचे खाजगी स्विय सहायक मंगेश शिंदे यांच्याकडे अवसरी ग्रामस्थांनी केली होती. त्यांच्या मागणीचा विचार व गरज ओळखून स्वीय सहायक मंगेश शिंदे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे स्वीय सहायक ज्ञानेश्वर वसेकर यांच्याशी संपर्क करून वाशी ते अवसरी मार्गे जांबुत एसटी बस चालू करण्यासाठी सांगितले. त्यानंतर विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे, पनवेल आगार प्रमुख डॉ. सुहास चौरे, दत्तात्रय दिघे यांनी तातडीने शुक्रवारपासून पनवेल आगाराच्या वतीने वाशी ते अवसरी मार्गे जांबुत एस टी बस चालू केली आहे. ही एसटी बस वाशीवरून दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी सुटून तळेगाव, चाकण, मंचर, अवसरी, निरगुडसर, पारगाव, पिंपरखेड मार्गे रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी जांबुत येथे मुक्कामी असणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी जांबुत वरून निघून अवसरी बुद्रुकला ७ वाजून १५ मिनिटांनी येईल मंचर, चाकण मार्गे दुपारी बारा वाजता वाशीला पोहोचेल. नव्याने सूरू झालेल्या या एस टी बसचा लाभ आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे यांनी केले आहे.

## निरगुडसर येथे सोन्या, चांदीचे दागिने चोरट्यांनी पळविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव ) येथील वळसे मळा येथे दोन आलिशान बंगल्यांमध्ये चोरी झाली असून चोरट्यांनी बंगल्यातील बंद कपाटे फोडून सर्व सामान अस्ताव्यस्त करत कपाटातील लॉकरमधील असलेले दागिने, रोख रक्कम चोरून नेली आहे.

निरगुडसर येथील वळसेमळा येथे रेवजी गेनभाऊ वळसे पाटील यांच्या सार्थक बंगल्यात चोरी झाली आहे. तसेच प्रवीण शिवाजी वळसे पाटील यांच्याही बंगल्यात चोरी झाली असून, चोरट्यांनी कटावणीच्या साहाय्याने दरवाजांचा कडी कोंयडा तोडून बंगल्यात प्रवेश करत चोरी केली आहे. रेवजी गेनभाऊ वळसे पाटील व त्यांचे कुटुंबीय एका लग्नकार्यासाठी रविवार (दि. २३) रोजी मुंबई येथे गेले असताना, चोरट्यांनी त्यांच्या बंद बंगल्यात चोरी केली. रेवजी वळसे पाटील व त्यांचे कुटुंबीय पहाटे तीन वाजता घरी आले असता त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. चोरट्यांनी घरातील सर्व कपाटे फोडून कपाटातील ९० हजार रुपये किमतीची सोन्याचांदीचे दागिने व १ लाख ६७ हजार रूपये रोख रक्कम असा एकुण २ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. तसेच रेवजी वळसे पाटील यांच्या शेजारीच असलेल्या प्रवीण शिवाजी वळसे पाटील यांच्या बंगल्यात देखील चोरी झाली आहे.

## प्रस्तावित वीज दरवाढ त्वरित मागे घ्यावी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** संपूर्ण भारत देशामध्ये महाराष्ट्रात विजेचे दर आजही सर्वाधिक आहेत, अशी वस्तुस्थिती असताना, महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियमक आयोगाकडे पुन्हा दरवाढ मंजूर करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला आहे. संभाव्य दरवाढ औद्योगिक ग्राहकांसह सर्वांवरच अन्यायकारक असलेले दरवाढीचा प्रस्ताव त्वरित मागे घ्यावी, अशी आग्रही मागणी बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी केली आहे. वीज दरवाढ प्रस्तावाला विरोध करून त्याबाबतचे शासनाला निवेदन देण्यासाठी महावितरण बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांना ऊर्जा भवन येथे निवेदन देण्यात आले त्यावेळी धनंजय जामदार बोलत होते.

बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार, उपाध्यक्ष मनोहर गावडे, सचिव अनंत अवचट, खजिनदार अंबीरशाह शेख वकील, सदस्य महादेव गायकवाड, राजन नायर, उद्योजक राजेंद्र पवार, विजय झांबरे, नितीन जामदार, कैलास बरडकर, दीपक नवले, अरुण चतुर, नारायण झगडे, अशोक वणवे, रुपेश भोंगळे, महावीर कुंभारकर, अविनाश सावंत, सुशील कुमार सिंग, मुर्तुजा कोलंबोवाला, माधव खांडेकर यांच्यासह कार्यकारी अभियंता संजय सोनवलकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता गणेश जमाले आदी यावेळी उपस्थित होते.

धनंजय जामदार म्हणाले, आताच्या प्रस्तावित दरवाढीमध्ये अनेक बाबी चिंताजनक आहेत. ज्यामध्ये स्थिर आकार, वीजदर, व्हिलिंग चार्जेस, ग्रीड सपोर्ट चार्जेस, ग्रीन टॅरिफ चार्जेस, फ्युएल ॲडजस्टमेंट चार्जेस यामध्ये दरवाढ प्रस्तावित केलेली आहे.

तसेच एलटी उद्योगांना पॉवर फॅक्टर इन्सेंटिव्हचा लाभ आता मिळणार नाही. विजेचा अधिक वापर करणाऱ्या उद्योगांची बल्क कन्समशन सवलत बंद करणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे रूफ टॉप सोलर वापरणाऱ्या वीज ग्राहकांना लोड फॅक्टर इन्सेंटिव्ह आता मिळणार नाही. त्यामुळे सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या विद्युत ग्राहकांना आता या नवीन धोरणाचा चांगलाच फटका बसण्याची चिन्हे आहेत.

वास्तविक पाहता महावितरणने वीज चोरी, वीज गळती, ट्रान्समिशन लॉसेस, विद्युत निर्मिती प्रकल्पांची कार्यक्षमता, खाजगी कंपन्यांकडून वीज खरेदीचे दर, प्रशासकीय खर्च या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करून कार्यक्षमता वाढवून आर्थिक शिस्त आणणे गरजेचे आहे. अशा उपायोजना केल्यास वारंवार वीज दरवाढ करावी लागणार नाही असे आमचे ठाम मत असल्याचे अध्यक्ष धनंजय जामदार यांनी यावेळी सांगितले.

संभाव्य वीजदर वाढीबाबत बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या शिष्टमंडळाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून बारामतीतील उद्योगक्षेत्राचा अभिप्राय व निवेदन शासनास सत्वर पाठवण्यात येईल, असे महावितरण बारामती परिमंडळाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी यावेळी बिडाच्या शिष्टमंडळाला सांगितले.

## शिरूरमध्ये गहू काढणीसाठी होतोय हार्वेस्टरचा वापर




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** शिरूर तालुक्यात रब्बी हंगामातील पिकांच्या काढणी, मळणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. मुख्य गहू उत्पादक शेतकऱ्यांनी गहू काढणी, मळणीसाठी हार्वेस्टरला पसंती दिली आहे. या हंगामात वाढलेले ऊन, यात्रा जत्रांचा हंगाम यामुळे मजूर मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. पर्यायी व्यवस्था म्हणून शेतकऱ्यांनी हार्वेस्टरला पसंती दिल्याचे दिसत आहे.

शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागात जांबूत, काठापूर, पिंपरखेड, चांडोह, फाकटे या ठिकाणी सध्या गहू काढणीला सुरूवात करण्यात आली आहे. कवठेयेमाई, मलठण, सविंदणे, आमदाबाद त्याबरोबर कान्हूर मेसाई, गणेगाव खालसा, मोराची चिंचोली, शास्ताबाद या ठिकाणी गहुचे उत्पादन करणारा शेतकरी व गव्हाचे क्षेत्र असणारा परिसर आहे. या परिसरात शेतात हार्वेस्टरच्या सहाय्याने गहू कापणी सुरू असून गहू उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. हरियाणा, पंजाब या ठिकाणाहून हार्वेस्टर यंत्र या ठिकाणी आली आहेत.

दरवर्षी रब्बी हंगाम संपल्यानंतर हे यंत्र याच भागात सुरक्षित व्यवस्थित ठिकाणी ठेवले जातात. नंतर हंगाम सुरू झाल्यानंतर पुन्हा शेतावर ही यंत्र आणली जातात. शिरूर तालुक्यात बहुतांश ठिकाणी पारंपारिक शेतीला फाटा देत यांत्रीकीकरणाची कास शेतकऱ्यांनी धरली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सध्या रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू आहे. त्यात गव्हाची काढणी व मळणी वेळेत व्हावी यासाठी हार्वेस्टर यंत्राचा वापर होताना दिसत आहे.

पहाटे जाणवणारी थोडीसी तुरळक थंटी तर सकाळ पासूनच जाणवणारा कडक उन्हाळा वातावरणात बदल घडवून आणत आहे. त्यात या काळात ग्रामदैवताच्या यात्रा, जत्रा, ऊरूस यामुळे मजूर गावाकडे जाऊ लागले आहेत. त्यातून मजूरांची कमतरता जाणवू लागली आहे. मजूरांचा होणारा तुटवडा आणि वेळेत होणारी बचत लक्षात घेऊन शेतकऱ्यांचा हार्वेस्टरकडे कल वाढला आहे. पारंपारिक पद्धतीने रब्बी पिकांची कापणी, मळणी करताना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

# आळंदीत विजया एकादशी उत्साहात

## श्रींचे दर्शनास भाविकांची गर्दी; नदी घाटावर इंद्रायणी आरती



### एकादशीदिनी इंद्रायणी नदी घाटाची स्वच्छता

आळंदी ग्रामस्थ, इंद्रायणी आरती ग्रुप, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, महिला बचत गट सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर घाट स्वच्छता करीत इंद्रायणीची आरती हरिनाम गजरात झाली. एकादशी दिनी इंद्रायणी आरती करून नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आली. एकादशी निमित्त इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी भाविकांनी नदी घाटावर गर्दी करून आरतीस उपस्थिती दाखवली. प्रसाद वाटप उत्साहात झाले. यावेळी इंद्रायणी नदी स्वच्छता जनजागृतीचे सेवक माऊलींचे मानकरी गणपतराव कुऱ्हाडे पाटील यांचे निधना निमित्त आरती ग्रुप तर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. इंद्रायणी आरती ग्रुपचे वतीने अनिता झुजम, संयोजक अर्जुन मेदनकर यांनी संयोजन केले. आळंदी इंद्रायणी नदी घाटाचे पावित्र्य जोपासण्यास मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांना निवेदन देण्यास सर्व महिलांनी तसेच उपस्थितांनी संमती देत स्वाक्षऱ्या केल्या. राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम यांनी आळंदीचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांची भेट घेऊन नदी परिसराचे वैभवात वाढ व्हावी. यासाठी उपाय योजना करण्याची मागणी करीत असल्याचे सांगितले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** येथील माऊली मंदिरात विजया एकादशी दिनी पन्नास हजारावर भाविकांनी गर्दी करून श्रींचे दर्शन घेतले. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात नव्याने विकसित केलेली दर्शनबारी भाविकांचे गर्दीने फुलली. दर्शनबारीचे रांगेत हरीनाम गजर करीत भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात श्रींचा गाभारा लक्षवेधी पुष्प सजावट करीत सजविण्यात आला होता. इंद्रायणी नदी घाटावर आरती ग्रुपचे वतीने इंद्रायणी आरती हरिनाम गजरात झाली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रम, श्रींचे पूजा, अभिषेख, आरती, कीर्तन सेवा नामजयघोषात झाली.

विजया एकादशी दिनी आलेल्या भाविकांनी मंदिर प्रदक्षिणा, ग्रामप्रदक्षिणा दिंडीतून उत्साहात केल्या. भाविकांना फराळ प्रसाद वाटप झाले. देहूकर यांचे वतीने मंदिरात मोरे महाराज यांची कीर्तन सेवा हृदय स्पर्शी सुश्राव्य सेवा रुजू झाली. परंपरेने एकादशी साजरी करण्यात आल्याचे मुख्य व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त योगी



निरंजन नाथसाहेब उपस्थित होते. संतोष महाराज मोझे यांचे वतीने हरी जागर भजन सेवा झाली. परंपरेने हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम झाले.

विजया एकादशी दिनी आळंदी मंदिर परिसरासह इंद्रायणी नदी घाटाचे दुतर्फा, प्रदक्षिणा मार्गावर प्रदक्षिणेस भाविकांनी गर्दी केली. परंपरेने मंदिरातील धार्मिक उपक्रम विधी, देवदर्शनास श्रींचा गाभारा खुला ठेवण्यात आला होता. कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. यासाठी मंदिरातील सेवक, सुरक्षा रक्षक, बंदोबस्तावरील पोलीस यांनी काम पाहिले. आळंदी मंदीरात व्यवस्थापक माऊली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने, सेवक, सुरक्षा रक्षक आदींनी नियोजन केले. यावेळी राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम, आळंदी जनहित फाउंडेशनचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, विश्वकर्म महाराज पांचाळ, सोमनाथ बेंडाले, गोविंद ठाकूर तौर, रोहिदास कदम, शैला तापकीर, राणी वाघ, अनिता शिंदे, संगीत शिंदे, शालन होनावळे, माजी नगरसेवीका उषा नरके, नीलम कुरधोंडकर, सुरेख कांबळे, शोभा कुलकर्णी, उषाबाई पाटील, सुशीला दीक्षित, पुष्पक लेंडघर, सावित्रा घुंडरे, रुख्मिणी परतूर, गंगाताई परतूर, कौसल्या देवरे, सुरेखा कुऱ्हाडे, सुनंदा चव्हाण, निर्मला आसुले, संध्या माहूरकर, सरस्वती भागवत विमल मुसळे आदीसह भाविक उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचे हस्ते प्रजासत्ताक दिनाचे पूर्व संध्येला इंद्रायणी नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासत इंद्रायणीची आरती झाली. पसायदानाने सामाजिक उपक्रमाची सांगता झाली. इंद्रायणी भक्त माऊलींचे मानकरी गणपतराव कुऱ्हाडे पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांचे कार्याचे आठवणी सांगत मनोगते व्यक्त झाली.

# शिरदाळे पाणी प्रश्नी वळसे पाटील यांचा पुढाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** शिरदाळे (ता. आंबेगाव ) येथील पाण्याची समस्या गंभीर झाली असून साठवणुकीचे पाणी तळ्यात असल्याने आणि त्याचे प्रमाण कमी कमी होत चालल्याने पाणी जास्त प्रमाणात खराब झाले आहे. शिवाय वापरासाठी ज्या विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो.ते पाणी देखील वापरायोग्य नाही. या संदर्भात दै. राष्ट्र संचारने वृत्त प्रसिद्ध केले होते.त्याची दखल घेत तालुका पाणी पुरवठा अधिकारी विशाल भंडारी,कनिष्ठ अभियंता एकनाथ धंदाले आणि त्यांच्या टीमने शिरदाळे येथे भेट देऊन पाण्याची पाहणी केली. तसेच शुद्ध पाणी सुविधा असणाऱ्या फिल्टर मशीनची देखील पाहणी केली. त्यांनी देखील पाणी खराब असल्याचे सांगितले. त्यानंतर ग्रामपंचायतच्या वतीने माजी सरपंच मनोज तांबे, गणेश तांबे, माजी उपसरपंच मयुर सरडे, सोसायटी संचालक जयदीप चौधरी यांनी माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन त्या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.



लोणी-धामणी मंचर (ता. आंबेगाव) येथे वळसे पाटील यांना निवेदन देताना शिरदाळे ग्रामस्थ.



शिरदाळेचे ग्रामस्थ दूषित पाण्यामुळे त्रस्त

शिरदाळे (ता. आंबेगाव) येथील तलावाचे पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे दूषित पाण्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, तळ्यात दिसणारा पाणीसाठा हा फक्त दिसण्यासाठीच आहे. या वर्षी कमी प्रमाणात पाऊस झाल्यामुळे तळ्यात पाणीसाठा वाढला नाही. परिणामी रापलेल्या पाण्यातून दुर्गंधी यायला सुरुवात झाली आहे.

नळाद्वारे पाणीपुरवठा होणारी विहीर आटली असल्याने, तळ्यातील बारव मधून पाणीसाठा आठवड्यातून एक दिवस सर्व नागरिकांना केला जातो. पण ते पाणी देखील इतके खराब असते की त्यातून अक्षरशः वास येत आहे. तेच पाणी फिल्टरला सोडले जात आहे, त्यामुळे फिल्टर मशीनचे कारटेज वारंवार खराब होत असून, त्यामुळे नागरिकांना फिल्टर पाणी देखील वेळेवर मिळत नाही. त्यामुळे शिरदाळे ग्रामस्थांना पाणी असून पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे.

प्रशासनाने या बाबतीत काहीतरी दखल घेऊन तात्पुरती सुविधा करावी, या आशयाचे निवेदन लवकरच ग्रामपंचायतच्या वतीने पंचायत समिती आंबेगाव येथे देण्यात येणार असल्याचे सरपंच उपसरपंच बीपीन चौधरी, माजी सरपंच वंदना तांबे, माजी उपसरपंच मयुर सरडे, ग्रा.पं. सदस्य मोहिनी तांबे, कविता तांबे यांनी सांगितले.

याबाबतचा ठराव मासिक सभेमध्ये पास करून त्याची प्रत पंचायत समितीला दिली जाईल. तसेच कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून लवकरच माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांना देखील निवेदन देण्यात येणार असल्याचे गणेश तांबे यांनी सांगितले. त्यातून शेतीला तसेच इतर वापरासाठी पाणी मिळाले, ज्यामुळे आमची पाण्याची कायम स्वरूपीची काळजी मिटेल. तसेच पाणी जास्त प्रमाणावर दूषित असल्याने फिल्टर टाकी भरण्यासाठी जास्त वेळ लागतो. त्याचा बोजा देखील लाईट मीटरवर पडतो. शिवाय खराब पाणी असल्याने फिल्टर मशीन वारंवार खराब होत आहेत. त्यामुळे त्याचा देखील तोटा ग्रामपंचायतला सहन करावा लागत आहे. असेच पाणी फिल्टरला सोडले, तर फिल्टर माशील पूर्णपणे नादुरुस्त होऊन भंगारमध्ये निघेल, असे फिल्टर पाणी सोडण्याचे काम करणारे निवृत्ती तांबे यांनी सांगितले.

रोजच्या दैनंदिन जीवनातील पाणी हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे सध्या तलावात पाणीसाठा दिसत आहे परंतु तो खूप दूषित झाला आहे. त्याची दुर्गंधी यायला लागली आहे.त्यामुळे ग्रामपंचायतच्या वतीने लवकरच पंचायत समितीला तसेच वळसे पाटील यांना निवेदन देऊन पाण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात मागणी करण्यात येणार आहे. कारण ग्रामस्थांच्या रोज पाण्याबाबतच्या तक्रारी वाढल्या आहेत त्यामुळे यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

- मयुर सरडे, माजी उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य शिरदाळे

राष्ट्रसंचार IMPACT

पाण्याची समस्या खूप गंभीर असून त्यामुळे ग्रामस्थ आजारी पडण्याचे प्रमाण वाढले असून त्वरित काहीतरी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.
यावेळी वळसे पाटील यांनी त्वरित तालुका पाणीपुरवठा अधिकारी भंडारी यांच्याशी दूरध्वनी द्वारे संपर्क करून शिरदाळे गावासाठी त्वरित टँकरची व्यवस्था करण्याच्या सूचना केल्या. तसेच पाणी कमी झाल्यावर तळ्याचे खोलीकरण करण्याबाबद माहिती घेतली व पाणी पातळी कमी झाल्यावर तळ्याची खोलीकरण करा त्यासाठी लागणारा निधी, जेसीबी तसेच इतर यंत्रसामग्री मी उपलब्ध करून देतो असे सांगितले. ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने तळ्याचे खोलीकरण करून घेण्याच्या सूचना वळसे पाटील यांनी केल्या.
त्यामुळे सद्यस्थितीला पाण्याची समस्या मिटणार असून, ग्रामस्थांना वापरासाठी चांगले पाणी मिळणार आहे. त्याचबरोबर शिरदाळे येथील नवीन ग्रामपंचायत इमारतीचे अधूरे काम पूर्ण करण्यासाठी निधीच्या मागणीचे निवेदन देण्यात आले. त्यावर देखील लवकर निधी देण्यात येईल असे सांगितले. लवकरच शिरदाळे येथे प्रत्यक्ष भेट देण्यासाठी येणार असल्याचे वळसे पाटील म्हणाले.

## पत्रातील संवाद हरवला, मेसेजच्या भावनात ओलावा नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** पत्रातून वेगळया भावना शब्दांद्वारे कागदावर लिहून समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविल्या जात होत्या, काळाच्या ओघात पत्रलेखनच लुप्त झाले असून मोबाईलच्या वापरामुळे मेसेजच्या माध्यमातून पोहोचविल्या जाणा-या भावनांमध्ये तितका ओलावा नाही, अशी खंत लेखक, गीतकार अरविंद जगताप यांनी व्यक्त केली. येथील एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्यावतीने संस्थेच्या अध्यक्षा खासदार सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबिंब व्याख्यानमालेअंतर्गत रविवारी (दि. २४) पत्रास कारण की...या विषयावर जगताप यांनी बारामतीकरांशी संवाद साधला.

जगताप म्हणाले, पूर्वी पत्र पाठवायचे तेव्हा त्यात केवळ शब्दच नसायचे तर त्यात समोरच्या व्यक्तीच्या मनातील भावना असत. नात्यांबद्दलची ओढ व मनातील गोष्टींचा उहापोह त्या पत्राद्वारे केलेला असायचा. हल्ली मेसेज टाईप करुन लगेचच ते डिलीट केले जातात, त्यात मायेचा ओलावा अजिबात नसतो. मोबाईल आल्यानंतर भावनाच हरवून गेल्याप्रमाणे झाले असून संवादही संपत चालला आहे असे ते म्हणाले. बारामतीकर रसिक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी नगराध्यक्षा मंगल सराफ, फोरमचे सदस्य सुरेंद्र भोईटे व राजेंद्र धुमाळ यांनी अरविंद जगताप यांचा सत्कार केला.

# नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक बिनविरोध

## सभापतीपदी संदीप फडतरे तर, उपसभापतीपदी बाळासाहेब शिंदे यांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** संपुर्ण पुरंदर तालुक्याचे आणि बारामती तालुक्यातील ३६ गावांसाठीचे कार्यक्षेत्र असलेल्या नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापतीपदाची निवड मंगळवारी ( दि.२५) करण्यात आली. सासवड येथील उपबाजारातील कार्यालयामध्ये ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये सभापतीपदी काँग्रेसचे संदीप फडतरे यांची तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे बारामती तालुक्यातील करंजे येथील बाळासाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मंगळवारी ( दि.२५)सकाळी सभापती पदासाठी काँग्रेसचे संदीप फडतरे व उपसभापती पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे बाळासाहेब शिंदे या दोघांचेच उमेदवारी अर्ज प्राप्त झाले. त्यामुळे या दोघांची अनुक्रमे सभापती आणि उपसभापतीपदी निवड करण्यात आली. नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीवर यापूर्वी देखील अजित पवार यांचेच वर्चस्व राहिलेले आहे. यापूर्वीचे सभापती शरद जगताप हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे होते. ठरल्याप्रमाणे त्यांनी कार्यकाळ संपताच राजीनामा दिल्याने सभापती आणि उपसभापतीपद हे रिक्त झाले होते. या रिक्त पदांसाठी मंगळवारी (दि. २५) निवडणूक घेण्यात आली आणि यामध्ये ही निवड करण्यात आली.

यावेळी बारामती तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राजवर्धन शिंदे, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन दिगंबर दुर्गाडे, जिल्हा बँकेचे संचालक संभाजी होळकर, माजी जि प सदस्य सुदामराव इंगळे, शरद पवार गटाचे पुरंदर तालुकाध्यक्ष माणिकराव झेंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे



पुरंदर तालुकाध्यक्ष उत्तम धुमाळ, सोमेश्वर कारखान्याचे व्हा. चेअरमन बाळासाहेब कामथे, नीरा कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती नंदूकुमार जगताप, प्रदीप पोमण, विठ्ठल मोकाशी, अनिल उरवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवड ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार, शरद पवार एकत्र असताना झाली होती. यावेळी राष्ट्रवादीचे दहा उमेदवार निवडून आले होते. तर, काँग्रेसचे आठ उमेदवार निवडून आले होते. काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून कार्यकाळ वाटून घेण्यात आला होता. अजित पवारांच्या नेतृत्वाखालील संचालक शरद जगताप यांना पहिल्यांदा सभापती करण्यात आले होते. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर अजित पवार यांच्याकडे सहा बाजार समितीचे संचालक तर, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे चार संचालक असल्याचे बोलले जात होते. तर संजय जगताप यांच्याकडे आठ संचालक आहेत. विधानसभा निवडणुकीनंतरच्या राजकीय समीकरणानुसार महाविकास आघाडीकडे एकूण बारा संचालक आहेत. त्यामुळे बाजार समितीच्या या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे पारडे जड होते. गेली दोन दिवस रात्र नाट्यमय घडामोडींनंतर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाने उपसभापती पदावर दावा कायम ठेवत बाजी मारल्याने, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला उपसभापती पदाला मुकावे लागले असल्याची चर्चा आहे.

# राजगुरू महाविद्यालयाची पुस्तकांच्या गावाला भेट




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी, भूगोल आणि इंग्रजी विभागाच्या सुमारे १२० विद्यार्थ्यांनी महाबळेश्वरजवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला नुकतीच शैक्षणिक भेट देऊन वाचनाचा आनंद घेतला.

राज्य सरकारचा मराठी भाषा विभाग आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्यातर्फे पर्यटकांना मराठी भाषेची संस्कृती कळावी व वाचनसंस्कृती विकसित करण्याच्या उद्देशातून साकारण्यात आलेल्या भिलार गावात ३५ घरांची निवड करून तेथे छोटी ग्रंथालये उभारण्यात आली आहेत. तेथे विविध साहित्य प्रकारातील ४० हजारांहून अधिक पुस्तके ठेवण्यात आली आहेत. ही पुस्तके पर्यटक वाचकांना मोफत वाचण्याची सुविधा आहे. शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भिलारला भेट देऊन वाचनानंद अनुभवला. या अनुभवाबद्दल बोलताना उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे म्हणाले, की शासनातर्फे राबविलेला पुस्तकांचे गाव हा स्तुत्य उपक्रम असून स्ट्रॉबेरीबरोबर पुस्तकांचा आनंद घेण्याची संधी विद्यार्थी पर्यटकांना मिळाली. पुस्तके माणसाच्या आयुष्याला वैचारिक दिशा देतात. त्यासाठी पुस्तकांचा सहवास महत्त्वाचा असतो. भिलारमध्ये विद्यार्थी पुस्तकांच्या सहवासाने भारावले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या घरांमध्ये जाऊन पुस्तके वाचली. आपापल्या घरांमध्ये पुस्तके असावीत अशी भावना विद्यार्थ्यांची झाल्याचे त्यांनी सांगितले.भिलारसह विद्यार्थ्यांनी मधाचे गाव मांगर, प्रतापगड येथेही क्षेत्र भेटी दिल्या.



या शैक्षणिक सहलीचे आयोजन प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ.डीएम मारकड, डॉ. बीडी अनुसे, प्रा. केजे लांडेपाटील, प्रा. एमएल मुळूक, डॉ. श्वेतांबरी मांडे, डॉ. सागर थेऊरकर यांनी केले.



## विद्या प्रतिष्ठानमध्ये आंतरमहाविद्यालय स्पर्धा उत्साहात

**बारामती :** येथील विद्या प्रतिष्ठानचे कला ,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे बीबीए(सीए) या विभागामार्फत राज्यस्तरीय अंतरमहाविद्यालय विविध स्पर्धा विद्याटेक २०२५ चे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे, नगर, सोलापूर, सातारा या जिल्ह्यामधून विविध महाविद्यालयातील एकूण ३३९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपल्या विविध कौशल्यांचे सादरीकरण केले. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोग्रामिंग वॉर, प्रोजेक्ट प्रेसेंटेशन आणि प्रश्नमंजुषा फेरी अश्या स्पर्धांचे आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेच्याच दिवशी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. बक्षीस वितरण कार्यक्रमास महाविद्यालयाचे डॉ. विलास कर्डिले, प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, उपप्राचार्य डॉ. घाडगे, विभाग प्रमुख महेश पवार, नीलिमा पेंढारकर, आय. क्यू. ए. सी. समन्वयक, गजानन जोशी, किशोर ढाणे, सर्व परीक्षक, प्राध्यापक आणि विध्यार्थी उपस्थित होते. यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेला विद्या प्रतिष्टान संस्थेच्या विश्वस्त खासदार सुनेत्रा पवार, उपाध्यक्ष अ‍ॅड. अशोक प्रभुणे, खजिनदार उगेंद्र पवार, सचिव अ‍ॅड. नीलिमा गुजर, डॉ. राजीव शाह, किरण गुजर, मंदार चिकाची, रजिस्ट्रार कंबोज तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे व उप-प्राचार्य डॉ. शामराव घाडगे व उप-प्राचार्य लालासो काशीद यांचे सहकार्य लाभले. स्पर्धेचे सूत्रसंचालन पूनम गुंजवटे यांनी केले, अतिथींचे परिचय प्रा. अनिल काळोखे यांनी तर परीक्षकांचा परिचय आणि आभार प्रा. अक्षय भोसले यांनी मानले. स्पर्धेचे नियोजन करण्यात प्रा. अक्षय भोसले, प्रा. वैशाली पेंढारकर, प्रा. कांचन खीरे,प्रा. अक्षय शिंदे व सर्व संगणक शास्त्र आणि बी. सी. ए. (सायन्स ) विभागाचे सहकारी यांनी मोलाचे योगदान दिले.

## इंदापूरात अभ्यासिका व ग्रंथालय उभारणार

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी तालुक्यातील विविध भागात अभ्यासिका व ग्रंथालये उभारणार असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याणमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले. भरणेवाडी ता. इंदापूर येथे मंत्री भरणे यांच्या वतीने इंदापूर तालुक्यातील स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या व पोलिस भरती झालेल्या ४६ विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. यावेळी छत्रपती साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अमोल पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, सचिन सपकळ, दिपक रायकर आदी उपस्थित होते. यावेळी महसूल सहाय्यक पदी निवड झालेल्या किशोर किसवे, विक्रम व्होरकाटे, गणेश ताटे, नवनाथ खामगळ, मैथिली शिंगाडे, अमर खारतोडे, सायली नगरे, अमोल दराडे, अंजली वाघमारे, ऋतुराज कवडे, प्रेमविजय बंडगर, सुनीता हांगे, आदित्य देवकाते, किरण चवरे, धनराज मरगळ, वनिता चिपडे, कोमल शिदे, गौरी रूपनवर, रोहित गोरे, सोनाली जाधव, दीपाली घोगरे, सुनीता वाकसे, सनी लंबाते, अमोल शिंदे, राहुल इंगळे, अमोल शिंदे व सुनीता चव्हाण यांचा सत्कार झाला. कर सहाय्यक पदी पूजा गलांडे व सोनाली गायकवाड, अन्न सुरक्षा अधिकारीपदी धर्मराज पानसरे व मनीषा गुंजाळ, इन्कम टॅक्स अधिकारी पदी अक्षय शिंगटे, बांधकाम विभाग सहाय्यक पदी प्रवीण फलफले, कॅनॉल इन्स्पेक्टर पदी मृणाल जरड यांची तर महाराष्ट्र पोलिस दलात अक्षय गायकवाड, वैष्णवी बनसोडे, प्रिया कांबळे, सुमित जगताप, तुषार बंडगर, हिना शेख, शिवानी जाधव, काजल जाधव यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.

## चोरीस गेलेला कांदा पोलिसांनी केला हस्तगत



**बारामती :** वढाणे (ता. बारामती) येथील शेतक-याच्या शेतातून चोरीला गेलेल्या १३ पोती कांदा सुपे पोलिसांना हस्तगत करण्यात यश आले आहे. पोलिसांनी कांदा चोरी प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली असून न्यायालयाकडून तिघांनाही एक दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. याबाबत सुपे पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, वढाणे ( ता. बारामती ) येथील शेतकरी चंद्रशेखर चौधरी यांनी आपल्या शेतातील कांदे काढून १३ पिशव्या भरुन ठेवल्या होत्या. रात्री उशिरा गावातीलच आरोपी अक्षय शांताराम गायकवाड (वय २९ वर्षे ) सतिश हिरामण शिंदे (वय २८ वर्षे ) गोरख दगडु लकडे (वय २५ वर्षे,) सर्व रा.वढाणे या तिघांनी चौधरी यांच्या शेतात कुणीही नाही. याचा फायदा घेत १३ पिशव्या कांदा चोरुन नेला. याबाबत शेतकरी चौधरी यांनी सुपे पोलिसात तक्रार दिल्यानंतर अज्ञात व्यक्तीवर चोरीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार गणेश बिरादार अपर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागिय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड व सुपे पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांच्या मार्गदशनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार किसन ताडगे व महादेव साळुंखे यांनी या गुन्हाचा सखोल तपास करून मुद्देमाल हस्तगत करुन संबधित तीन आरोपींना अटक केली आहे.

# त्याला असूया वाटतेय...



**समुपदेशन**

मी एका बहुराष्ट्रीय कंपनीत चांगल्या पदावर काम करणारी मध्यमवयीन महिला आहे. एका सहकाऱ्याला माझ्या प्रगतीची असूया वाटते. माझी पाठ वळल्यावर तो माझ्याबद्दल वाईट बोलतो. चुकीच्या गोष्टी पसरवतो. प्रत्यक्षात माझ्याशी तो खूप चांगला वागतो. माझ्याशी मैत्रीपूर्ण संबंध असल्याचं दर्शवतो. तो माझ्याआधी तीन वर्षं कंपनीत रूजू झाला. त्यामुळे इतर सहकारी आणि वरिष्ठही त्याच्यावरच विश्वास ठेवतात. अशा परिस्थितीत मी काय करू? मी त्याला याचा जाब विचारू शकत नाही. पण मी त्याच्या वागण्याकडे दुर्लक्षही करू शकत नाही. मला मार्गदर्शन करा.

– तुला योग्य वाटत असेल तर तू त्याच्याशी स्पष्टपणे बोलू शकतेस. तुला त्याच्याबद्दल काय वाटतंय ते सांगून टाक. तो तुझ्याआधी या कंपनीत रूजू झाला आहे. त्यामुळे तुझ्या प्रगतीबद्दल त्याला असूया वाटत असेल. मुख्य म्हणजे त्याला खूप असुरक्षित वाटत असेल. त्याच्यावर अनेकांचा विश्वास असल्याचं तुझं म्हणणं आहे. अशा परिस्थितीत तू तुझ्या कामावर लक्ष केंद्रित कर. त्याच्या इतर सहकाऱ्यांशी असलेल्या संबंधांचा फार विचार करू नकोस. इतरांच्या वागणुकीत आपण बदल करू शकत नाही. दुसऱ्यांवर आपलं नियंत्रण असू शकत नाही. पण आपण स्वतःचं वागणं बदलू शकतो. कामाची पद्धत बदलू शकतो. सर्व प्रयत्नांनंतरही तुला त्रास होत असेल, परिस्थिती हाताळता येत नसेल तर समुपदेशकांची मदत घेता येईल.

# निगराणी मुलांची

**पॅरेंटिंग**

एखादं मूल मोठं झाल्यावर हुशार असल्याचं दिसतं तर एखादं मूल प्रगती करत नसल्याचं दिसतं. याचं कारण लहानपणी मुलांना लावल्या जाणाऱ्या सवयींचा परिणाम मेंदूवर होऊन त्याची परिणती विचारांच्या विकासात होते. प्रत्येक माणसाला आयुष्यात अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. लहानपणापसूनच हे शिकवण्यात आलं तर मोठं झाल्यावर या आव्हानांना ती मुलं घाबरणार नाहीत. त्यामुळे कठीण आव्हानं असली तरी ही मुलं आपली सारी कामं सहज पार पाडून स्वतःची जबाबदारी निभावतील. संगोपन करताना मुलांना काही ठोस गोष्टींचीही माहिती द्यायला हवी. या गोष्टी कोणत्याही पुस्तकातून किंवा शाळांच्या वर्गामध्ये शिकवल्या जात नाहीत. या गोष्टी त्या मुलांच्या कुटुंबातील लोकच शिकवू शकतात. त्या गोष्टी शिकवण्यात आल्या तर मुलं आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर समाधानी राहतील. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जगणं हीदेखील एक कला आहे. त्याची शिकवण मुलांना द्यायला हवी. हे जग साध्यासुध्या, सरळमार्गी लोकांचं नाही. त्यामुळे त्यांच्याबरोबर वावरताना आपल्यालाही स्मार्ट आणि चतूर व्हावं लागतं. त्यामुळे मुलांना साधंभोळं न ठेवता ती स्मार्ट निपजावीत यासाठी प्रयत्न करायला हवेत. समोर येणाऱ्या परिस्थितीतून आपलं संरक्षण कसं करावं याचं प्रशिक्षण त्यांना द्यावं. अनेकदा मुलांना आई–वडिलांपासून दूर रहावं लागतं. कधी पालक घराबाहेर असल्याने तर कधी शिक्षणासाठी ही मुलं पालकांपासून लांब राहतात. अशा वेळी त्यांना घरच्या खाण्याची जास्त आठवण येते.



त्यामुळे आपल्या मुलांना किमान भात, वरण, दोन भाज्या कशा बनवाव्यात हे शिकवायला हवं. एकटं असताना आनंदात कसं रहायचं हे त्यांना शिकवलं तर जास्त चांगलं. अनेकदा मुलं एकटी राहतात. पण, मनातल्या भावना कोणाला सांगत नाहीत. तसं करण्याऐवजी मुलांनी त्या सांगाव्यात अशी सवय लावायला हवी. पत्रं लिहिणं, छोटी छोटी घरगुती कामं करणं यांचं शिक्षणही मुलांना द्यायला हवं.

# वर्णभेदाचा अडथळा भेदला

**सध्याच्या काळातही वर्णभेद संपलेला नाही. काळ्या किंवा सावळ्या वर्णाच्या लोकांना बऱ्याच आव्हानांना सामोरं जावं लागतं. त्यांना कमी लेखलं जातं. मनोरंजन, मॉडेलिंगचं विश्व त्यांच्यासाठी नसल्याचं ठसवलं जातं. गोऱ्या बनवणाऱ्या क्रीम्सच्या जाहिरातींची आजची चलती आहे. गोरा रंग म्हणजे सौंदर्याचं प्रतीक ही धारणा अजूनही बदललेली नाही. पण रिनी कुजूर या तरुणीने हा अडथळा भेदून मॉडेलिंगच्या क्षेत्रात नाव कमावलं आहे.**

**मानिनी**

चांगल्या संधी मिळवण्यासाठी, व्यक्तिमत्त्व खुलवण्यासाठी, आकर्षक दिसण्यासाठी जगभरातले लोक गोरं बनवण्याचा दावा करणाऱ्या क्रीम्सचा वापर करतात. अशा क्रीम्सच्या जाहिराती आजही टीव्हीवर दाखवल्या जातात. सावळ्या वर्णाच्या लोकांना नोकरीच्या संधी नाकारल्या जातात, पण विशिष्ट क्रीम वापरून वर्ण उजळला की संधींची रांगच लागते, अशा आशयाच्या जाहिरातींमुळे समाजाची मानसिकता बदललेली नाही. सावळ्या वर्णाच्या लोकांकडे आजही विचित्र नजरेने बघितलं जातं. मुली किंवा महिलाच नाही तर पुरुषही गोरे बनण्यासाठी प्रयत्न करतात. म्हणूनच आता पुरुषांचा वर्ण उजळवणारी क्रीम्सही बाजारात आली आहेत. वर्णभेदाचा फटका अनेकांना बसतो. त्यापैकी एक म्हणजे रिनी कुजूर.

सावळ्या वर्णाच्या रिनीला वयाच्या तिसऱ्या वर्षापासूनच भेदभावला सामोरं जावं लागलं. फॅन्सी ड्रेस स्पर्धेत परी बनलेल्या रिनीला सावळी असल्यामुळे लोकांच्या रोषाला सामोरं जावं लागलं. परी बनून व्यासपीठावर आलेली रिनी खाली उतरेपर्यंत लोकांनी तिला वर्णावरून चिडवलं. अवघ्या तीन वर्षांच्या रिनीला तेव्हा काहीच कळत नव्हतं. मात्र मोठी झाल्यानंतर तिला मॉडेलिंगच्या क्षेत्रात नाव कमावायचं होतं. या क्षेत्रातला तिचा प्रवास सोपा नव्हता. सुरवातीच्या काळात तिला वर्णभेदाला समोरं जावं लागलं. बसक्या नाकावरून तिची खिल्ली उडवली गेली. सावळ्या वर्णामुळे तिला कोणी संधी देत नव्हतं. वर्षभर तिच्या हातात काहीच काम नव्हतं. यामुळे ती निराश झाली. मग तिने स्वतःच्या पैशाने पोर्टफोलिओ तयार केला. विविध ठिकाणी वाटला. पण हाती काहीच लागलं नाही. रंगरुपावरून तिची अवहेलनाच झाली. रिनीने वयाच्या २८ व्या वर्षी मॉडेलिंगला सुरूवात केली. जाहिरातींसाठी तरुण मॉडेल्सची गरज असल्याने तिला संधी मिळत नव्हती. मग रिनीला वय लपवावं लागलं.

मात्र एके दिवशी तिचं नशीबच बदललं. रिनी प्रसिद्ध पॉप स्टार रॉबिन रिहाना फेंटीसारखी दिसत असल्याचं तिच्या एका सहकाऱ्याच्या लक्षात आलं. यानंतर अनेकांच्या ही बाब लक्षात आली. मग रिनीला मॉडेलिंगच्या क्षेत्रात लोकप्रियता मिळू लागली. ती रिहानासारखी दिसते असं अनेक फोटोग्राफर्स त्यांच्या क्लाएंट्सना सांगू लागले. यामुळे रिनीला कोणी नाकारू शकलं नाही. कारण रिहानाच्या सौंदर्याबाबत कोणाचंही दुमत असणं शक्यच नव्हतं. यानंतर रिनीला अनेक संधी मिळत गेल्या. मी रिहानाची आभारी असल्याचं रिनी सांगते. रिहानासारखी दिसत असल्याने रिनीला मॉडेलिंगविश्वाने स्वीकारलं. पण प्रत्येकाच्या बाबतीत असं होत नाही. त्यामुळे वर्णभेदाची ही भिंत समाजानेच पाडायला हवी. वर्णापेक्षाही गुणवत्तेला अधिक महत्त्व द्यायला हवं. गौरवर्ण म्हणजे सर्वस्व नाही असा विचार लोकांच्या मनात बिंबवणं गरजेचं आहे. रिनीसारखी मंडळी यासाठी पुढाकार घेत आहेत.



**स्मार्ट टिप्स**

## बाटल्यांना द्या नवा लूक



आपल्याकडे प्लास्टिकच्या बाटल्या जमा होतात. नको असलेल्या बाटल्या आपण फेकून देतो. या बाटल्यांचा कल्पक वापर करता येईल. या बाटल्यांचा वापर कुंड्यांप्रमाणेही करता येईल. बाटल्या मधून कापून खालच्या भागात माती भरा आणि त्यात रोपटी लावा. या बाटल्या वेगवेगळ्या रंगात रंगवता येतील. या कुंड्यांनी तुम्ही भिंत सजवू शकता. मोठ्या बाटल्यांच्या तळाचा वापर ज्वेलरी ठेवण्यासाठीही करता येईल. कानातले, विविध प्रकारच्या पिन्स, क्लिप्स ठेवण्यासाठी हा स्टँड वापरता येईल.

**ब्युटी टिप्स**

## नेल आर्ट साकारायचं तर...

विविध समारंभांच्या निमित्ताने आपण नेल आर्ट करून घेतो. सध्या हा ट्रेंड जोरात आहे. थोडी कल्पकता असेल तर तुम्ही घरीच नेल आर्ट करून घेऊ शकता. यासाठी तुम्हाला नेल आर्ट किट लागेल.



नेल आर्ट किटमध्ये नेल पॉलिश रिमूव्हर असायला हवं. तुम्ही वाईप्सचा वापरही करू शकता. नेल आर्टमध्ये डॉटिंग टूल्स खूप महत्त्वाच्या असतात. या टूल्सचा वापर करून तुम्ही निरनिराळी डिझाइन्स बनवू शकता. झटपट वाळणारा टॉप कोट आणि बेस कोट जवळ बाळगा. टूथपिकच्या मदतीनेही तुम्ही छान छान रचना करू शकता. त्यामुळे टूथपिकही किटमध्ये असू द्या.

**किचन टिप्स**

## अशी घालवा फ्रीजमधली दुर्गंधी



काही दिवसांनंतर फ्रीजमधून दुर्गंधी येऊ लागते. या दुर्गंधीचा आपल्याला खूप त्रास होतो. फ्रीजमधले पदार्थही खराब होऊ शकतात. ही दुर्गंधी टाळण्यासाठी फ्रीज वापरण्याच्या पद्धतीत थोडे बदल करता येतील. फ्रीजमध्ये जास्त सामान ठेऊ नका. कालवधी संपलेली उत्पादनं टाकून द्या. दुर्गंधी घालवण्यासाठी खायचा सोडा घातलेल्या पाण्याने फ्रीज स्वच्छ करा. फ्रीजमधून आंबट दुर्गंध येत असेल तर वाटीत थोडा चुना घ्या आणि ही वाटी फ्रीजमध्ये ठेवा. फ्रीजमध्ये अर्ध लिंबू कापून ठेवल्यानेही दुर्गंधी कमी होईल.

# घरीच बनवा सौंदर्यप्रसाधनं

**ब्युटी टॉक**

ब्युटी पार्लरमधली महागडी ट्रिटमेंट किंवा महागडी सौंदर्यप्रसाधनं न वापरता सुंदर दिसणं ही एक कला आहे. तुम्हालाही फार वेळ आणि पैसे खर्च न करता सुंदर दिसायचं असेल तर या टिप्स फॉलो करा.

* महागडा हायलायटर खरेदी करायचा नसेल तर लिप ग्लॉसचा वापर करा. कोणताही क्लिअर लिप ग्लॉस हायलायटर म्हणून वापरता येईल. नैसर्गिक उजळपणा मिळवण्यासाठी हा लिप ग्लॉस चिक बोन्सवर लावा. घरच्या घरी हायलायटर बनवायचा असेल तर शिमर पिगमेंटमध्ये थोडं खोबरेल तेल मिसळा.
* ओठ कोरडे पडत असतील तर पेट्रोलियम जेली आणि साखर यांचं मिश्रण तयार करून घरच्या घरी लिप स्क्रब तयार करा.
* बीबी क्रीमही घरी तयार करता येतं. सौम्य मेकअप बेस हवा असेल तर मॉईश्चरायझरमध्ये थोडं लिक्विड किंवा पावडर फाउंडेशन मिसळा.
* मेक अप ब्रशच्या स्वच्छतेसाठी ब्रश क्लिनर्स मिळतात. पण हे क्लिनर्स विकत घ्यायचे नसतील तर काळजी करू नका. तुमच्या नेहमीच्या शँपूने ब्रश स्वच्छ करता येतील.



वाटीभर गरम पाणी घ्या. त्यात शँपूचे दोन थेंब घालून मिश्रण तयार करा. यामुळे मेक अप ब्रश नीट स्वच्छ होतील.

* तुमच्याकडे आयशॅडो पॅलेट असेल तर ब्रो पावडर विकत घेण्याची आवश्यकता नाही. भुवयांना आकार देण्यासाठी किंवा विरळ भुवया भरण्यासाठी ग्रे किंवा ब्राउन शेड्सचा वापर करता येईल.

# मस्त पनीर मसाला

**रसगंधा**

पंजाबी डिश बनवायची तर त्याची ग्रेवी चांगली असायला हवी. विशेष प्रसंगी आपण पनीर मसाला बनवतो. पनीरच्या भाजीची लज्जत ग्रेवीमुळे वाढते. रेस्टॉरंटमध्ये आपण पनीरची ग्रेवी बोटं चाटत खातो. अशीच ग्रेवी आपण घरीही बनवू शकतो. या ग्रेवीत फक्त पनीरच नाही तर इतर भाज्याही घालता येतील.

**साहित्य:** २०० ग्रॅम पनीर, ६–७ काजू, दोन टोमॅटोंची प्युरी, एक बारीक चिरलेला कांदा, एक चमचा आलं–लसूण पेस्ट, एक हिरवी वेलची, एक मोठी वेलची, दोन लवंगा, जावित्रिचा एक छोटा तुकडा, एक तुकडा दालचिनी, एक तमालपत्र, एक चमचा धनेपूड, अर्धा चमचा लाल तिखट, चिमूटभर कसूरी मेथी, अर्धा चमचा गरम मसाला, चवीनुसार मीठ, दोन चमचे तेल.

**कृती:** ग्रेवी बनवण्याच्या दहा मिनिटं आधी काजू गरम पाण्यात भिजवून ठेवा. मग मिक्सरमध्ये वाटून त्यांची पेस्ट बनवा.



कढईत तेल गरम करून घ्या. यानंतर त्यात सर्व खडे मसाले घाला. परतून घ्या. मसाल्यांचा सुगंध आल्यावर त्यात कांदा घालून सोनेरी रंगावर परतून घ्या. मग यात आलं–लसूण पेस्ट घाला. पुन्हा परतून घ्या. हे सर्व नीट परतल्यानंतर त्यात टॉमेटो प्युरी घाला. यात थोडं मीठ घालून नीट शिजवून घ्या. आता या मसाल्यातून तेल सुटू लागेल. मग तुम्ही त्यात लाल तिखट आणि धनेपूड घाला. परतून घ्या. यानंतर यात काजूची पेस्ट घालून मिनिटभर परता. यानंतर मसाल्यात अंदाजाने पाणी घाला. ग्रेवी फार पातळ करू नका. पाणी घातल्यानंतर त्यात गरम मसाला आणि कसूरी मेथी घाला. यानंतर पनीरचे तुकडे घालून पाच मिनिटं सजवून घ्या. वरून कोथिंबिर भुरभुरा. या ग्रेवीत बटाटा, मशरूम, फ्लॉवर, सोया चंक्सही घालता येतील.

# अनुवादाकडे वळा!

**स्कील डेव्हलपमेंट**

मैत्रिणींनो, घरून काम करण्याचे काही पर्याय शोधत असाल तर व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट किंवा अनुवादक म्हणून तुम्ही काम करू शकता. तुम्हाला एकापेक्षा अधिक भाषा येत असतील, इंग्रजी, हिंदीसारख्या भाषांवर प्रभुत्त्व असेल तर तुम्ही अनुवादक म्हणून काम करू शकता. तुम्ही तुमच्या भाषेतलं साहित्य इतर भाषांमध्ये आणण्याच्या कामात मदत करू शकता. इंग्रजी, हिंदी भाषेतलं दर्जेदार साहित्यही मराठीत किंवा तुमच्या मातृभाषेत आणता येईल. परदेशी भाषेचं ज्ञान तुमच्या कामी येईल. भाषा चांगली असेल तर प्रकाशकांना भेटून तुम्ही कामाला लागू शकता. यासोबतच व्हॉईट ओव्हर देणाऱ्या कलाकारांनाही बरीच मागणी आहे. यू ट्यूबवर अनेक व्हिडिओ पोस्ट होत असतात. ॲनिमेशन फिल्म्सही तयार होत असतात. यातल्या व्यक्तिरेखांना आवाज देण्याचं काम तुम्ही करू शकता. ठराविक लहेज्याचा आवाज यासाठी लागतो. तुमचा आवाज चांगला असेल तर व्हॉईस ओव्हरचं काम करता येईल.

तुमच्याकडे काही कौशल्यं नसतील तर त्यांच्या विकासासाठी प्रशिक्षण घेता येईल. काही अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. क्रिएटिव्ह रायटिंग किंवा व्हॉईस ओव्हरचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यासाठी तुम्ही प्रवेश घेऊ शकता. काही कार्यशाळांना हजेरी लाऊ शकता. तुमच्या आवडीच्या क्षेत्रात काम करा. फक्त पैसे मिळवणं हा उद्देश ठेऊ नका. मुख्य म्हणजे संपर्क वाढवा. तुमची लिंकेड इन प्रोफाइल अपडेट करत रहा.



# असा कमी करा ताण

**हेल्थ टॉक**

सततची धावपळ, दगदग यामुळे आपल्याला त्रास होत असतो. ज्यादा कामांचा खूप ताणही येतो. काही वेळा इतकं काम असतं की आपल्याला निवांत क्षणही मिळत नाहीत. अशा परिस्थितीत ताण आला की खूप अस्वस्थ वाटू लागतो. मात्र काही सोप्या उपायांनी आपण हा ताण कमी करू शकतो.

* ताण आल्यानंतर शरीरात कॉर्टिसोल हार्मोन्सची निर्मिती होते आणि हृदयाची धडधड वाढते. श्वासांचा वेगही वाढतो. या ताणाला प्रतिसाद म्हणून शरीर थरथरू लागतं. सततच्या ताणामुळे काही विकारही जडू शकतात.
* दीर्घ श्वसन हा ताण कमी करण्याचा रामबाण उपाय आहे. दीर्घ श्वसनाबद्दल नेहमीच बोललं जातं. योग्य पद्धतीने दीर्घ श्वसन केलं तर ताण झपाट्याने कमी होतो. श्वसनाच्या व्यायामामुळे तुम्हाला निवांत वाटतं. वर्तमानावर लक्ष केंद्रित करता येतं.
* काही प्रसंगी कोणत्याही स्क्रीनपासून लांब राहिल्यानेही बरं वाटू शकतं. टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप स्क्रीन्सना सतत चिकटून राहिल्यानेही ताण येऊ शकतो. खूपच त्रास होत असेल तर लॅपटॉप बंद करा आणि स्मार्टफोनही थोडा वेळ बाजूला ठेवा.
* शरीर ताणण्याच्या व्यायामामुळेही लगेच बरं वाटतं. हे व्यायाम कुठेही करता येतात. खूपच ताण आला तर उभं राहून शरीर ताणण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला नक्कीच बरं वाटेल.
* आजूबाजूच्या आवाजाचा त्रास जाणवू लागला तर लगेच कानात हेडफोन घाला आणि तुमच्या आवडत्या संगीताचा आनंद लुटा. संगीतामुळे तुमचा ताण हलका होईलच शिवाय तुम्ही कामही अधिक चांगल्याप्रकारे करू शकाल.
* शरीर देत असलेल्या संकेतांकडे लक्ष द्या. आापल्या डोक्यात सुरू असलेले विचार शरीरातून डोकावत असतात. त्यामुळे ताण आल्यावर शरीरही तणावग्रस्त होतं. अशावेळी तुम्ही बोटांपासून मानेपर्यंत शरीराचा प्रत्येक भाग मोकळा करण्याचा प्रयत्न करा.



# जमाना ट्रेंडी बॉटम्सचा

**स्टाईल स्टेटमेंट**

गेल्या काही वर्षांत सलवार कमीझला नवा ट्विस्ट मिळाला आहे. टिपिकल सलवारची जागा आता निरनिराळ्या बॉटम्सनी घेतली आहे. महिला आता कुर्त्यासोबत फिटेड पँट, पलाझो किंवा अगदी स्कर्टही कॅरी करतात. तुम्हालाही ट्रेंडी एथनिक बॉटम वेअर ट्राय करायच्या असतील तर मौनी रॉयकडून टिप्स घेता येतील. मौनी कुर्त्यासोबत ट्रेंडी बॉटम्स कॅरी करते. तुम्हीही तिच्याकडून प्रेरणा घेऊन वॉर्डरोब अपडेट करू शकता.

* मौनीने गुलाबी कुर्त्यावर त्याच रंगाची फ्लेअर्ड शरारा पँट घातली होती. या पँटवरचं गोटापत्ती वर्क शोभून दिसत होतं. या लूकसोबत तिने मोजडी कॅरी केल्या होत्या.
* व्हाईट कुर्त्यावर तिने त्याच रंगाची सिगारेट पँट घातली होती. या पँटला तिने गोटा लेस लावून घेतली होती.
* एका सणाच्या निमित्ताने तिने शरारा पँटवर शिमरी कुर्ता घातला होता.
* मौनी प्रवासादरम्यानही एथनिक्स कॅरी करत असते. विमानतळावरही ती फॅशन जपत असते. मौनीने हिरव्या अनारकली कुर्त्यावर व्हाईट फ्लेअर्ड पलाझो पँट कॅरी केली होती. तिचा हा लूक खूपच आकर्षक दिसत होता.

मौनीप्रमाणे तुम्हीही एथनिक्समध्ये वेगवेगळे प्रयोग करू शकता. यामुळे तुमचं व्यक्तिमत्त्व चांगलंच उठून दिसेल. त्यामुळे आता लेगिंग्ज, सलवार ठेवा बाजूला आणि ट्रेंडी बॉटम्स ट्राय करा.





"चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताला एकाच मैदानावर खेळण्याचा मोठा फायदा मिळत आहे. भारतीय संघ तुलनेने बलाढ्य आहेच, त्याशिवाय सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघाचे सामने दुबईत ठेवण्यात आल्याने भारतीय संघाला अतिरिक्त बळ मिळाले आहे."
— पॅट कमिन्स, ऑस्ट्रेलिया



भारताची महिला क्रिकेटपटू स्मृती मंधानाने माती कामात हात आजमावला तो क्षण




## आंतर आयटी कप क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेत

# गोलंदाजीच्या जोरावर इन्फोसिस विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयडीयाज-अ-सास कंपनी यांच्या वतीने व कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड यांच्या सहकार्याने आयोजित 19व्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी कप क्रिकेटअजिंक्यपद स्पर्धेत अंतिम फेरीत आशय पालकर नाबाद 98 धावांसह संदीप संघाई(3-7) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर इन्फोसिस संघाने टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस संघाचा 76 धावांनी पराभव करून विजेतेपद संपादन केले.



पीसीएमसी येथील व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत इन्फोसिस संघाने प्रथम फलंदाजी करताना 20षटकात 7बाद 199धावा केल्या. यात आशय पालकरने 49चेंडूत 12चौकार व 4षटकारासह नाबाद 98धावा, निखिल रोकडेने 37धावा, सागर बिर्दावडेने 21धावा, संदीप संघाईने 19 धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला.

या आव्हानाचा पाठलाग करताना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस संघ 17.2षटकात सर्व बाद 123धावावर संपुष्टात आला. यात साईनाथ शिंदे 59, विक्रांत बांगर 22 यांनी दिलेली लढत अपुरी ठरली. इन्फोसिस संघाकडून संदीप संघाई(3-7), सागर बिर्दावडे(2-22), राय तरुणकुमार(2-12) यांनी अचूक गोलंदाजी करत संघाला 76 धावांनी विजय मिळवून दिला.

स्पर्धेतील विजेत्या इन्फोसिस संघाला करंडक व 60,000/- रुपये, तर उपविजेत्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस संघाला करंडक व 30,000/- रुपये अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय मालिकावीर आशय पालकर याला 10,000/- रुपये, सर्वोत्कृष्ट फलंदाज अमेय पाडे(311धावा), सर्वोत्कृष्ट गोलंदाज सागर बिर्दावडे(11विकेट) यांना प्रत्येकी 5,000/- अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अंकुर जोगळेकर मेमोरियल फाउंडेशनचे अध्यक्ष विंग कमांडर उदय जोगळेकर, उपाध्यक्ष विजय जोगळेकर, कोलते पाटील डेव्हलपर्स लिमिटेडचे उप महाव्यवस्थापक भरत रामचंदानी, कोलते पाटील डेव्हलपर्स लिमिटेडचे सचिन चिंचवडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## झोनल स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये ध्रुवच्या खेळाडूंची चमक



**पुणे :** झोनल जलतरण स्पर्धेत नांदे येथील, ध्रुव ग्लोबल स्कूलच्या हिया कोटक, निया पतंगे आणि अनया वानखेडे यांनी बटरफ्लाय, बॅकस्ट्रोक आणि फ्री स्टाइल खेळामध्ये आपली चपळता आणि चमक दाखवित पदके आपल्या नावे केली. शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथील जलतरण तलावात नुकतीच झोनल स्विमिंग चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न झाली. येथे खेळाडूंनी आपली प्रतिभा दाखविली आहे. शाळेतील जलतरणपटूंना संधी देणे हे त्यांचे एकमेव उद्देश्य या स्पर्धेचा आहे.

या स्पर्धेत नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलच्या प्रतिभावन जलतरणपटूनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. यामध्ये हिया कोटक (२०० मीटर बटरफ्लाय - तृतीय), निया पतंगे (१०० मी. बॅकस्ट्रोक- तृतीय ) व (२०० मी. फ्री स्टाइल - तृतीय ) आणि अनया वानखेडे (२०० मी. बॅकस्ट्रोक - तृतीय ) स्थान पटकावून शाळेचे नाव मोठे केले.

## अॅथलेटिक्समध्ये संजीवनी जाधवला रौप्यपदक

### 38वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नाशिकची संजीवनी जाधव हिने महिलांच्या ५ हजार मिटर शर्यतीत रौप्य, तर पूनम सोनूने हिने कांस्यपदक जिंकून ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अॅथलेटिक्समध्ये आजचा दिवस गाजवला. याचबरोबर महिलांच्या ४०० मिटर अडथळा शर्यतीत नेहा ढाबरे हिने कांस्यपदकाची कमाई केली, तर पुरुषांच्या ४०० मिटर शर्यतीत बिद्री (कोल्हापूर) येथील रोहन कांबळे यालाही कांस्यपदक मिळाले.

गंगा अॅथलेटिक्स स्टेडियममध्ये ही स्पर्धा सुरू आहे. संजीवनी जाधवकडून आज महाराष्ट्राला सुवर्णपदकाची अपेक्षा होती. पहिल्या फेरीपासून तिने आघाडीही घेतली होती. यजमान उत्तराखंडची अंकिता आणि संजीवनी यांच्यात पहिल्या फेरीपासून पाठशिवणीचा खेळ रंगला होता. संजीवनी सुवर्ण पदकाला गवसणी घालणार असे वाटत असताना अखेरच्या ३०० मीटरमध्ये अंकिताने मुसंडी मारत संजीवनीला मागे टाकले. अखेरच्या टप्प्यासाठी राखून ठेवलेल्या दमचा वापर करीत अंकिताने १५ मिनिटे ५६.०३ सेकंद वेळेसह सुवर्ण पदकावर नाव कोरले. महाराष्ट्राच्या संजीवनीला १५ मिनिटे ५९.१३ सेकंद वेळेसह रौप्य पदकावर समाधान मानाने लागले.



## राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धा : दहा वर्षांखालील गटात वेदांतची बाजी

# कविश लिमये याने पटकावले विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कविश लिमये याने १६व्या विनायक नवयुग मंडळ खुल्या राज्यस्तरीय जलद बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटाचे विजेतेपद पटकावले. त्याने सात फेऱ्यांअखेर सहा गुणांची कमाई केली, तर दहा वर्षांखालील गटात वेदांत कुलकर्णीने बाजी मारली.

विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्ट आणि हिंद शक्ती सोशल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित ही स्पर्धा भांडारकर रोडवरील साने डेअरी चौक येथील मिलेनियम टॉवर्स येथे झाली. या स्पर्धेतील १४ वर्षांखालील मुलांच्या गटातील सातव्या आणि अखेरच्या फेरीत पहिल्या पटावर कविश लिमये (१५९६ रेटिंग) आणि रिजूल कुरडे (१५५१ रेटिंग) यांच्यातील डाव बरोबरीत सुटला.



दुसरीकडे, काळ्या मोहरांसह खेळताना विहान देशमुखने ध्येय गोंढाला, तर भूवन कोन्नूरने चिराग रेड्डीला पराभूत केले. त्यामुळे कविश लिमये, विहान देशमुख आणि भूवन कोन्नूर यांचे सात फेऱ्यांअखेर प्रत्येकी सहा गुण झाले. मात्र, टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने कविशने अव्वल क्रमांक पटकावला. विहानने दुसरा, तर भूवन तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

स्पर्धेतील पहिल्या दहा क्रमांकांच्या खेळाडूंना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यात कविशला २ हजार ५०० रुपये आणि करंडक, विहानला दोन हजार रुपये आणि करंडक, तर भूवनला १५०० रुपये आणि करंडक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील दहा वर्षांखालील गटात वेदांत कुलकर्णीने सहा गुणांसह बाजी मारली. त्याला २ हजार ५०० रुपये आणि करंडक देऊन गौरविण्यात आले. शौनक पाठक (६) दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याला दोन हजार रुपये आणि करंडक देऊन सन्मानित करण्यात आले. अर्जुन कौलगुड (५.५) तिसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याला एक हजार पाचशे रुपये आणि करंडक देण्यात आला.

## टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

# ओवी, जान्हवी, लक्ष्य, स्मित यांचा मुख्य फेरीत प्रवेश





**पुणे :** फर्ग्युसन कॉलेज यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए फर्ग्युसन कॉलेज पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत ओवी मारणे, जान्हवी सावंत, लक्ष्य त्रिपाठी, स्मित उंद्रे यांनी मुख्य फेरीत प्रवेश केला. फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमीत येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत अंतिम पात्रता फेरीत मुलांच्या गटात लक्ष्य त्रिपाठी याने तिसऱ्या मानांकित आर्य पाटकरवर 6-4, 6-3 असा विजय मिळवला. स्मित उंद्रेने अकराव्या मानांकित आश्रित मज्जीचे आव्हान 6-1, 7-6(3) असे मोडीत काढले. सहाव्या मानांकित अभिनव महामुनीने कियान पौवाला 6-3, 7-6(2) असे पराभूत केले. तनिश पाटीलने सुजय देशमुखचा 6-1, 6-3 असा पराभव केला.

मुलींच्या गटात अंतिम पात्रता फेरीत बिगर मानांकित ओवी मारणे हीने अव्वल मानांकित अनुष्का महामुनीचा 6-2, 6-3 असा सरळ सेटमध्ये पराभव केला. चुरशीच्या लढतीत जान्हवी सावंत हीने दुसऱ्या मानांकित प्रिशा पाटीलचा 6-3, 2-6, 10-6 असा संघर्षपूर्ण पराभव केला. रित्सा कोंडकरने रिशिता यादवचा 6-3, 6-3 असा पराभव करून मुख्य फेरी गाठली. पाचव्या मानांकित अनिका नायर हिने शरण्या सावंतवर 6-2, 3-6, 10-6 असा विजय मिळवला. अनुष्का जोगळेकरने श्रेया रांजलकरचा 6-4, 6-3 असा पराभव करून मुख्य फेरीत धडक मारली. मुख्य ड्रॉमधील खेळाडूंची मानांकन यादी आज जाहीर करण्यात आली. यामध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या मनन अग्रवाल याला तर मुलींच्या गटात स्वानिका रॉय यांना अग्रमानांकन देण्यात आले आहे.

## आंतरशालेय खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात

# न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डेक्कन एज्युकेशन आणि रमणबाग मित्र मंडळाच्या वतीने आयोजित आंतरशालेय १४ वर्षांखालील खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात यजमान न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग संघाने तर, मुलींच्या गटात अहिल्यादेवी प्रशाला संघाने विजेतेपद संपादन केले.



रमणबाग प्रशालेच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत मुलांच्या अंतिम सामन्यात न्यू इंग्लिश स्कुल रमणबाग प्रशाला संघाने म.स. गोळवलकर गुरुजी विद्यालयाचा १२-११ असा एक गुण आणि ३ मिनिटे ३० सेकंद राखून पराभव केला. मुलींच्या गटात अहिल्यादेवी प्रशालेने म.स. गोळवलकर गुरुजी विद्यालयावरच ११-१० असा एक गुण आणि ४ मिनिटे राखून पराभव केला.

मुलांच्या अंतिम लढतीत न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग संघाने नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षणाचा निर्णय घेतला. प्रणित सस्ते (१मिनिट २० सेकंद), अद्वैत सातपुते (२ मिनिट), श्रीयश महारुगडे (१.३० मिनिट) यांच्या सुरेख कामगिरीमुळे त्यांनी केवळ चार गुण गमावले. आक्रमण करताना ओम डिंगरे (३) आणि सुयश महारुगडे (२) यांच्या आक्रमणाने रमणबाग प्रशालने गोळवलकर गुरुजी विद्यालयाचे १० गडी टिपून पहिल्या डावात सहा गुणांची कमाई केली. दुसऱ्या डावात दर्शन धावलेच्या (४) धारदार आक्रमणाने गोळवलकर गुरुजी विद्यालायने ७ गुणांची कमाई केली.

## महिलांच्या गटात महाराष्ट्राला सांघिक रौप्य

# मल्लखांबमध्ये महाराष्ट्राच्या जान्हवीची सुवर्ण हॅटट्रिक,

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जिम्नॅस्टिक्स पाठोपाठ मराठमोळ्या मल्लखांबतही महाराष्ट्राच्या महिला खेळाडूंनी 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत आपले वर्चस्व दाखवले आहे. दोरीचा मल्लखांब प्रकारात जान्हवी जाधवने सुवर्ण, तर रूपाली गंगावणेने रूपेरी यशाला गवसणी घातली. मुलींच्या सांघिक प्रकारात महाराष्ट्राने रौप्य पदकाची कमाई करीत आजचा दिवस गाजविला.

वन चेतना स्टेडियममध्ये सुरू असलेल्या मल्लखांब स्पर्धेत पहिल्या दिवसापासून महाराष्ट्राचा बोलबोला सुरू आहे.

दोरीचा मल्लखांब प्रकारात मुंबई उपनगरच्या जान्हवी जाधवने आपल्या लौकिकाला साजेसा असा खेळ करून सुवर्ण यशाची भरारी घेतली. विश्वकरंडक चॅम्पीयन असणाऱ्या जान्हवीने कलात्मक प्रदर्शनकरीत अवघड रचना सादर करीत प्रेक्षकांची मने जिंकली.

# केएमपी अॅस्पायर एफसी राज्य युथ लीग विजेते

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केएमपी अॅस्पायर एफसीने महाराष्ट्र राज्य युथ लीगमध्ये १५ वर्षांखालील (साखळी फेरी) मुलींमध्ये विजेतेपद पटकाविले. या जेतेपदासह ते सुपर फोर फेरीसाठी पात्र ठरले आहेत. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आयोजित सिंहगड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, लोणावळा येथे झालेल्या फुटबॉल लीगमध्ये साखळी फेरीतील जेतेपदामुळे अॅस्पायर एफसी टीम सुपर फोर फेरीसाठी (टॉप-4 संघ) पात्र ठरली आहे. सुपर फोर फेरी मार्च महिन्यामध्ये लोणावळा येथेच होणार आहे.



केएमपी अॅस्पायर एफसीने 7 संघांच्या लीगमध्ये 15 गुणांसह अव्वल स्थान पटकावले. ही स्पर्धा ऑल-प्ले-ऑल फॉरमॅटमध्ये 35 मिनिटांच्या दोन सत्रात (हाफ) खेळविण्यात आली. संपूर्ण लीगनंतर, अॅस्पायर एफसी आणि यंग मास्टर्स कम्युनिटी क्लब (वायएमसीसी), पालघर यांच्यात (15 गुण; 5 विजय आणि 1 पराभव) बरोबरी राहिली.

तथापि, दोन्ही संघांची हेड टू हेड कामगिरी अॅस्पायर एफसीसाठी जमेची बाजू ठरली. त्यांनी (22 गोल केले तर 2 गोल स्वीकारले) वायएमसीसीला (22 गोल केले तर 4 गोल स्वीकारले) गोल फरकामध्ये मागे टाकताना अव्वल स्थानावर शिक्कामोर्तब केले.

अॅस्पायर एफसीची सांघिक कामगिरी उंचावण्यात इप्सिता गवारी आणि शर्वरी माने (प्रत्येकी ६ गोल), अनुश्री देवळालीकर, थीया फर्नांडिस (प्रत्येकी ३ गोल), समीक्षा साबळे (२ गोल) आणि मिश्का अरुण (१ गोल) यांचे योगदान मोलाचे ठरले.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या

# राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सकडून 'कळसूबाई' सर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,विद्यार्थी विकास मंडळ व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नुकतीच राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटसाठी कळसुबाई गिर्यारोहण आणि सांस्कृतिक आदानप्रदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे खजिनदार अॅड. मोहनराव देशमुख यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत महोत्सव समिती अध्यक्ष व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. राजेंद्र विखे पाटील होते.



प्रमुख पाहुणे म्हणून व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संदीप पालवे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य, अधिसभा सदस्य सचिन गोर्डे पाटील, अधिसभा सदस्य चिंतामण उगले, वित्त व लेखा अधिकारी डॉ. चारुशीला गायके, वनरक्षक दत्तात्रय पडवळ, शीतल तळकडे, डॉ. सौरभ दहिवळे, डॉ. विवेक कावटकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नितीन घोरपडे यांनी केले.

एनसीसीचे शिस्त व खडतर कवायतीमुळे कणखर बनलेले असतात. त्यांनी इथला निसर्ग, संस्कृती यांचे निरीक्षण करून विद्यापीठाचा हे शिबीर आयोजित करण्याचा हेतू सफल करावा असे आवाहन केले.

#रा